# प्रकरण २

# प्रारंभिक ब्रिटीश राज्य आणि सामाजिक सुधारणा

इंग्रजांचा वकील पुण्याच्या दरबारी असावा ही मागणी प्रथम नाना फडणवीसांनी केली. याचे कारण म्हणजे सालबाईच्या तहापासून मराठ्यांचा प्रमुख प्रवक्ता म्हणून महादजी शिंदेचे महत्त्व वाढीस लागले होते. ते नानास पसंत नव्हते. नाना फडणवीसांची ही मोठी चूक होती. मराठ्यांच्या अंतर्गत राजकारणात लक्ष घालण्याची संधीच ब्रिटिशांना मिळाली. मराठे परस्परांविरुद्ध कशी कारस्थाने करतात व आपण त्याचा लाभ कसा उठवावयाचा हे चाणाक्ष ब्रिटिशांनी हेरले. वरील चारही वकिलांचा पत्रव्यवहार भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे. इंग्रज-मराठा संबंधाचा अभ्यास करण्यासाठी ते प्रथम, अस्सल साधन समजले जाते.

**अ) प्रशासन-जमीन महसूल पद्धत :-**

इ.स. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाल्यानंतर पेशव्यांचा प्रदेश हा मुंबई इलाख्याचा एक मोठा भाग बनला. इ.स. १८१९ ते १८२७ या काळात माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा मुंबई इलाख्याचा पहिला गव्हर्नर होता. अत्यंत कार्यक्षम प्रशासक म्हणून त्याने लौकिक मिळविला. त्याच्यावर इंग्लंडमधील उदारमतवादी तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडलेला होता. तो सुसंस्कृत व्यासंगी होता. आपण एक चांगले सरकार दिले, शासनव्यवस्था उत्कृष्ट दिली तर लोकांच्या मनातील असंतोष कमी होऊ शकतो अशी त्याची पक्की समजूत होती. लोकांशी सहानुभूतीने वागले पाहिजे व त्यांच्या मनातील शल्ये हळुवारपणे दूर केली पाहिजेत हे त्याचे धोरण होते. धर्मभोळेपणा, अज्ञान, रूढीप्रियता आदींमुळे येथील समाज हा अधःपतित झाला आहे याची त्याला जाणीव होती. व्यसनांच्या व अज्ञानाच्या आहारी गेलेल्या समाजाला ज्ञानाचा प्रकाश मिळाल्याशिवाय त्यांचा उद्धार होणार नाही याची त्यास खात्री होती. पाश्चात्त्य शिक्षणाचा संस्कार झाल्यावर लोकांवर त्याचे काय परिणाम होतील याची ब्रिटिशांना चांगलीच कल्पना होती. पारंपरिक शिक्षण पद्धतीमुळे कोणतेही मन्वंतर घडून येणार नव्हते याचीही ब्रिटिश प्रशासकांना जाणीव होती. पारंपरिक शिक्षण एक विशिष्ट वर्ग घेत होता पण त्यामुळे ऐहिकता, भौतिकवाद, बुद्धिवाद वाढीस लागला नव्हता. या एकूण पार्श्वभूमीवर एल्फिन्स्टनने आपले प्रशासनविषयक धोरण आखले.*Literary Society of Bombay* या संस्थेचा एल्फिन्स्टन हा एक सदस्य होता. त्याच संस्थेचे पुढे *Royal Asiatic Society* त रूपांतर झाले. निवृत्तीनंतरही तो या संस्थेचा सदस्य होता. आपली प्रशासकीय कामे सांभाळत त्याने संशोधन, लिखाण चालूच ठेवले होते. एल्फिन्स्टनने खालील ग्रंथ लिहिले -
१) काबूलचा इतिहास २) भारताचा इतिहास
३) पूर्वेकडील देशांत ब्रिटिश सत्तेचा उदय

एल्फिन्स्टननंतर पुढील गव्हर्नरनी राज्यकारभार पाहिला - १) सर जॉन माल्कम २) थॉमस मन्रो ३) चॅप्लिन ४) रॉबर्टसन ५) अँट ६) पॉन्टिजर

माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन मुंबई प्रांताचा पहिला गव्हर्नर :-

ऑक्टोबर १८१९-१८२७ कमिशनर म्हणून एल्फिन्स्टनपुढील मोठी समस्या म्हणजे या जिंकलेल्या प्रदेशात पाश्चिमात्य तत्त्वावर आधारित प्रशासन पद्धती लागू करावयाची का मराठ्यांची जुनी पद्धतीच चालू ठेवायची का त्यात थोडा फार बदल करावयाचा. प्रशासनात क्रांतिकारक बदल करावेत तर जनता नाराज होणार अशीही भीती होतीच. पेशव्यांच्या राजवटीत जे अधिकारी होते त्यांना व ज्यांनी निष्ठेने सेवा केली होती, त्या सर्वांना नव्या ब्रिटिश राजवटीत कायम ठेवले गेले. दुसऱ्या बाजीराव पेशव्यास पेन्शन देऊन दूर कानपूरजवळील विठूर एका खेड्यात ठेवले.

जून इ.स. १८१८ ते ऑक्टोबर १८१९ या सव्वा वर्षाच्या काळात एल्फिन्स्टन हा डेक्कन कमिशनर म्हणून सेवेत होता. तर इ.स. १८१९ नंतर तो मुंबई प्रांताचा गव्हर्नर झाला. तो बुद्धिवादी, उदारमतवादी होता. तो शेवटपर्यंत अविवाहित होता. घोडेस्वारी, शिकार हे त्याचे शौक होते. दररोज ८-१० मैलाची घोड्याची रपेट तो करी. तो स्वतः उच्चकुलीन होता. त्याचे अनेक भाषांवर प्रभुत्व होते. ग्रीक, लॅटिन, पर्शियन, इंग्रजी, फ्रेंच व इटालियन या भाषांचा त्याचा चांगला अभ्यास होता व या भाषेतील उत्तम ग्रंथ त्याने वाचले होते. साहित्य, कला व राजकारणातील वाद व विचारप्रवाह याचे त्याला उत्तम ज्ञान होते. जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त हित हे तत्त्व विचारात घेऊन राज्यकारभार करणारा तो प्रशासक होता. मराठी भाषिकांचे गुणदोष त्यांना माहीत होते. गव्हर्नर या नात्याने पुण्यातील ब्राह्मणांचे सहकार्य मिळवण्याचा

प्रयत्न त्याने केला. त्याने पुण्यातील २०० ब्राह्मण भेटीस बोलावले. त्या सर्वांना बक्षिसे देऊन त्यांच्या विद्वत्तेला साजेल असा सत्कार केला. ब्राह्मणांप्रमाणेच मराठ्यांचेही सहकार्य मिळवण्याचा त्याने प्रयत्न केला. मराठ्यांना शस्त्रे धारण करण्याचे परवाने दिले. त्यांना पोलिस खात्यात व ब्रिटिशांच्या लष्करात कामे दिली. ब्राह्मणांचे प्रतिस्पर्धी मराठे यांना हाताशी धरले तर भविष्यात सत्ता टिकवण्यासाठी मराठे ब्राह्मणाविरुद्ध आपणास पाठिंबा देतील अशी त्याची धारणा होती. शिक्षणाचे महत्त्व जाणणारा व त्याचा प्रसार व्हावा म्हणून प्रयत्नशील असणारा एल्फिन्स्टन वृत्तपत्र स्वातंत्र्याच्या बाबतीत मात्र सनातनी वृत्तीचा होता. भारतीयांना सरकारविरुद्ध टीका करण्याचा अधिकार असू नये, त्यांनी राजकारणात भाग घेऊ नये या मताचा तो होता. वृत्तपत्राच्या संपादकासाठी त्याने काही मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली होती. वृत्तपत्र सुरू करण्यासाठी सरकारची परवानगी आवश्यक होती. प्रशासनातील अधिकाऱ्यांविरुद्ध उघडपणे आरोप करू नयेत. सरकारला विरोध करणाऱ्या लोकांच्या कृतीला वृत्तपत्रांनी प्रसिद्धी देऊ नये असे एल्फिन्स्टनचे मत होते. एल्फिन्स्टनची कायदेसंहिता एल्फिन्स्टनने कायदा क्षेत्रात अनेक महत्त्वाच्या सुधारणा केल्या. ग्रँट डफ हा मराठ्यांचा इतिहासकार म्हणतो, 'एल्फिन्स्टनचे नाव हे अगदी सार्थपणे ब्रिटिश सरकारच्या कर्तृत्वाशी निगडित झाले आहे. महाराष्ट्राच्या जनतेवर त्याने उपकार केले आहेत. त्याची आठवण नंतरच्या काळात कितीही राजकीय उलथापालथी झाल्या तरी महाराष्ट्राच्या जनतेला राहील.' इ.स. १७७४ मध्ये वॉरन हेस्टिंग्ज याने न्यायक्षेत्रात काही महत्त्वाच्या सुधारणा केल्या होत्या. कोलकाता येथे सर्वोच्च न्यायालय, जिल्हा पातळीवर दिवाणी व फौजदारी न्यायालये व त्या न्यायालयाच्या निकालावर अपील करण्यासाठी पुन्हा स्वतंत्र न्यायालय असे त्याचे एकूण स्वरूप होते. इ.स. १७९९ मध्ये बंगालच्याच धर्तीवर मुंबई इलाख्यातही न्यायालयीन व्यवस्था निर्माण करण्यात आली होती.

एल्फिन्स्टन कायदेसंहिता हे त्याचे प्रशासन यंत्रणेतील अत्यंत महत्त्वाचे योगदान होते. सर्व हिंदू समाजाला लागू पडेल अशी कायदेसंहिता अस्तित्वात नव्हती. जी न्यायसूत्रे वापरली जात होती त्याचे स्वरूप निश्चित नव्हते. चालीरीतींवर आधारित रूढीच कायदा म्हणून वापरल्या जात. एकाच गुन्ह्यासाठी निरनिराळ्या कोर्टात वेगवेगळ्या शिक्षा होत्या. या पार्श्वभूमीवर विखुरलेल्या कायद्यांचे एकत्रीकरण करून त्यास व्यवस्थित रूप देण्याचा एल्फिन्स्टनचा मानस होता. इ.स. १८२० मध्ये त्याने एक समिती नेमली. समितीच्या शिफारशी शास्त्री, पंडित, जातिप्रमुख, कायदा व रूढी यांचे ज्ञान असणारे विद्वान यांना दाखवून व न्यायालयांची दप्तरे तपासून त्याने २७ कायद्यांची एक संहिता तयार केली व १ जानेवारी १८२७ पासून अमलात आणली. ही कायदेसंहिता 'एल्फिन्स्टनची कायदेसंहिता' म्हणून ओळखली जाते. परंतु हिंदूंची लिखित, अलिखित म्हणजे धर्मशास्त्र व चालीरीती एकत्र आणून त्याची सर्वकष संहिता तयार करण्याचा त्याचा उद्देश मात्र सफल झाला नाही. निवृत्तीनंतर इ.स. १८.२९ मध्ये व १८३४ मध्ये दोन वेळेस त्याला गव्हर्नर जनरल हे भारतातील सर्वोच्च पद देण्याचे इंग्लंड सरकारने ठरविले होते; पण ते त्याने स्वीकारले नाही.

प्रशासकीय यंत्रणेची उभारणी महाराष्ट्रात ब्रिटिश अंमल प्रस्थापित करण्याची व त्यास मजबुती आणण्याची जबाबदारी एल्फिन्स्टनने उत्तमरीत्या पार पाडली. तो मूलतः साम्राज्यवादी होता व त्याची प्रशासकीय व्यूहरचना ब्रिटिश साम्राज्यवादास पूरक होती. तो मुळात एक योद्धा नव्हता. पण तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धात त्याने आपले युद्धनेतृत्वही सिद्ध केले होते. एल्फिन्स्टनने पेशव्यांकडून जो मुलूख जिंकून घेतला होता तो लगेच मुंबई प्रांतात सामील केला नाही. त्या प्रदेशावर कमिशनर म्हणून एल्फिन्स्टनची नेमणूक झाली. कमिशनरकडे सुमारे ५०,००० चौरस मैलांचा प्रदेश व ४०,००,००० लोकसंख्या असलेला मुलूख आला.

खानदेश, पुणे, नगर, सातारा, नाशिक हे जिल्हे कमिशनरकडे होते. या प्रत्येक जिल्ह्यावर एक कलेक्टर तसेच त्याच्या हाताखाली डेप्युटी कलेक्टर व मामलेदार (तहसीलदार) यांच्या नेमणुका केल्या. त्यांच्यावर सारा वसुलीची जबाबदारी टाकली. मामलेदाराच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार डेप्युटी कलेक्टरला देण्यात आला. खेडेगावच्या कारभारात त्याने कोणतेही बदल केले नाहीत. पाटील, कुलकर्णी हे खेड्याचा कारभार पूर्वपरंपरेनुसार पाहत होते. पाटलाकडे शांतता व सुव्यवस्था ही कामे सोपवली तर कुलकर्णी वसुलीचे काम करी.

मुंबई इलाख्यात प्रशासकीय खात्यांचा उद्गम ब्रिटिशांनी सुरत येथे इ.स. १७१२ मध्ये व्यापारी वखार उघडली. सुरत हेच त्यांचे पश्चिम किनाऱ्यावरील मुख्य ठाणे झाले. इ.स. १७५५ पर्यंत *Public Department* या एकाच

खात्यामार्फत मुंबई प्रेसिडेन्सीचा कारभार चालत होता. पण प्रशासनाच्या सोयीसाठी आणखीन खाती टप्प्याटप्प्याने निर्माण होत गेली. याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.क्र. विभागाचे (खाते) नाव | उद्‍गमाची तारीख |
|---|---|
| *1. Public Dept -* | *1715* |
| *2.Secret and Political Dept-* | *1755* |
| *3.Revenue Dept-* | *1779* |
| *4.Commercial Dept-* | *1786* |
| *5.Military Dept-* | *1788* |
| *6.Judical Dept-* | *1795* |
| *7.Seperate Dept-* | *1794* |
| *8.Financial Dept* | *1811* |
| *9.Excelsictical Dept* (धार्मिक खाते) - | *1817* |
| *10.Marine Dept-* | *1818* |
| *11.Mint Dept-* | *1839* |
| *12.Steam Dept-* | *1837* |
| *13.Public Works Dept (Railway)* | *1844* |
| *14.Public Works Dept-* | *1855* |
| *15.Educational Dept-* | *1860* |
| *16.Legal Dept-* | *1862* |
| *17.Indo-European Telegraph Dept-* | *1863* |
| *18.Public Works Dept (Irrigation)-* | *1868* |
| *19.Special Dept-* | *1902* |

प्रत्येक खात्याचा कारभार जसा वेगळा होता तसेच त्याचे दप्तरही वेगळे होते. प्रत्येक खात्याने करावयाची कामे याचे स्वरूप निश्चित करण्यात आले. इ.स. १८२० नंतर प्रत्येक खात्यात डायरी पद्धतीऐवजी पत्रव्यवहारच संग्रहित करण्याची पद्धत सुरू झाली. वरील नमूद सर्व खात्यांचा पत्रव्यवहार/फाइल्स *Bombay Archives* मध्ये आजही आहेत. मुंबई बेटाच्या विकासाच्या अनेक महत्त्वपूर्ण नोंदी बॉम्बे पुराभिलेखागारमध्ये उपलब्ध आहेत.

मराठा लष्कराबाबत निर्णय इ.स. १८१८ मध्ये पेशवाई बुडाल्यानंतर त्यांच्या सेवेत असलेल्या मराठा लष्कराचे काय करावे हा प्रश्न होता. काही सैनिक गावी जाऊन शेती करू लागले, काही ब्रिटिश लष्करात दाखल झाले तर काहींना शस्त्र परवाने देऊन त्यांचा उपयोग गावाच्या संरक्षणासाठी त्याने केला. दंगेधोपे मोडून काढण्यासाठीही या मराठा लष्कराचा उपयोग करून घेण्याचे ठरविले. या एकूण प्रक्रियेत २० टक्के लष्करच पुन्हा लष्करी सेवेत राहिले होते. सत्तांतरानंतर केवळ ३६ तासांत पेशव्यांच्या लष्करातील काही सैनिक ब्रिटिशांच्या लष्करात दाखल झाले होते ही बाब उल्लेखनीयच मानावी लागेल. यावरून त्या काळात लष्करातील लोकांपुढे राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम आदी विचार मुळीच नव्हता, आपली उपजीविका एवढाच एक संकुचित विचार होता असे दिसते.

कायदा व सुव्यवस्थेला प्राधान्य १९ व्या शतकाच्या प्रारंभी कायदा व सुव्यवस्थेची स्थिती चांगली नव्हती. यशवंतराव होळकर यांनी आपला भाऊ विठोजी होळकर यांचा दुसरा बाजीराव पेशवा याने हत्तीच्या पायाखाली देऊन खून केल्यामुळे संतप्त होऊन पेशव्यांची राजधानी पुणे शहरावरच हल्ला करून इ.स. १८०३ मध्ये पुणे लुटले होते. सततची युद्धे, दंगे, दरोडे यामुळे शांतता व सुव्यवस्था ढासळली होती. पेंढारी, चोर व दरोडेखोर यांच्यामुळे जनता त्रस्त झाली होती. मराठा सत्तेच्या अस्तपर्वकाळात हे चित्र सार्वत्रिक होते; पण इ.स. १८१८ नंतर मात्र ब्रिटिशांनी कायदा व सुव्यवस्थेला प्राधान्य दिले. दरोडेखोरांचा बीमोड केला. सर्वत्र कायद्याचा अंमल व कायद्यापुढे प्रत्येक व्यक्ती समान हे

ब्रिटिशांच्या राजवटीचे सूत्र होते. त्यामुळे ब्रिटिशांची राजवट एक ईश्वरी वरदानच आहे असे महाराष्ट्रीयन लोकांना वाटू लागले. एल्फिन्स्टनने प्रशासनाची एक भक्कम चौकट मुंबई प्रांतात निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

पोलिस यंत्रणेची उभारणी शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी पोलिस यंत्रणेची उभारणी एल्फिन्स्टनने केली. नागरी संरक्षणाची चोख व्यवस्था करण्यात आली. त्यामुळे लोकांना जीवित व मालमत्तेच्या संरक्षणाची हमी मिळाली.

जहागीरदारांचा प्रश्न पेशव्यांची सत्ता नष्ट झाल्यावर जहागीरदारांचे महत्त्व कमी झाले. प्रारंभीच्या काळात तरी एल्फिन्स्टनने जहागीरदारांच्या हक्कांवर विशेष अतिक्रमण केले नाही. मोठ्या जहागीरदारांची वतने चालूच ठेवली. कनिष्ठ प्रतीचे जहागीरदार होते त्यांना कमिशनरच्या वर्चस्वाखाली आणले. खालच्या प्रतीचे किंवा लहान जहागीर ज्यांच्याकडे जहागिरीच्या, वंशपंरपरेच्या सनदा नव्हत्या अशा जहागीरदारांच्या जहागिरी एक ते दोन पिढ्या चालू ठेवण्याचा निर्णय झाला.

पेशवाईत जमीन महसुलात झालेली घट पेशव्यांचे धोरण शेतीला उत्तेजन देण्याचे असूनही पेशवे सरकारला मिळणारे उत्पन्न उत्तरोत्तर घटत गेले. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत तर ते फारच घटले. हे उत्पन्न वाढावे म्हणून दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या अधिकाऱ्यांनी जनतेचा बराच छळ केला होता; तरी पण उत्पन्नात वाढ झाली नाही. पेशवाईत जमीन महसुलाचे उत्पन्न का घटले होते त्याची कारणे खालीलप्रमाणे: -

१) जमीन महसुलाच्या पद्धतीत एकसूत्रीपणाचा अभाव.

२) अवर्षण (याप्रसंगी शेतसाऱ्यात पेशवे सूट अतिवृष्टी. देत असत).

3) सतत सुरू असलेल्या लढाया व दंगे.

4) जमीन महसुलाबाबत मक्ता पद्धती.

५) जमिनीचा मोठा भाग इनामदार, जहागीरदार, वतनदार यांच्याच मालकीचा होता.

६) धर्मसंस्था मालकीच्या जमिनी. (त्यावर महसूल कर नव्हता)

जव्हिस, रॉबर्टसन, चॅपलिन वगैरे इंग्रज अधिकाऱ्यांच्या मते, मराठ्यांच्या जमीन महसूल कर पद्धतीचा मुख्य दोष म्हणजे तो वाजवीपेक्षा जास्त होता. तो कधी ४० टक्के किंवा त्यापेक्षाही अधिक होता. चौथाई व सरदेशमुखीचे हक्क वसूल करण्याची मराठ्यांची पद्धतही योग्य व प्रभावी नव्हती.

जमीन महसूल पद्धतीत एल्फिन्स्टनने केलेले बदल जमीन महसूल पद्धतीची पुनर्रचना हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न एल्फिन्स्टनपुढे होता. दुसरा बाजीराव पेशवा याच्या काळात मक्ता पद्धत होती. या मक्ता पद्धतीमुळे सरकारची बदनामी होई. कारण मक्ता पद्धतीत कंत्राटदार नियमापेक्षा अधिक जमीन महसूल वसूल करत. निर्धारित रक्कम सरकारी तिजोरीत भरून बाकी खिशात टाकत. या पद्धतीत जनतेला जास्त महसूल द्यावा लागे. यामुळे सरकारला त्याचा विशेष फायदा होत नसे. लॉर्ड कॉर्नवॉलीसने बंगाल प्रांतात जी कायमधारा पद्धत सुरू केली होती ती एल्फिन्स्टनला मान्य नव्हती. मद्रासमध्ये मन्रो याने सुरू केलेल्या रयतवारी पद्धतीतील उणिवा दूर करून तिचा स्वीकार करावा या मतापर्यंत तो आला होता. लॉर्ड कॉर्नवॉलीस व मन्रो या दोघांच्या पद्धतीतील सुवर्णमध्य साधण्याचा त्याचा प्रयत्न होता. त्याला जमीन महसुलाच्या संदर्भात मौजेवारी पद्धत लागू करायची होती. एल्फिन्स्टनने महालवारी पद्धतीचा पुरस्कार केला नाही. कारण त्यास ग्रामपंचायत संस्था (जिला शेकडो वर्षांचा इतिहास होता) विस्कळीत होऊ द्यावयाची नव्हती. त्या पद्धतीत गाव पाटलाकडे वसुलीचे काम होते ते त्याने कायम ठेवले. प्रत्येक कुळाचा हिस्सा ठरवून त्याने तो सरकारला कळवावा हे काम त्याने गावपाटलावर सोपवले. जमीन महसुलाच्या पारंपरिक पद्धतीत जे किरकोळ बदल करण्याची भूमिका घेतली ती मात्र ब्रिटिशांना मान्य नव्हती. त्याच्या निवृत्तीनंतर मुंबई प्रांतात रयतवारी पद्धत सुरू झाली. एल्फिन्स्टन हा वृत्तपत्र स्वातंत्र्याबाबत सनातनी होता. भारतीयांना सरकारवर टीका करण्याचा अधिकार असू नये, त्यांनी राजकारणात भाग घेऊ नये या मताचा तो होता. वृत्तपत्र स्वातंत्र्याचा लष्करास धोका आहे असे तो म्हणत असला तरी १८२२ मध्ये मराठी लोकांना वृत्तपत्रे काढण्याची परवानगी त्याने दिली होती.

मुंबई प्रांताचा गव्हर्नर जॉन माल्कम (इ.स. १८२७-१८३०) :- एल्फिन्स्टनने मुंबई इलाख्याच्या प्रशासन व्यवस्थेची घडी बसविली होती. सरकारला कमीत कमी विरोध होईल याची त्याने काळजी घेतली होती. जनतेच्या

सामाजिक व धार्मिक जीवनात हस्तक्षेप करावयाचा नाही अशी त्याची भूमिका होती. एल्फिन्स्टननंतर सत्तेवर आलेल्या सर जॉन माल्कम यानेही हीच भूमिका ठेवून कारभार केला. शिक्षणाला उत्तेजन देण्याच्या एल्फिन्स्टनच्या धोरणाला मूर्त स्वरूप देण्याचा त्याने प्रयत्न केला. १८२९ मध्ये एका परिपत्रकान्वये जॉन माल्कमने गावठी शाळांची ग्रामीण प्रशासनाशी सांगड घालून त्यांनी एक प्रकारची प्रतिष्ठा मिळवून दिली. प्रशिक्षित शिक्षकांच्या संख्येत वाढ केली. स्थानिक भाषेतून शिक्षण देण्याच्या एल्फिन्स्टनच्या धोरणावर त्याने शिक्कामोर्तब केले.

माल्कमने अभियांत्रिकी ज्ञान सर्वांना खुले केले. शिक्षणाचा प्रसार करण्याच्या दृष्टीने हुशारविद्यार्थ्यांसाठी छोट्या मोठ्या पुरस्कारांची योजना त्याने आखली. माल्कमने महाबळेश्वरला थंड हवेच्या ठिकाणचा दर्जा दिला. नवीन रस्ते व पूल बांधले. जमिनीची मोजणी करून शेतसारा निश्चित करण्याचे काम पूर्ण केले. रयतवारी पद्धतीचा पुरस्कार केला. खानदेशातील भिल्लांचा उपद्रव कमी व्हावा म्हणून माल्कमने प्रयत्न केले. भिल्लांच्या मुलांसाठी शाळा उघडल्या. भिल्लांना समाजात मानाचे स्थान कसे मिळेल व एक विश्वासू व उपयुक्त समाज म्हणून त्यांची ओळख होईल असे त्याने प्रयत्न केले.

माल्कमने फावल्या वेळात *'Political History of India'* व 'मेमॉअर्स ऑफ सेंट्रल इंडिया' हा ग्रंथ लिहिला (१८२६). माल्कम पण वृत्तीने साम्राज्यवादी होता. ब्रिटिशांची सत्ता या उपखंडावर येणे समकालीन परिस्थितीचा विचार करता आवश्यक होते असे मत त्याने मांडले होते. माल्कमने उद्यान विज्ञानाकडे विशेष लक्ष दिले होते. १८३० मध्ये त्याने हॉर्टिकल्चर सोसायटीची स्थापना केली होती. ब्रिटिश राजवटीला विरोध अथवा सतत होणारी टीका त्याला मान्य नव्हती. म्हणून वृत्तपत्र स्वातंत्र्यास त्याचा विरोध होता. मराठी माणसाला ओळखून त्याप्रमाणे प्रशासनाची दिशा त्याने ठरविली.

**इ.स. १८३०-१८५७ या काळातील मुंबई प्रांताचे गव्हर्नर :-**

या काळात एकूण १३ गव्हर्नर झाले. पण त्यापैकी कोणीही विशेष कामगिरी केली नाही. त्या सर्वांनीच ब्रिटिश साम्राज्यवादाचे समर्थन केले. कायदा-सुव्यवस्था प्रस्थापित केली. महसूल गोळा केला. न्यायव्यवस्था मजबूत केली.

**रयतवारी पद्धत :-**

थॉमस मन्रो यांनी ही पद्धत मुंबई व मद्रास प्रांतांत सुरू केली. इ. स. १८२० पासून ही पद्धत मद्रास प्रांतात अस्तित्वात आली. त्यानंतर ही पद्धत मुंबई प्रांतात सुरू करण्यात आली (१८२९). या पद्धतीत शेतकरी व सरकार यांचा प्रत्यक्ष संबंध येतो. शेतकरी सरकारकडे म्हणजे शासकीय यंत्रणेकडे महसूल भरू शकतो.

रयतवारी पद्धतीत व्यक्तीला पुढील अधिकार आहेत -

१ ) जमीन स्वतः कसणे.

२) जमीन विकणे.

३) जमीन दान देणे.

४) जमीन दुसऱ्यास मोबदला देऊन कसणे.

५) वडिलोपार्जित जमिनीत सर्व मुलांना समान हिस्सा मिळविणे.

पण या पद्धतीत शेतकऱ्याने शेतसारा नियमितपणे भरला पाहिजे. शेतकरी जर शेतसारा देण्यात काही वर्षे चुकला तर ती जमीन सरकार स्वतः ताब्यात घेत असे. रयतवारी पद्धतीचा पहिला प्रयोग इंदापूर (जि. पुणे) येथे ब्रिटिशांनी केला. नंतर टप्प्याटप्प्याने तो सर्व महाराष्ट्रास लागू केला. या पद्धतीत सारा पेलवला तर त्याने जमीन
कसावी, नसता सोडून द्यावी असे त्यास सांगण्यात आले. नव्या सारा आकारणीचा सर्व शेतकऱ्यांना फटका बसला. एल्फिन्स्टनने इ.स. १८१५ मध्ये *Bombay Education Society* स्थापन केली. इ.स.१८१८ मध्ये मुंबईत फोर्ट भागात तसेच गिरगाव व माझगावला हायस्कूल सुरू केले. आपल्या प्रगतीसाठी शैक्षणिक उन्नतीसाठी भारतीयांनी पुढाकार घ्यावा असे त्याचे मत होते. रयतवारी पद्धत ५१ टक्के भूमीला लागू होती. मुंबई ॥ मद्रास इलाख्यांत ती प्रथा होती. या पद्धतीत जमीन महसूल हा कायम नव्हता तर २० ते १० वर्षानंतर जमीन महसुलात वाढ केली जाई. रयतवारी पद्धतीत सारा दोन प्रकारचा होता. एक म्हणजे कायम ठरवून दिलेला व दुसरा म्हणजे विशिष्ट काळापुरता ठरवून दिलेला.

**रयतवारी पद्धतीमधील गुण :-**

१) शेतकरी व सरकार यांच्यात या पद्धतीत कोणीही मध्यस्थ नव्हता. त्यामुळे शेतकऱ्यांचे शोषण होत नसे.

२) या पद्धतीत शेतसारा निश्चित नव्हता. सरकार नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी (दुष्काळ, अतिवृष्टी, रोगराई) शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सारा माफही करी.

३) या पद्धतीत शेतसारा सरकार वाढवूही शकत असे.

४) या पद्धतीत शेतीवर शेतकऱ्यांचा पूर्ण अधिकार असल्याने तो मेहनत करून आपले उत्पन्न वाढवू शकत असे.

न्या. रानडे यांनी इ.स. १८८० मध्ये म्हटले होते, 'रयतवारी पद्धती कायम करून उत्पादित होणाऱ्या धान्यापैकी किती भाग साऱ्याच्या रूपाने घ्यावयाचा हे ठरवून टाकावे हाच शेतीच्या प्रश्नावर हा एक उपाय दिसतो.' इ.स. १८८४ मध्ये न्या. रानडे म्हणतात, 'मुंबई प्रांतात रयतवारी पद्धत दीर्घकाळ चालू आहे आणि आमच्या ग्रामीण समाजाच्या लोकशाही घडणीस तीच योग्य आहे. आमची एवढीच मागणी आहे की, रयतांच्या जमिनीचा सारा कायम स्वरूपाचा करावा.'

**रयतवारी पद्धतीतील उणिवा :-**

१) शेतसारा वसुलीसाठी सरकारला बराच खर्च येई. त्यासाठी स्वतंत्र महसूल खातेच निर्माण करावे लागले.

२) शेतसारा ठरवित असताना सरकारी अधिकारी पक्षपाती वृत्ती दाखवत. ते त्यांच्या इच्छेनुसार शेतसारा ठरवित. या पद्धतीत जमीन महसुलाचे प्रमाण १/३ पासून १/ २ एवढे प्रचंड होते. एवढ्या मोठ्या प्रमाणात संस्थानिकही आपल्या प्रजेकडून जमीन महसूल घेत नाहीत असे खुद्द इंग्रज अधिकाऱ्यांनीच लिहून ठेवले आहे.

३) रयतवारी पद्धतीमध्ये जमिनीचा मालक आपली जमीन दुसऱ्याकडून (लगान पद्धतीने) प्रत्यक्षात करून घेत होता व

अशा पद्धतीने जमीन कसणाराचा एक वर्गच तयार झाला. प्रारंभी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीतर्फे व नंतर इंग्लंड सरकारमार्फत अमलात आणलेल्या व राबविलेल्या या जमीन महसुलाच्या पद्धतीचे भारतीय जनतेवर दूरगामी परिणाम झाले. या पद्धतीमुळे जमिनीची मालकी, जमीन कसण्याची पद्धत, खंड घेण्याची पद्धत, मालक व कूळ यांचे संबंध व समाजातील निरनिराळ्या घटकांचे एकमेकांशी असलेले कायदेशीर व सामाजिक संबंध बदलून गेले. पूर्वपरंपरेने चालत आलेली खेड्यांची सामाजिक व आर्थिक व्यवस्था पूर्णपणे ढासळली. खेड्यांची एकात्मता नष्ट होऊन समाजाचे विघटन झाले. जमीन ही सहजपणे खरेदी व विक्री करता येण्यासारखी वस्तू बनली. भूमी ही ग्रामीण भागात प्रतिष्ठेचे लक्षण मानली गेली.

**इनाम कमिशन (इ.स. १८५२) अनेकांच्या जमिनी सरकारजमा :-**

केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतातच जहागिरी, इनामी जमिनी मोठ्या प्रमाणावर होत्या. पूर्वीच्या हिंदू-मुसलमान राजवटींनी अनेक सरदार, जहागीरदार, इनामदार यांना जमिनी दिल्या होत्या व त्यांना शेतसारा माफ होता. मुंबई प्रांतातील या इनाम जमिनीची मालकी व शेतसारा माफी याची चौकशी करण्यासाठी मुंबई सरकारने इ.स. १८५२ मध्ये इनाम कमिशन नेमले. या कमिशनच्या अहवालानुसार सारा माफीतून सूट मिळालेल्या जमिनीवर सारा आकारण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाने सरकारच्या तिजोरीत ३७ लाख रुपयांची भर पडली. पण मुंबई प्रांतातील इनामदार (देशपांडे, देशमुख, कुलकर्णी, पाटील, जोशी, शेट्टी, काझी वगैरे) मंडळींनी नाराजी व्यक्त केली, अनेक इनामदारांकडे जमिनीच्या इनामदारीसंबंधीची मूळ कागदपत्रेच नव्हती. काळाच्या ओघात ती नष्ट झाली होती. सरकारने इनाम जमिनीची कागदपत्रे सरकारजमा करण्याचे आदेश दिले. पण सरकार ती कागदपत्रे नष्ट करते ही अफवा पसरल्याने अनेकांनी कागदपत्रे दडवून ठेवली. त्या सर्वांना इनाम जमीन गमवावी लागली. इनाम कमिशन 'जमीन बळकाव कमिशन' म्हणून कुप्रसिद्ध झाले. जनतेत ऐक्य, जागृती नसल्याने अनेकांना आपला जमिनीवरचा मालकी हक्क गमवावा लागला. इनामदारांच्या जमिनी बळकावण्याचे सरकारचे धोरण हे इंग्लंडमधल्या प्रस्थापित सिद्धांताविरुद्ध होते. ब्रिटिशांच्या उदारमतवादी धोरणाविरुद्धच इनाम कमिशनचे एकूण कामकाज होते.

**ब) ब्रिटिशपूर्व काळातील शिक्षण पद्धती :-**

ब्रिटिशपूर्व काळातील शिक्षण हे प्रामुख्याने पारंपरिक व धार्मिक स्वरूपाचे होते. त्यात मानवी मूल्ये, विज्ञाननिष्ठा, ऐहिकता इत्यादी गोष्टींचा अभाव होता. व्याकरण, न्याय, वैद्यकशास्त्र, ज्योतिष, वेदांत, अलंकार,

धर्मशास्त्र इत्यादी विषय शिकवले जात, विद्वान लोकांना श्रावण महिन्यात पर्वतीवर जमवून दक्षिणा वाटली जाई. खेड्यापाड्यांतून पंतोजीच्या शाळा असत. मंदिर, चावडी यांसारख्या सार्वजनिक ठिकाणी त्या भरत. छापील पुस्तके नसत. हस्तलिखित पोथ्यांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना शिकवले जाई. शिक्षणाचा भर पाठांतरावरच होता. कनिष्ठ वर्गातील लोकांना, स्त्रियांना शिक्षणाचा अधिकारच नाही अशी एक सार्वत्रिक समजूत होती. शिक्षण ही सरकारची जबाबदारीच नाही अशी शासनकर्त्यांची समजूत होती.

उत्तर पेशवाईत शिक्षण देणाऱ्या शाळाच नव्हत्या. खासगी शिक्षण विद्यार्थ्यांना मिळे. पण ते निवडक विद्यार्थ्यांना. शिक्षण हे लष्करी, धार्मिक स्वरूपाचे असे. मराठा सरदारांची मुझे युद्धोपयोगी शिक्षण घेत, तर ब्राह्मणांची मुले धर्मग्रंथ वाचण्याएवढेच शिकत. इतर जातीत क्षण फारसे नव्हते. ब्राह्मण सरदारांच्या स्त्रिया लिहिणे, वाचणे शिकत. उच्च शिक्षण, संशोधन याचा समाजाला गंधही नव्हता. जीवनोपयोगी शिक्षणाबाबत समाजाने कधीच
विचार केला नाही..

**ब्रिटिश राजवटीत (इ.स. १८१८-५८) मुंबई प्रांतातील शैक्षणिक प्रगती :-**

१) एल्फिन्स्टनचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन ब्रिटिशांची राजवट सुरू झाल्यानंतर मुंबई प्रांताच्या शिक्षण व्यवस्थेत खूप बदल झाले. इ.स. १८१९-२७ या काळात एल्फिन्स्टन हा मुंबई प्रांताचा गव्हर्नर होता. तो स्वतः फारसा शिकलेला नव्हता. वयाच्या १६ व्या वर्षी तो भारतात आला होता. शालेय शिक्षण खंडित झाले तरी त्याचे वाचन अफाट होते. ग्रीक, लॅटिन, फार्सी, इंग्रजी, फ्रेंच, इटालियन भाषेतील अक्षर वाङ्मय त्याने परिश्रमपूर्वक वाचून काढले होते. ज्ञानाविषयी त्यास प्रचंड आसक्ती होती. इ.स. १८११-१८ या काळात त्याने पेशवे, मराठा सरदार यांच्याविरुद्धच्या लष्करी मोहिमांत व सहाच्या वाटाघाटीत भाग घेतला होता.

मुंबई प्रांतात शिक्षणाचा प्रसार करण्याच्या कामी खिश्चन मिशनऱ्यांनी बराच पुढाकार घेतला होता; पण लोकांना शहाणे करण्यापेक्षा खिश्चन करून सोडणे यावर त्यांचा भर होता. एल्फिन्स्टन हा तर धर्म व शिक्षण यांची फारकत असली पाहिजे या मताचा होता. तसेच तो सनातनी वृत्तीचाही होता. प्रारंभीच्या काळात तरी वरच्या वर्गातील लोकांना शिक्षण दिले पाहिजे असेच त्याचे धोरण असावे. इ.स.१८२३ मध्ये त्याच्या एका पत्रात शिक्षणाचा उद्देश पुढीलप्रमाणे स्पष्ट झाला आहे.

१) शिक्षणाचा उद्देश केवळ इंग्रजी भाषा जाणणाऱ्या कारकुनांचा पुरवठा करणे एवढा
मर्यादित नाही तर ज्ञानाचा प्रसार समाजातील सर्व स्तरांत करणे हा आहे.

२) रयतवारी पद्धतीत जमिनीसंबंधी पट्टा किंवा कबुलायत मिळेल तो त्याला स्वतःला वाचता आला पाहिजे.

३)आपण सावकाराचे देणे किती लागतो हे व्यक्तीला समजावे व सावकारी पाशातून त्याची सुटका व्हावी.

४) एल्फिन्स्टनची शिक्षणविषयक योजना एल्फिन्स्टनने शिक्षणावर खूपच विचारमंथन केले होते असे दिसते. देशी भाषेतून शिक्षण द्यावे या मताचा तो होता. इ.स. १८१३ मध्ये ब्रिटिश सरकारने दरसाल १ लक्ष रु. शिक्षणासाठी खर्च करावेत असे ठरविले होते. एल्फिन्स्टनने इ.स. १८२३ मध्ये एक शिक्षणविषयक योजना तयार केली होती. त्यात त्याने पुढील उपाय सुचविले होते.

१) शाळांची संख्या वाढवावी.

२) स्थानिक शाळांमधून ज्या पद्धतीने शिकविले जाते त्यात सुधारणा करावी.

३) शाळांना उपयुक्त अशी पुस्तके पुरवावीत. ) खालच्या वर्गातील (कनिष्ठ) शिक्षणासाठी उत्तेजन द्यावे.

४) पाश्चात्त्य शास्त्रे शिकविण्याकरिता नवीन शाळा काढणे व त्यांच्याद्वारे पुढे उच्च

५) शिक्षणाच्या क्षेत्रांत सुधारणा करणे.

६) नैतिक व भौतिकशास्त्रांवरचे ग्रंथ स्थानिक भाषेतून तयार करून ते प्रसिद्ध करणे.

७) भारतीयांना ज्ञानाच्या विविध शाखांचा अभ्यास करण्यासाठी उत्तेजन देणे.

८) इंग्रजी ही एक भाषा म्हणून तसेच युरोपातील नवीन शोधांचे ज्ञान करून घेण्याची ज्यांना इच्छा असेल, त्यांच्यासाठी खास पाठशाळा उघडणे.

या एल्फिन्स्टन योजनेनुसार इ.स. १८२७ पर्यंत म्हणजे तो मुंबई प्रांताचा गव्हर्नरअसेपर्यंत या योजनेची त्याने अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला. इ.स. १८२४ मध्ये मुंबई येथे इंजिनिअरिंग कॉलेज सुरू झाले. पण इ.स.१८२७ मध्ये त्याने मुंबई सोडल्यामुळे त्याच्या बऱ्याच शिक्षणविषयक योजना अपूर्ण राहिल्या. लोकांच्या धार्मिक भावना न दुखविता शिक्षणाद्वारे त्यांच्या जीवनात योग्य ती प्रगती घडवून आणणे हे त्याच्या शिक्षणविषयक धोरणाचे सूत्र होते. इ.स.१८२० मध्येच '*Society for the Promotion of the Educa- tion of Poor*' ही संस्था काढून देशी भाषेतून शिक्षण देण्यास त्याने प्रारंभ केला होता. ३) *Bombay Eduction Society* ची स्थापना: मुंबई इलाख्यात कंपनीच्या वतीने निरनिराळ्या शाळा सुरू करण्यासाठी मुंबई येथे *Bombay Education Society* ही संस्था स्थापन करण्यात आली (इ.स. १८१५). या संस्थेने मुंबई, ठाणे व भडोच येथे ३ शाळा काढल्या. या संस्थेचा मुख्य उद्देश ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली असलेल्या प्रदेशातील जनतेला शिक्षणाचा प्रसार करणे हा होता. एल्फिन्स्टन हा या संस्थेचा अध्यक्ष व मुख्य आधारस्तंभ होता. इ.स. १८२४ मध्ये एल्फिन्स्टन हायस्कूल व इ.स. १८३५ मध्ये एल्फिन्स्टन कॉलेज सुरू झाले. महाराष्ट्रातील पहिली पिढी याच शाळा व कॉलेजमध्ये शिकली हे विशेष होय. प्रारंभी एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांची संख्या फारच अल्प होती. कारण उच्च शिक्षणाची गरजच नव्हती. थोडेसे इंग्रजी आले की नोकऱ्या सहज मिळत; पण महत्त्वाच्या पदांसाठी उच्च शिक्षण हवे अशी भूमिका घोषित होताच त्या कॉलेजच्या विद्यार्थी संख्येत भर पडली. इ.स. १८८९ मध्ये एल्फिन्स्टन कॉलेज स्वतः च्याइमारतीत (फोर्टमधील) स्थानापन्न झाले.

४) *The Bombay Native & School Book Society* ही संस्था एल्फिन्स्टनच्या प्रेरणेने इ.स. १८२२ मध्ये मुंबई येथे स्थापन झाली. शिक्षणासाठी निधी जमा करणे हे एक उद्दिष्ट होते. या संस्थेतर्फे अनेक शाळा निघाल्या. भारतीय भाषेतून ग्रंथनिर्मितीला चालना देण्याचे काम या संस्थेने केले. महत्त्वपूर्ण ग्रंथांची मराठी व गुजराती भाषांतरे झाली. इ.स.१८४० पर्यंत या संस्थेने याच नावाने शैक्षणिक कार्य चालू ठेवले होते.

५) लोकशिक्षण समितीची स्थापना इ.स. १८२३ मध्ये लोकशिक्षण समितीची स्थापना करण्यात आली. शिक्षणविषयक माहितीचे या समितीने संकलन करावे असे ठरले. १.स. १८१३ च्या सनदी कायद्यानुसार मान्य झालेले एक लाख रु. या समितीकडे सोपवण्यात आले होते. या समितीने आग्रा, दिल्ली येथे महाविद्यालये सुरू केली.

६) पुणे येथे संस्कृत कॉलेजची स्थापना: इ.स. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त शाला व ब्रिटिशांची राजवट सुरू झाली. या सत्तांतरामुळे उच्चवर्गीय ब्राह्मण वर्गात असंतोष निर्माण झाला होता. तो दूर करण्यासाठी एल्फिन्स्टनने इ.स. १८२१ मध्ये पुण्यात दक्षिणा फंडाच्या बचतीमधून 'संस्कृत पाठशाला' सुरू केली. त्यासाठी वार्षिक २ लक्ष रु. खर्च करण्याचे ठरले. या कॉलेजमध्ये वेद, वैद्यक, तर्क, न्याय, व्याकरण, ज्योतिष इत्यादी विषय शिकवले जात. या कॉलेजात प्रामुख्याने ब्राह्मण विद्यार्थीच शिकत असत. प्रारंभी या कॉलेजमध्ये १०० विद्यार्थी होते व प्रत्येकास ५ रुपये शिष्यवृत्ती मिळे. इ.स. १८२१ मध्ये शालेल्या संस्कृत कॉलेजचे स्वरूप पुढे बदलत गेल्याचे दिसते. इ.स. १८४० मध्ये या शाळेचे कॉलेजमध्ये रूपांतर करण्यात आले. इ.स. १८५१ पासून पुढे इंग्रजी भाषेला प्राधान्य देण्यात आले. एवढेच नव्हे तर 'संस्कृत कॉलेज' हे नाव बदलून 'पुना कॉलेज' हे नवे नाव दिले गेले. इ.स. १८६१ मध्ये या कॉलेजचे दोन विभाग करण्यात आले. इंग्रजी उच्च शिक्षण देणाऱ्या विभागाचे नाव 'डेक्कन कॉलेज' असे ठेवण्यात आले तर मराठीत उच्च शिक्षण देणाऱ्या विभागाचे नाव 'व्हर्नाक्युलर कॉलेज' असे ठेवण्यात आले. पण विद्यार्थी संख्येअभावी 'व्हर्नाक्युलर कॉलेज' बंद ठेवण्याची वेळ आली तेव्हा इ.स. १८६५ मध्ये त्याचे रूपांतर *Training College of Men* या पुरुष शिक्षकांना शिक्षक होण्याचे प्रशिक्षण देणाऱ्या कॉलेजमध्ये झाले.

७) मुंबईला अँट वैद्यकीय महाविद्यालय (इ.स. १८४५) इ.स. १८२२ मध्ये कोलकाता येथे एक मेडिकल स्कूल काढण्यात आले होते. त्याच धर्तीवर मुंबई येथे १८२६ ला एक मेडिकल स्कूल स्थापन झाले. कोलकाता येथे इ.स. १८३६ मध्ये एक वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले. मुंबईतही अशा प्रकारचे कॉलेज सुरू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. लोकांनी वर्गणी करून व काही सरकारी अनुदान प्राप्त करून इ.स. १८४५ ला मुंबईत मेडिकल कॉलेज सुरू झाले. इ.स. १८३६ मध्ये पुण्याजवळ अपघाती निधन झालेले गव्हर्नर सर रॉबर्ट अँट यांचे नाव महाविद्यालयास देण्यात आले.

इ.स. १८५१ मध्ये अँट मेडिकल कॉलेजमधून १० डॉक्टरची पहिली तुकडी बाहेर पडली. इ.स. १८६१ पासून मराठी भाषेतून शिक्षण दिले गेले.

८) बोर्ड ऑफ एज्युकेशन (इ.स. १८४०) ब्रिटिश सरकारने *Bombay Native Education Society* चे कार्य व सरकारी शाळांचे कार्य यांचे एकत्रीकरण करून *Board of Education* ची स्थापना केली. या संस्थेच्या अंतर्गत सरकारने इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे जाळे पसरविण्याचा प्रयत्न केला. *Board of Education* चे ३ सदस्य हे सरकारनियुक्त असत तर ३ सदस्य *Bombay Native Education Society* चे प्रतिनिधी असत. या मंडळास शाळांना मान्यता देण्याचे, शाळांची तपासणी करण्याचे अधिकार दिले होते. शिक्षणात भारतीय भाषांना योग्य उत्तेजन मिळावे म्हणून गुजराती व मराठी भाषेतून ग्रंथनिर्मिती केली. *Board of Education* च्या प्रयत्नांमुळेच मुंबई प्रांतात इंग्रजी व मराठी शाळांची संख्या वाढली व शैक्षणिक प्रगती घडून आली. मुंबई इलाख्यात इ.स. १८४८ मध्ये बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या नियंत्रणाखाली एकूण २१६ शाळा होत्या व तेथे १२००० विद्यार्थी शिक्षण घेत होते.

मुंबई प्रांतात शिक्षणाचा प्रचार व महत्त्व वाढविण्याच्या कामी वृत्तपत्रांचीही भूमिका महत्त्वाची आहे. 'दर्पण' पत्राचे संपादक बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण'मधील अनेक लेखांतून शिक्षणाचे महत्त्व मांडले. 'विद्या हेच बळ' या त्यांच्या एका लेखाचे शीर्षक बरेच बोलके आहे. 'दर्पण', 'प्रभाकर', 'ज्ञानोदय', 'ज्ञानप्रकाश', 'निबंधमाला' या सर्वच पत्रांनी शिक्षणाचे महत्त्व सांगून लोकांची शिक्षणासंदर्भात जागृती घडवून आणण्याचे काम केले. म. गो. रानडे यांनी 'महाराष्ट्रातील समाजविचार' या ग्रंथात म्हटले आहे, 'वरील पत्रे/नियतकालिके यांना सार्वजनिक शाळा किंवा विद्यालयेच म्हणावे लागेल.'

९) पेशव्यांच्या सैनिकांच्या विधवांसाठी एक निवृत्तीवेतननिधी एल्फिन्स्टनने उभा केला. इ.स. १८२७ मध्ये मुंबई एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूट स्थापन झाली होती.

**ख्रिश्चन मिशनऱ्यांचे शैक्षणिक कार्य :-**

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धात ख्रिश्चन मिशनऱ्यांनी ग्रंथनिर्मिती करून लोकांत शिक्षणाविषयी काही प्रमाणात का होईना आकर्षण निर्माण केले. *American Missionary Society* ने इ.स. १८२४ मध्ये मुंबई इलाख्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली. इ.स. १८२६ मध्ये मुलींच्या शाळेची संख्या ९ एवढी झाली. मुंबईत भायखळा येथे मुलींसाठी एक बोर्डिंग स्कूलही निघाले. इ. स. १८२९-३० मध्ये मि. विल्सन व सौ. विल्सन यांनी ६ शाळा काढल्या. *American Missionary Society* ने अहमदनगरमध्ये दोन शाळा काढल्या. इ.स. १८३४ मध्ये मुंबईत विल्सन कॉलेज हे मिशनरी कॉलेज स्थापन झाले. पुणे, अहमदनगर, राजकोट व सुरत येथेही मिशनरी शाळा स्थापन झाल्या होत्या. भारतात आधुनिक शिक्षण ब्रिटिशांनी का सुरू केले?

विल्यम बेंटिंगच्या काळात भारतीयांना शिक्षण देण्यासंबंधी दोन प्रवाह होते. सर एच. ए. विल्सनच्या मते भारतीयांना पौर्वात्य शिक्षण द्यावे, तर सर चार्लस ट्रॅव्हेलियनच्या मते भारतीयांना पाश्चात्त्य शिक्षण द्यावे. पण शेवटी इंग्रजी शिक्षणास / पाश्चात्त्य शिक्षणालाच अग्रक्रम द्यावा असा प्रस्ताव गव्हर्नर जनरलच्या कौन्सिलपुढे मांडला गेला व तो ७ मार्च १८३५ रोजी मंजूर झाला. हा प्रस्ताव लॉर्ड मेकॉले यांनी मांडला होता. पाश्चात्त्य पद्धतीचे इंग्रजी भाषेतील शिक्षण सुरू करण्यामागे ब्रिटिशांचे हेतू / उद्देश पुढीलप्रमाणे होते.

१) ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचे दप्तर हे इंग्रजी भाषेत होते. या दप्तरात किंवा कार्यालयात (*Office)* काम करण्यासाठी इंग्रजी भाषा जाणणाऱ्या मनुष्यबळाची ब्रिटिशांना गरज होती. ती गरज भारतीयांना इंग्रजी शिक्षण दिले तर पूर्ण होईल असा एक अंदाज होता. महणजेच कंपनीत कमी दर्जाच्या नोकऱ्यांवर भारतीय माणसेही (इंग्रजी भाषा जाणणारी) ब्रिटिशांना नेमावयाची होती.

२) इंग्रजी भाषा व पाश्चात्त्य विद्येच्या प्रसारामुळे रंगाने व वर्णाने भारतीय; पण आचारविचार, आवडीनिवडी, जीवनमूल्येही मात्र पाश्चात्त्याप्रमाणे असा एक वर्ग भारतात तयार होईल, हा वर्ग इंग्लंडमध्ये तयार होणाऱ्या वस्तूंची मागणी करेल व अशा ब्रिटिश वस्तूंच्या भारतातील विक्रीमुळे ब्रिटिशांचा फायदा होईल असा स्वार्थी आर्थिक विचार मनात हेवून आधुनिक पाश्चात्त्य शिक्षण येथे सुरू केले गेले.

३) इंग्रजी भाषा व पाश्चात्त्य विद्येच्या प्रसारामुळे भारतीय समाज इंग्लंडशी सांस्कृतिक धाग्यांनी बांधला जाईल. तो समाज पाश्चात्त्य संस्कृती आत्मसात केलेला असेल. ही गोष्ट ब्रिटिशांच्या दृष्टीने अभिमानाची ठरेल असा युक्तिवाद इंग्रजी भाषेचे पुरस्कर्ते करत होते.

४) पाश्चात्त्य विद्या शिकलेले भारतीय हे इंग्रजी सत्तेचे समर्थक बनतील असाही युक्तिवाद केला गेला. संस्कृतसारखे जुने शिक्षण देशाला दिल्याने भारत देश अज्ञानी राहील. देशाला इंग्रजी भाषा व विज्ञान या दोन्हींचाही परिचय करून दिला पाहिजे असे राजा राममोहन रॉय यांचे मत होते. इ.स. १८४४ मध्ये ग. ज. लॉर्ड हार्डींग यांनी इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीयांना शासकीय नोकऱ्या देण्याची भूमिका घोषित केली. त्यामुळे इंग्रजी शिक्षण घेणारांचे प्रमाण वाढले. लॉर्ड मेकॉलेने इंग्रजी भाषेविषयी अभिमानाने म्हटले होते, 'युरोपच्या एका चांगल्या ग्रंथालयातील एका अलमारीचा एक कप्पा म्हणजे भारत व अरबी साहित्यापेक्षा जास्त मूल्यवान आहे.'

**चार्लस वूडचा खलिता (इ.स. १८५४) :-**

'वूडचा खलिता' शिक्षणक्षेत्रातील महत्त्वाचे पाऊल मानले जाते. सर चार्लस वूड (नियामक मंडळाचा अध्यक्ष) च्या अध्यक्षतेखाली एक शिक्षणविषयक खलिता तयार करण्यात आला होता. त्यात भारतात शिक्षणाचा प्रसार करण्याविषयी व शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी पुढील मौलिक सूचना केल्या होत्या.

१) प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी स्थानिक भारतीयांनी काढलेल्या शाळांमधून
प्रादेशिक भाषेतून शिक्षण द्यावे, प्राथमिक शिक्षणास उत्तेजन द्यावे.

२) अशा खासगी शाळांना सरकारने अनुदान द्यावे.

३) माध्यमिक शिक्षणापर्यंत मातृभाषेतून शिक्षण द्यावे.

४) उच्च शिक्षणाचे माध्यम इंग्रजी असावे.

५) शैक्षणिक अभ्यासक्रमात धार्मिक शिकवण दिली जाऊ नये. शिक्षण धर्मातीत असावे.

६) स्त्री शिक्षणास सरकारने उत्तेजन द्यावे. भारतीय कुटुंबात मुलांवर संस्कार करण्याचे काम स्त्रिया करतात.

७) लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर मुंबई, कोलकाता, चेन्नई याठिकाणी विद्यापीठांची निर्मिती करावी व त्या त्या प्रांतातील महाविद्यालये त्या त्या विद्यापीठास संलग्न असू द्यावीत.

८) प्रत्येक प्रांतात स्वतंत्र शिक्षण खाते सुरू करावे. हे खाते शाळांची तपासणी करील.

९) शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी ट्रेनिंग स्कूल काढाव्यात.

१०) खासगी शाळा, कॉलेजेस काढण्याच्या समाजातील प्रवृत्तीला अनुदान देऊन प्रोत्साहन द्यावे.

११ ) इंग्रजी भाषेच्या शिक्षणाची मागणी जिथे होईल ती पूर्ण करावी.

१२) कनिष्ठ पातळीपासून उच्च पातळीपर्यंतच्या शिक्षणात सुसंवाद असावा.

१३) शिष्यवृत्ती योजना विविध स्तरावर सुसंबद्ध पद्धतीने निश्चित करावी.

'वूडचा हा खलिता म्हणजे भारतीय पाश्चात्त्य शिक्षण पद्धतीचा 'मॅग्नाचार्टा' च होय' असे इतिहासकारांचे मत आहे. युरोपियन कला, तत्त्वज्ञान, विज्ञान व साहित्य यांचा हिंदुस्थानात फैलाव करणे हे शिक्षणव्यवस्थेचे मुख्य ध्येय मानले गेले. पाश्चात्त्य ज्ञानाचा प्रसार झाल्यामुळे भारतातील ब्रिटिशांच्या साम्राज्याला धोका निर्माण होईल ही भीती निराधार आहे असे वूडचे मत होते. भारतीय शिक्षणव्यवस्थेचा पायाच या कायद्याने घातला होता. वूडच्या या सर्व शिफारशींचा प्रभाव पुढे ५० वर्षे राहिला हे विशेष. वूडच्या खलित्यातील तत्त्वे पुढे इंग्रज राज्यकर्त्यांना शिक्षणाच्या क्षेत्रात मार्गदर्शक ठरली. हिंदुस्थानातील शैक्षणिक इतिहासात वूडचा खलिता एक महत्त्वाचा टप्पा आहे. खासगी संस्थांना अनुदान देण्याच्या धोरणामुळेच भारतात शैक्षणिक संस्था सुरू झाल्या. स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्यानंतरही हेच अनुदानाचे धोरण कायम राहिले. लंडन विद्यापीठाच्या धर्तीवर मुंबई, कोलकाता व चेन्नई येथे ३ विद्यापीठे स्थापन करण्यात आली (इ.स. १८५७). शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण संस्था स्थापन केल्या गेल्या. प्रत्येक प्रांतात शिक्षण खात्याचा संचालक नेमून इन्स्पेक्टर्स, डेप्युटी इन्स्पेक्टर्सच्या नेमणुका केल्या.

इ.स. १८६२ मध्ये मुंबई विद्यापीठाची पहिली बी. ए.ची परीक्षा झाली. त्यात ६ पैकी ४ जण उत्तीर्ण झाले. ते चार न्या. रानडे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, बाबाजी आबाजी मोडक, बाबा गणेश वागळे हे होते. इ.स. १८७० ते इ.स.

१८८२ या काळात मुंबई विद्यापीठांतून विविध विद्याशाखांचे ६२५ पदवीधर बाहेर पडले. इ.स. १९०६ मध्ये समर्थ विद्यालय नावाची राष्ट्रीय शाळा प्रो. विष्णू विजापूरकर यांनी कोल्हापुरात सुरू केली. पुण्यातच इ.स. १८७४ मध्ये महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, इ.स. १८८२ मध्ये कॅम्प एज्युकेशन सोसायटी, इ.स. १८८८ मध्ये शिक्षण प्रसारक मंडळी या शिक्षण संस्था सुरू झाल्या. इ.स. १८८४ ला अहमदनगर एज्युकेशन सोसायटी, इ.स. १८९० ला राजापूरचे शिक्षण प्रसारक मंडळ, इ.स. १८९७ ला मुंबईची आर्यन एज्युकेशन सोसायटी इ.स. १८६० मध्ये पुणे शहरात 'पूना कॉलेज' निघाले. इ.स. १८६८ मध्ये त्याचेच 'डेक्कन कॉलेज' असे नामकरण झाले. इ.स. १८८५ ला 'फर्ग्युसन कॉलेज', इ.स. १९१६ ला 'न्यू पूना कॉलेज' (सध्याचे सर परशुराम भाऊ महाविद्यालय पुणे) निघाले. इ.स. १८६५ मध्ये पुण्यात इंजिनिअरिंग महाविद्यालय निघाले. याच महाविद्यालयात कृषीचे पण शिक्षण दिले जाई. इ.स. १९०७ मध्ये पुण्यात स्वतंत्र *College of Agriculture* सुरू झाले.

इ.स. १९१८ मध्ये कोकण एज्युकेशन सोसायटी तसेच इ.स. १८९२ मध्ये गोखले एज्युकेशन सोसायटी, जनरल एज्युकेशन सोसायटी पुणे या संस्था सुरू झाल्या व त्यांनी शिक्षणाचा मोठा प्रसार केला.

**हंटर कमिशन:**

सर चार्लस वूड खलित्याची अंमलबजावणी किती प्रमाणात झाली याची पाहणी करण्यासाठी लॉर्ड रिपन हा भारतात व्हाईसरॉय असताना सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली हंटर कमिशनची नियुक्ती करण्यात आली होती. इ.स. १८८२-८३ या काळात हंटर कमिशनने भारतातील विविध प्रांतांतील शिक्षण संस्थांना भेटी दिल्या. शैक्षणिक सोयीसुविधांची पाहणी केली. ज्या संस्था किंवा व्यक्तींना हंटर कमिशनकडे शैक्षणिक प्रश्नासंबंधी निवेदन द्यावयाचे असेल, सूचना करावयाच्या असतील तर कराव्यात असे जाहीरही करण्यात आले होते.
हंटर कमिशनने पुढील सूचना केल्या :-

१) उच्च शिक्षणात सरकारने जो पुढाकार घेतला तो कमी करून शाळा व कॉलेज स्थापन करणे व चालविणे ही जबाबदारी भारतीय लोकांकडेच सोपवावी.
२) खासगी शिक्षण संस्थांना (शाळा व महाविद्यालये) सरकारने अनुदान द्यावे.
३) कॉलेजसाठी सर्वसाधारण अनुदान व खास अनुदानाची पद्धत चालू करावी.
४) प्राथमिक शिक्षणास प्रोत्साहन द्यावे. प्रत्येक प्रांताने आपल्या उत्पन्नाचा ठरावीक हिस्सा बाजूस काढून ठेवावा.
५) सरकारी शाळा खासगी संस्थांकडे सुपूर्द कराव्यात.
६) सर्वच प्राथमिक शाळांची तपासणी देखरेख सरकारी शिक्षण अधिकाऱ्यांनी करावी.
७) मुस्लिम समाजातील शिक्षणास सरकारने उत्तेजन द्यावे.
८) शिष्यवृत्तीबाबत नवे नियम तयार करावेत.
९) फी आकारणीबाबत सर्वसाधारण सूत्र ठरवावे.
१०) विद्यार्थ्यांच्या शारीरिक तसेच नैतिक शिक्षणावर भर द्यावा.
११) प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी शहरातून नगरपालिकांवर व जिल्हा बोर्डावर सोपवावी.
१२) शासकीय व अशासकीय महाविद्यालयांतून नीतिधर्माची मूलभूत तत्त्वे शिकविणारी क्रमिक पुस्तके तयार केली जावीत.
१३) विद्यापीठांनी पर्यायी ऐच्छिक अभ्यासक्रम सुरू करावेत.
१४) कॉलेजमध्ये प्रत्येक सत्रात प्राचार्य किंवा एखाद्या प्रोफेसरने विद्यार्थ्यांच्या पुढे 'व्यक्तीची कर्तव्ये' या विषयावर व्याख्यान द्यावे.

प्राथमिक शिक्षणासंबंधी हंटर कमिशनने केलेल्या सूचनांची संख्या २३ होती.

**म. फुले यांचे शिक्षणविषयक विचार व हंटर कमिशनकडे मागणी :-**

महार, मांग आणि चांभार यामध्ये एम. ए., बी.ए. औषधालाही सापडत नाहीत असे ते म्हणत. खेड्यातील मुलांच्या भावी जीवनाला उपयुक्त होईल अशा त-हेचे शिक्षण त्यांना धावे व्यवहारज्ञान व व्यावसायिक कौशल्य यांचा

आपल्या शिक्षणक्रमात अंतर्भाव झाला पाहिजे असे ते म्हणत. ब्राह्मण शिक्षक हे मगरूर असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांविषयी सहानुभूती व आपुलकी असणारे शूद्रातिशूद्र समाजातील शिक्षक नेमावेत असे ते म्हणतात. धार्मिक, आर्थिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा मार्ग माही असे ते म्हणत. ब्रिटिशांचे शैक्षणिक धोरण त्यांना पसंत नव्हते. ते धोरण अन्यायकारक व अदूरदर्शीपणाचे आहे अशी त्यांची खात्री होती. हंटर कमिशनकडे त्यांनी पुढील मागण्या केल्या होत्या. (पाहा - याच ग्रंथातील म. फुले प्रकरण) म. फुले हे मानवतावादाचे उपासक होते. त्यामुळे त्यांचा शिक्षणविषयक दृष्टिकोनही जीवननिष्ठेशी सुसंगत असा होता.

**२० व्या शतकाच्या पूर्वार्धातील महाराष्ट्राची शैक्षणिक प्रगती :-**

इ.स. १९०० नंतरही शिक्षण संस्था काढून शैक्षणिक विकासात योगदान देणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था महाराष्ट्रात कार्यरत होत्या. धोंडो केशव कर्वे यांनी हिंगणे येथे महिला विद्यालय स्थापन केले व पुढे इ.स. १९१६ मध्ये एस.एन.डी.टी विद्यापीठ स्थापन केले. १.स. १९२० च्या असहकार चळवळीचा परिणाम म्हणून राष्ट्रीय शिक्षण संस्था स्थापन करण्यासाठी स्वातंत्र्य चळवळीतील नेते पुढे आले. पुण्यास टिळक महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन झाले (इ.स. १९२१). महाराष्ट्रात वेंगुर्ला, मालवण, रत्नागिरी, सातारा, अहमदनगर, अमळनेर, चिंचवड वगैरे ठिकाणी राष्ट्रीय शाळा निघाल्या. विदर्भात यवतमाळ, अकोला, खामगाव, नागपूर येथेही राष्ट्रीय शाळा निघाल्या. इ.स. १९२० मध्ये गुजरातमध्ये अहमदाबाद येथे राष्ट्रीय विद्यापीठ निघाले. खुद्द गांधीजी या विद्यापीठाचे कुलपती होते. इ.स. १९२१ मध्ये हिप्परगा येथे १९१७ ला उमरगा तालुक्यात गुंजोटी येथे श्रीकृष्ण विद्यालय, इ.स. १९१६ परभणी येथे नूतन विद्यालय या राष्ट्रीय शाळा सुरू झाल्या. इ.स. १९३० च्या असहकार आंदोलनाच्या काळातही शासकीय शिक्षण संस्थांवर बहिष्कार टाकला गेला व राष्ट्रीय शाळांची स्थापना केली गेली. मराठवाड्यात किमान वीस ठिकाणी राष्ट्रीय शाळा स्थापन झाल्या.

**शिक्षणाचे महाराष्ट्रावर काय परिणाम झाले?**

१) महाराष्ट्रात एक नवा मध्यम वर्ग उदयास आला.
२) रूढी परंपरा, अंधश्रद्धा यांचा प्रभाव कमी होण्यास मदत झाली.
३) इंग्रजी शिक्षणामुळे प्रशासनात काहींना नोकऱ्या मिळाल्या.
४) पाश्चात्त्य ज्ञान विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य आदींची ओळख महाराष्ट्रीयन लोकांना झाली.
५) जगाचा इतिहास, भूगोल आदींचे ज्ञान शिकलेल्यांना झाले.
६) उदारमतवादास चालना मिळाली.
७) समाजसुधारणा करण्यास समाजसुधारकांना प्रेरणा मिळाली.
८) राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली.
९) भारतीय भाषा, संस्कृती, धर्म याची ओळख जगास पटली.
१०) मराठी भाषा आधुनिक बनली. मराठी वाङ्मयात नवीन प्रवाह निर्माण झाले.
११) आधुनिक शिक्षणाने महाराष्ट्रातील सरंजामी वातावरण बदलले. पाश्चिमात्यिकरणाची प्रक्रिया सुरू झाली.
१२) इंग्रजी शिक्षणामुळे समाजात दोन वर्ग निर्माण झाले. इंग्रजी शिकलेला अल्पसंख्य वर्ग व दुसरा अशिक्षित वर्ग.
१३) इंग्रजी शिक्षणामुळे प्रादेशिक भाषांमध्ये असलेल्या ज्ञानाच्या अमूल्य ठेव्याकडे भारतीयांनी दुर्लक्ष केले.
१४) संस्कृत, पाली, अर्धमागधीतील ज्ञान, वाङ्मय कुजत गेले. इंग्रजीतील ज्ञान मिळवण्याकडे लोकांची प्रवृत्ती वाढू लागली.

शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांत ४० टक्क्यांपेक्षा जास्त विद्यार्थी शासकीय अधिकाऱ्यांची मुले असत. खिश्चन, पारशी, अँग्लो इंडियन यांचे शिक्षणात मोठे प्रमाण होते. बहुजन समाज, दलित, आदिवासी हे शिक्षणापासून दूरच होते.

**क) मुद्रण व वृत्तपत्रे (*Press) :-***

**प्रास्ताविक :**

मुद्रणकलेचा शोध इ.स. १४३९ मध्ये गटेनबर्ग याने लावला. मुद्रणामुळे मानवी संस्कृतीमध्ये ज्ञानाचे, ऐश्वर्याचे, लोकशाहीचे व मानवतेचे एक अपूर्व असे सुवर्णयुगच सुरू झाले. भारतात मुद्रणाची सुरुवात गोव्यात झाली. त्यानंतर भारताच्या पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरील शहरांतून मुद्रणाचा फैलाव झाला.

भारतात मुद्रणकला व वृत्तपत्रे यांचा प्रारंभ ब्रिटिशांच्या राजवटीत झाला. भारताप्रमाणेच मुंबई प्रांतातील वृत्तपत्रांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत वाटचाल केली आहे. १९ व्या शतकात जी सामाजिक व सांस्कृतिक आंदोलने उदयास आली. त्यामागे मुख्य प्रेरणा तत्कालीन वृत्तपत्रांचीच होती.

*Times of India* हे पत्र *Bombay Times, Standard* व टेलिग्राफ या ३ पत्रांचे एकत्रीकरण होऊन सुरू करण्यात आले होते. पण इंग्रजी भाषेचा फारसा प्रचार नसल्याने त्याचा जनतेवर विशेष परिणाम झाला नाही. टाइम्स ऑफ इंडिया, पायोनिअर एशियन ॲडव्होकेट ऑफ इंडिया, स्टेटसमन ही सर्व सरकार धार्जिनी अंग्लो इंडियन पत्रे होती. मुंबई हे शहर ब्रिटिश साम्राज्याचे एक महत्त्वाचे सांस्कृतिक तसेच व्यापारी केंद्र असल्याने तेथून इंग्रजीतील पत्रे निघणे साहजिकच होते. खिश्चन धर्मप्रसाराचे केंद्र, शैक्षणिक उपक्रमाचे केंद्र हे मुंबई शहरच होते. त्यामुळे मुंबईत मराठी वृत्तपत्र सुरू होण्यापूर्वीच इ.स. १७८९ ला *'Bombay Herold'* हे इंग्रजी पत्र सुरू झाले. यावेळी पुणे ही पेशव्यांची राजधानी होती. मुंबई व पुणे या शहरांची स्थिती तेव्हा एकदम भिन्न होती. पुणे शहरावर तेव्हा जुन्या कल्पनांचा पगडा होता. इंग्रजी जाणणारे तेव्हा पुण्यात हजार-पाचशेही असतील. पुण्यातून इंग्रजी पत्र सुरू होण्याचा तेव्हा तरी मुळीच प्रश्न होता. केसरी, मराठा, संषकाश, नेटिव्ह ओपिनिअन, महाराष्ट्र मित्र, अरुणोदय, सूर्योदय, पुणे वैभव, प्रभाकर या पांच संपादक ब्राह्मणच होते. 'काळ' या पत्राचे संपादक शि. म. परांजपे ब्राह्मणच होते. ॥.स. १८२९ मध्ये मुंबई, इ.स. १८३८ मध्ये अहमदनगर, इ.स. १८४० मध्ये नाशिक, इ.स. १८४८ मध्ये पुणे येथे सार्वजनिक ग्रंथालये स्थापन झाली. तेथे संस्कृत, मराठी, इंग्रजी ग्रंथ असत. वृत्तपत्रेही येत. त्यामुळे सामाजिक प्रबोधन व राष्ट्रवादाचा पाया घातला गेला.
१९ वे शतक हे उदारमतवादी तत्त्वज्ञानाचा उत्कर्ष होत असलेला काळ होय. वैचारिक कांतीच्या आंदोलनाची पार्श्वभूमी मराठी वृत्तपत्रांनी १९ व्या शतकात तयार केली. १९ व्या शतकात महाराष्ट्रात घडून आलेल्या सामाजिक स्थित्यंतरांचे प्रतिबिंब प्रारंभिक मराठी विपत्रांमध्ये दिसून येते. १९ व्या शतकाच्या प्रारंभी मराठी वृत्तपत्रांमुळे तत्कालीन समस्यांविषयीच्या लोकांच्या जाणिवा जागृत होऊन सामाजिक परिवर्तनाचे चक्र गतिमान झाले. १९ व्या शतकात तत्कालीन मराठी वृत्तपत्रांनी जुन्या सामाजिक मूल्यांच्या संदर्भात मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. डॉ. निर्मलकुमार फडकुले यांच्या मते, '१९ व्या शतकात महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तनांच्या चळवळींची जी लाट उचंबळून आली तिचे श्रेय तत्कालीन मराठी वृत्तपत्रांकडे जाते. महाराष्ट्राचे मन, त्यांच्या आकांक्षा, त्यांचे जय-पराजय मजन घ्यायचे असेल तर या वृत्तपत्रांनी केलेल्या कार्याकडे दृष्टी टाकल्याशिवाय गत्यंतर नाही.'

**१) दर्पण:** 'दर्पण' या पत्राने मराठी वृत्तपत्रसृष्टीत नवे पर्व सुरू झाले. बाळशास्त्री अभिकरांनी आपल्या 'दर्पण' वृत्तपत्रातून समता व व्यक्तिस्वातंत्र्य तत्त्वावर समाजाची पुनर्रचना करायचा प्रयत्न केला. जांभेकरांनी 'दर्पण' च्या माध्यमातून सुधारकांची एक नवी परंपरा निर्माण केली. जांभेकरांनी 'दर्पण'च्या माध्यमातून एक नवे मन्वंतर घडवून आणले. पत्र साडेआठ वर्षे चालले. पहिल्या वर्षाच्या अखेरीस ३०० वर्गणीदार होते.

**२) प्रभाकर :** 'प्रभाकर' पत्राचे संपादक भाऊ महाजन हे कोणाचीही पर्वा न करता स्वतंत्रपणे मत व्यक्त करणारे सुधारक पत्रकार होते. हे पत्र २१ वर्षे चालले. भारतातील अनेक वृत्तपत्रांतील मजकूर भाषांतरित करून या पत्रात छापला जाई. साताऱ्याच्या प्रतापसिंगाचे नकरण या पत्राने उचलून धरले होते. फ्रेंच क्रांतीची माहिती देणारी लेखमाला छापली होती. मिटिश राजवटीचे दोष दाखविले तसेच फायदेही पत्रात मांडले. 'प्रभाकर' पत्राच्या माध्यमातून त्यांनी पाश्चात्त्य शिक्षणाचे, नव्या विचारांचे डोस पाजून ज्ञानसंपन्न समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला. 'प्रभाकर' पत्राने स्वधर्म, स्वभाषा व स्वसंस्कृती यांची बाजू उचलून धरली. वृत्तपत्र व्यवसायाला सामाजिक परिस्थिती अनुकूल नसूनही त्यांनी पूर्ण वेळ रूपात वृत्तपत्र व्यवसाय निवडला. भाऊ महाजन यांनी भारतीय संस्कृती, भाषा याविषयी 'प्रभाकर' मधून स्वाभिमानी विचार प्रकट केले. महाजन यांनी 'प्रभाकर' या पत्राबरोबरच 'धूमकेतू' साप्ताहिक (इ.स. १८५३) व 'ज्ञानदर्शन' या नावाचे त्रैमासिक (इ.स. १८५३) ही पत्रेही सुरू केली. भारतीय समाजातील अनिष्ट चालीरीतींवर त्यांनी टीका केली. तसेच ख्रिश्चन धर्माच्या प्रचाराच्या विरोधात त्यांनी सडेतोड उत्तरे दिली. 'प्रभाकर' पत्रातूनच लोकहितवादींची शतपत्रे नियमितपणे प्रकाशित झाली. 'प्रभाकर' पत्रातून भाऊ दाजी यांनी स्वकीयांचे दोष मांडले. भाऊ महाजन यांनी 'धूमकेतू' या साप्ताहिकाचा सामाजिक जागृतीसाठीच उपयोग करून घेतला.

**३) ज्ञानोदय** :- 'ज्ञानोदय' हे ख्रिश्चन मतांचा पुरस्कार करणारे पत्र होते. इ.स. १८४२ मध्ये रे. हेन्री बॅलेंटाईन यांनी 'ज्ञानोदय' हे पत्र इंग्रजी व मराठी भाषेतून सुरू केले. अमेरिकन मिशनरींनी हे पत्र काढले होते. हिंदू धर्मातील अंधश्रद्धा, परंपरा व अनिष्ट रूढी, चालीरीती यावर 'ज्ञानोदय'ने टीका केली. त्यांच्या या टीकेमुळे हिंदू धर्मात सुधारणा होण्यास एक प्रकारची मदत झाली होती. 'ज्ञानोदय'चा मुख्य उद्देश समाजात ज्ञानाचा प्रसार करणे हा होता. 'ज्ञानोदय'ने नवे तत्त्वज्ञान, नवी युरोपियन संस्कृती याचा प्रभाव जनतेवर निर्माण व्हावा यासाठी प्रयत्न केले. या पत्रात इ.स. १८४२ मध्ये आशिया खंडाचा व इ.स. १८५१ मध्ये युरोपचा नकाशा छापला होता. इ.स. १८५७ च्या संघर्षाच्या बातम्या या पत्रात छापल्या होत्या. हे पत्र अहमदनगर येथून प्रकाशित होई.

**४) निबंधमाला** : २४ जानेवारी १८७४ ला विष्णुशास्त्री चिपळूणकरांची निबंधमाला सुरू झाली. तिसऱ्या वर्षी निबंधमालेचे ६५० एवढेच ग्राहक होते. त्यांनी 'निबंधमालेतून' स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांचा जोरदार पुरस्कार करून लोकांतील अभिमान जागृत केला. निबंधमालेचे फक्त ८४ अंक निघाले. निबंध या प्रकाराला निबंधमालेने प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

**५) शतपत्रे** लोकहितवादींनी 'शतपत्रां'तून नवनिर्मितीचा ज्वलंत विचार शास्त्रीय दृष्टीने व आग्रहाने मांडून लोकांच्या गळी उतरविला. समाजातील अनिष्ट परंपरा, रीतिरिवाज, स्त्री शिक्षण, धर्म यासंबंधी परिवर्तनवादी लिखाण 'शतपत्रां' तून प्रकाशित झाले होते.

**६) इंदुप्रकाश** :- विष्णू परशुराम पंडित यांनी हे पत्र इ.स. १८६२ मध्ये सुरू केले. सुरक्षित सरकारी नोकरीचा त्याग करून त्यांनी हे धाडस केले. हे पत्र इंग्रजी व मराठी असे द्विभाषी होते. या पत्राने सामाजिक सुधारणेचा कट्टर पुरस्कार केला होता. विधवा विवाह, स्त्री शिक्षण इत्यादी सामाजिक प्रश्नांचा पाठपुरावा करून सामाजिक व सांस्कृतिक सुधारणांचा पुरस्कार केला होता. न्या. नारायण गणेश चंदावरकर यांनी इंदुप्रकाश'च्या संपादकीय विभागात काम केले. इ.स. १८६७ मध्ये स्थापन झालेल्या प्रार्थना समाजाचे हे पत्र व्यासपीठ होते. नवविचारांचा, नवमतांचा प्रसार या पत्राने केला. मामा परमानंद, प्रा. न. र. फाटक, न्या. म. गो. रानडे, न्या. तेलंग, न्या. चंदावरकर, त्र्यं. वि. पर्वते यांनी या पत्राची धुरा सांभाळली. हे पत्र ६२ वर्षे चालले. हे पत्र पुढे 'लोकमान्य' मध्ये विलीन झाले.

**७) अरुणोदय:** हे पत्र ठाणे येथून इ.स. १८६६ पासून काशीनाथ विष्णू फडके यांनी सुरू केले. 'अरुणोदय' मध्ये सामाजिक व राजकीय प्रश्नांना प्राधान्य देण्यात येत असे. राजकीय प्रश्नांत या पत्राचे धोरण ब्रिटिश सत्तेला प्रखर विरोध करणे हे होते. 'अरुणोदय' या पत्राने बातमीदार नेमण्याची प्रथा सुरू केली.

**८) नेटिव्ह ओपिनियन** ४ जानेवारी १८६४ रोजी इंग्रजीत व १ जुलै १८६६ रोजी इंजी व मराठी भाषेत हे पत्र निघत होते. विश्वनाथ नारायण मंडिलक यांनी नेटिव्ह आपिनियन' हे पत्र सुरू केले. या वृत्तपत्रात नारायण परांजपे, हरिभाऊ परांजपे यांनी वीर्घकाळ लेखन केले. इ.स. १८८५ ते १८८८ च्या काळात 'नेटिव्ह ओपिनियन' पत्राने खमाबाई खटल्यात सनातनी विचारसरणीला पाठिंबा दिला. राजकीय, सामाजिक व नैतिक विषयावर या पत्राने आपली स्वतंत्र मते प्रसिद्ध केली होती. इ.स. १८६१ पासून 'नेटिव्ह ओपिनियन' च्या एका पानावर हायकोर्टाचे निवाडे देण्यात येत असत.

**९) दीनबंधू** : कृष्णराव भालेकर यांनी पुण्यामधून १ जानेवारी १८७७ रोजी 'नबंधू' हे पत्र सुरू केले. या पत्राने शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, सावकारशाहीचे दोष बावर लिखाण केले. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आग्रह या पत्राने धरला. 'दीनबंधू' हे पत्र लोकशिक्षणाचे, लोकजागृतीचे एक प्रभावी माध्यम म्हणून वाढले. 'दीनबंधू'च्या वर्गणीदारांची संख्या इ.स. १८८० मध्ये ३२० होती. 'दीनबंधू'चे स्थलांतर इ.स. १८९० मध्ये मुंबईत होऊन नारायण मेघाजी लोखंडे हे संपादक झाले.

**१०) ज्ञानप्रकाश** :- १२ फेब्रुवारी १८४९ रोजी कृष्णाजी रानडे यांनी संपादित कलले 'ज्ञानप्रकाश' साप्ताहिक पुण्यात सुरू झाले. 'सत्य-सौख आणि ज्ञान' हे ब्रीद बाळगणारे 'ज्ञानप्रकाश' हे महाराष्ट्राचे पहिले दैनिक होय. ज्ञानसंग्रह, ज्ञानसंवर्धन व नप्रसार हे या पत्राचे हेतू होते. या पत्रातून लोकहितवादी, कृष्णशास्त्री चिपळूणकर हे लिखाण करीत. १८ सप्टेंबर १८७१ च्या अंकात इंग्रजांच्या पाश्चिमात्य संस्कृतीचा महाराष्ट्रातील समाजावर पडलेल्या प्रभावाचे वर्णन आहे. १२ नोव्हेंबर १८४९ च्या अंकात सुशिक्षित लोकांमध्ये मद्यपानाची सवय वाढत चालल्यामुळे चिंता व्यक्त करण्यात आली हाती. ३ डिसेंबर १८६० च्या ज्ञानप्रकाशातील एका स्फुटात मुलांना अलंकाराऐवजी जानाने शोभवावे असे म्हटले

होते. वेश्यागमन व व्यभिचारावरही 'ज्ञानप्रकाश' ने हल्ला कला होता. ब्राह्मणांनी ब्राह्मणेतरांना संस्कृत शिकवावे की नाही या विषयावरून पुण्याच्या 'ज्ञानोदय' व 'ज्ञानप्रकाश' मध्ये चांगलीच जुंपली होती. पुढे या वादात 'प्रभाकर' हे पत्रही उतरले. 'ज्ञानप्रकाश' हे पत्र १०० वर्षे चालले. इ.स. १८५३ ला ते द्विसाप्ताहिक होते. इ.स. १९०४ पासून ते दैनिक होते. 'ज्ञानप्रकाश' हे समतोल विचारांचे पत्र होते. सामाजिक इतिहासाचे साधन म्हणून हे पत्र अत्यंत महत्त्वाचे आहे. गोपाळकृष्ण गोखले, प्रो. भानू, श्री. लिमओ, प्रो. काळे हे फर्ग्युसन कॉलेजमधील प्राध्यापक या पत्रात लेखन करीत. इ.स. १९५१ पर्यंत हे पत्र चालू होते.

**११) सुबोधपत्रिका** :- प्रार्थना समाजाचे हे मुखपत्र होते. ४ मे १८७३ ला ते सुरू झाले. इंग्रजी, मराठी व काही काळ गुजराती भाषेत ते प्रसिद्ध होई. सत्यमेव जयते हे यां पत्राचे ब्रिदवाक्य होते. या पत्रात मामा परमानंद, रा. गो. भांडारकर आणि न्यायमूर्ती तेलंग यांनी लेखन केले. पण या पत्राचा खप फार नव्हता. हे पत्र धार्मिक व सामाजिक सुधारणांची चर्चा करी.

**१२) प्रगती** : हे साप्ताहिक इ.स. १९२९ ला सुरू झाले. त्याचे संपादक त्र्यंबक केशव शेजवळकर होते. इतिहासशास्त्र, महाराष्ट्राचा इतिहास, सामाजिक चळवळी इत्यादी विषयांवर त्यांनी विपूल इतिहासलेखन केले आहे.

खिश्चन मिशनऱ्यांना मराठी वृत्तपत्रांचा विरोध खिश्चन मिशनऱ्यांनी धर्मातराची जी चळवळ चालू ठेवली होती त्यालाही मराठी वृत्तपत्रांनी प्रखर विरोध केला. 'प्रबोधन चंद्रोदय' या वृत्तपत्राने १ मार्च १८५१ च्या अंकात 'ढोंगी खिस्ती लोक' असे शीर्षक देऊन त्यांच्यावर टीका केली. 'उपदेश चंद्रिका' व 'विचारलहरी' या दोन्ही पत्रांनी खिश्चन मिशनऱ्यांच्या हालचालीवर टीका केली होती. खिस्ती धर्मप्रसाराला आवर घालण्यासाठी १८५५ मध्ये मुंबईहून 'सध्दर्मदीपिका' हे मराठी पत्र सुरू करण्यात आले. भाऊ महाजन यांनी 'प्रभाकर' व 'धूमकेतू' या पत्रांतून मिशनऱ्यांच्या धार्मिक आक्रमणांचाही सर्व शक्तीनिशी प्रतिकार केला होता. 'वर्तमानदीपिका' या नावाचे एक पत्र इ.स. १८५३ मध्ये खिस्ती धर्मप्रसाराला विरोध करण्यासाठी निघाले.

**११) 'सुधारक'** इ.स. १८८७ मध्ये आगरकरांनी 'केसरी'च्या संपादकपदाचा राजीनामा देऊन इ.स. १८८८ मध्ये स्वतःचे 'सुधारक' पत्र चालू केले. इ.स. १८९५ पर्यंत (मृत्यूपर्यंत) प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत देत या पत्रातून सामाजिक सुधारणेचे विचार मांडले. व्यक्तिस्वातंत्र्य व बुद्धिप्रामाण्य ही या पत्राची दोन वैचारिक अधिष्ठाने होती. (अधिक माहिती गो. ग. आगरकर या उपघटकात आहे.)

**१२) करमणूक** : ह. ना. आपटे यांनी इ.स. १८९० च्या दशकात हे पत्र सुरू केले. 'पण लक्षात कोण घेतो' ही कादंबरी याच पत्रातून त्यांनी प्रसिद्ध केली. या पत्राने बरीच लोकप्रियता मिळविली होती.

**१३) सुबोध पत्रिका** हे पत्र इ.स. १८७४ मध्ये सुरू झाले. धर्मकारण व राजकारण हे सुबोध पत्रिकेचे मुख्य क्षेत्र होते. प्रारंभी मराठी भाषेत व नंतर इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेत हे पत्र प्रकाशित होई. स्त्री शिक्षण, उच्च शिक्षण, नीतिविषयक चर्चा, राजकीय चळवळी इत्यादी विषयांची तात्त्विक स्वरूपाची चर्चा या पत्रात केल्याचे दिसते.

**१४) हिंदुपंच** :- या पत्राने तत्कालीन समस्या उपहास, उपरोध, विसंगती, अतिशयोक्तीयुक्त लेख व सचित्र प्रसिद्ध (व्यंगचित्र) करून त्यास वाचा फोडली.

**१५) विचारलहरी** : कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचे 'विचारलहरी' हे पुण्यातून प्रकाशित होणारे पत्र खिश्चन मिशनऱ्यांचा कडवा प्रतिकार करीत असे. उपदेशपत्रिका व 'सद्धर्मदीपिका' ही भारदस्त नावे असलेली वर्तमानपत्रेही खिश्चन मिशनऱ्यांशी कडवी झुंज देत होती. १६) उदय : हे पत्र अमरावतीहून निघे. ना. रा. बामणगावकर संपादक होते.

१७) ज्ञानदर्शन (इ.स. १८५४), प्रभोदय (इ.स. १८५६), सद्धर्मदीपिका, स्त्रीभूषण ही नियतकालिके प्रकाशित होत होती.

**१८) केसरी, काळ** : 'काळ' हे पत्र इ.स. १८९८ मध्ये शिवराम महादेव परांजपे पांनी सुरू केले. 'काळ' पत्राचा ताजा अंक मिळावा म्हणून त्या पत्राच्या कचेरीभोवती लोक सीं करत. जहाल व राष्ट्रवादी लेखनासाठी 'केसरी' प्रसिद्ध होते. टिळक, आगरकर, पिपळूणकर, वामन आपटे ही मंडळी 'केसरी'त काम करीत होती. पण 'केसरी'त वैचारिक मतभेद निर्माण झाल्याने आगरकर व इतरांनी 'केसरी' सोडले. पण टिळकांचे कार्य व नेतृत्व जसजसे विकसित होत गेले तसतसे 'केसरी' लोकप्रिय होत गेले. 'केसरी' पत्राचे समकालिन पत्र 'डेक्कन हेराल्ड' नेही राष्ट्रीय जागृतीच्या चळवळीत योगदान दिले.

जी वृत्तपत्रे सरकारच्या विरोधात होती त्यांच्यावर सरकार कारवाई करी. इ.स. १८३५ पर्यंत वृत्तपत्रांची संख्या मर्यादित होती. इ.स. १८३५-१८५७ या काळात वृत्तपत्रांना बऱ्यापैकी स्वातंत्र्य होते. इ.स. १८५७ मध्ये देशभर उठाव झाल्यामुळे वृत्तपत्रांवर निर्बंध असत. जिल्ह्याच्या गावातून इ.स. १९०० पर्यंत वृत्तपत्रे निघत होती. एकूण या वृत्तपत्रांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक तक्रारींना, अन्यायास वाचा फोडली. मुंबई प्रांताचा पहिला गव्हर्नर एल्फिन्स्टन हा उदार प्रवृतीचा असला तरी वृत्तपत्र स्वातंत्र्य या देशात सुसंगत होणार नाही, त्यातून धोका निर्माण होणार नाही असे त्याचे मत होते. सरकार व जनता यांच्यात आपुलकीचे संबंध प्रस्थापित होईपर्यंत वृत्तपत्रांना कोणतेही स्वातंत्र्य देऊ नये या मताचा तो होता. ब्रिटिशांचे बहुतांश अधिकारी मुद्रण स्वातंत्र्याचा पुरस्कार करीत असले तरी वृत्तपत्रांना पूर्ण स्वातंत्र्य बहाल करावे या मताचे नव्हते. इ.स. १८२८ साली लॉर्ड बेंटिंग हा ग.ज. या पदावर आला. तो उदारमतवादी व पुरोगामी विचारांचा पुरस्कर्ता होता. तो वृत्तपत्र स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता होता. वर्तमानपत्राच्या प्रसारामुळे देशातील अज्ञान दूर होईल असे त्याला वाटे. देशी भाषेतील वृत्तपत्रांपासून ब्रिटिश सत्तेला धोका होईल ही भीती निरर्थक आहे असे त्याचे मत होते. सर चार्लस मेटकाफही वृत्तपत्र स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता होता. त्याच्याच काळात वृत्तपत्रांना स्वातंत्र्य बहाल करण्यात आले. तो भारतीय वृत्तपत्रांचा मुक्तिदाता होता. ब्रिटिशांच्या सुरक्षिततेला बाधा येणार नाही इथपर्यंत वृत्तपत्रांना स्वातंत्र्य द्यावे या मताचा तो होता. भारतातील सर्व प्रांतांत वृत्तपत्र निर्बंधांबाबत समानता असावी या मताचा तो होता. इ.स. १८३६-५६ या काळात वृत्तपत्रांना चांगलेच स्वातंत्र्य होते. लॉर्ड लिटन याने व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट पास करून (इ.स.१८७८) वृत्तपत्रांवर अनेक निर्बंध घातले. देशातील वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करणारा हा पहिला कायदा होय. मुंबई प्रांतातील वृत्तपत्रांनी त्या कायद्याचा निषेध केला होता. इ.स.१८७८-७९ मध्ये मुंबई इलाख्यात एकूण ७७ वृत्तपत्रे प्रसिद्ध होत होती तर १९ व्या शतकाच्या शेवटी ही संख्या १७८ वर पोहोचली. इ.स. १८४०-१९०० या काळात ११५ मराठी मासिके सुरू झाली. प्रारंभीची मराठी वृत्तपत्रे बातम्यांपेक्षा समाजाला ज्ञान देण्याचा अधिक प्रयत्न करत. भौतिक विज्ञानाची भरपूर माहिती त्यात असे. एकंदरीत १९ व्या शतकातील प्रारंभीच्या मराठी वृत्तपत्रांनी समाज प्रबोधनाचे मोठे कार्य केले. सर्वच सामाजिक प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न या वृत्तपत्रांनी मांडले. मराठी वृत्तपत्रांच्या कामगिरीमुळे समाजात नव्या शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय जाणिवांचा विकास झाला.

या वृत्तपत्रांनी लोकशिक्षणाची भूमिका बजावली. १९ व्या शतकात दर्पण, प्रभाकर, ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, शतपत्रे या पत्रांनी सांस्कृतिक जागरणाचे कार्य केले. या वृत्तपत्रांनी समाजातील भ्रामक कल्पना, अंधश्रद्धा यांना हादरे दिल्याने समाजात वर्तनबदलाची प्रक्रिया सुरू होऊन सामाजिक चळवळीला गती मिळाली. महाराष्ट्राची शैक्षणिक, सामाजिक वा धार्मिक विचारांची घडण होण्यास वृत्तपत्रांची भूमिका महत्त्वाची ठरली. जागृतीचे नवे पर्व सुरू झाले. महाराष्ट्रातील वृत्तपत्रांनी स्वातंत्र्य आंदोलनाचा उदय व विकासात गौरवशाली भूमिका बजावली. इ.स. १९०८ मध्ये 'राष्ट्रमत' हे दैनिक मुंबईतून सुरू झाले. केशवसुतांचे भाऊ सीताराम केशव दामले हे या पत्राचे पहिले संपादक होते.

**४) ख्रिश्चन मिशनऱ्यांचे कार्य :-**

खिश्चन धर्माच्या प्रसाराचे काम करणाऱ्या संस्थांना 'मिशनरी' हे नाव आहे. येशू खिस्ताचा महान संदेश जगाच्या कानाकोपऱ्यात नेऊन पोहोचविण्याचे कार्य खिश्चन मिशनऱ्यांनी कले होते. 'खिश्चन धर्मसंस्थेने' खिश्चन धर्माच्या प्रसारास विशेष महत्त्व दिले होते. खिश्चन धर्मप्रसाराचे काम युरोपात व युरोपबाहेरील देशांत करणाऱ्या संस्थांना त्यांच्या देशांतून आर्थिक मदत मिळत असे. जगातल्या अनेक देशांत खिश्चन मिशनऱ्यांनी आपापल्या कामाचे जाळे विणले होते. इ.स. १८१३ साली अमेरिकन मराठी मिशनची स्थापना झाली. भारतात ज्या ख्रिश्चन मिशनऱ्या आल्या, त्यांचा हेतू प्रामुख्याने खिश्चन धर्माचा प्रसार करणे हाच होता. भारत हा लोकसंख्येने मोठा व अत्यंत मागासलेला देश असल्याने खिश्चन धर्मप्रसारास येथे मोठा वाव आहे अशी ख्रिश्चन मिशनऱ्यांची पक्की समजूत होती. भारतातील वरिष्ठ जाती या हिंदू धर्माच्या अभिमानी होत्या. त्यामुळे वरिष्ठ जातीत ख्रिश्चन धर्माच्या प्रसारास वाव नव्हता; पण कनिष्ठ जातीत मात्र ख्रिश्चन धर्मप्रसारास वाव होता. कारण वरिष्ठ जातींनी कनिष्ठ वर्गास सर्वच हक्कांपासून वंचित ठेवले होते. भारतातील कनिष्ठ समाज हा गरीब होता, अशिक्षित होता, स्वतःच्या हक्कांबाबत फारसा जागृत नवहता. हाच वर्ग खिश्चन धर्माची दीक्षा घेईल, वरिष्ठ वर्ग खिश्चन धर्म स्वीकारणार नाही अशी खिश्चन धर्मीयांची पक्की खात्री होती. वरिष्ठ जातींना हिंदू धर्माबद्दल प्रेम होते; पण कनिष्ठ जातींना हिंदू धर्माबद्दल मुळीच प्रेम

नव्हते. त्यामुळे कनिष्ठ वर्गावरच आपण लक्ष केंद्रित करून ख्रिश्चन धर्मप्रसाराचे कार्य करावे असे ख्रिश्चन मिशनऱ्यांना वाटत होते.

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा ख्रिश्चन मिशनऱ्यांबाबतचा दृष्टिकोन युरोपियन व्यापाऱ्यांपाठोपाठ ख्रिश्चन मिशनरीही भारतात आले. पोर्तुगीज, डच, फ्रेंच व इंग्रज या सर्वांनीच भारतात व्यापाराच्या निमित्ताने पाऊल ठेवले होते. पोर्तुगिजांनी गोवा जिंकला होता. गोव्यात ख्रिश्चन मिशनऱ्यांना उदार आश्रय दिला होता. फ्रेंच, डच यांचीही ख्रिश्चन मिशनऱ्यांना सहकार्य करण्याचीच भूमिका होती.

ब्रिटिशांची ख्रिश्चन मिशनऱ्यांबाबतची भूमिका मात्र निश्चितच सावधगिरीची व मुत्सद्दीपणाची होती. ब्रिटिशांना भारतात राज्य प्रस्थापित करावयाचे होते. व्यापार करावयाचा होता. ते त्यांच्या धोरणाचे अग्रक्रम होते. भारतीय लोकांच्या धार्मिक जीवनात हस्तक्षेप करावयाचा नाही ही त्यांची भूमिका होती. विशेषतः लष्करातील कोणीही शिपाई/सैनिक जर सक्तीने ख्रिश्चन झाला तर त्याचे पडसाद संपूर्ण लष्करात उमटतील व लष्करातील सैनिक उठाव करतील यांची त्यांना भीती वाटत होती. त्यामुळे ख्रिश्चन मिशनऱ्यांना ते उत्तेजन देऊ इच्छित नव्हते. बंगाल प्रांताप्रमाणेच मुंबई प्रांतातही ख्रिश्चन मिशनऱ्यांना कोणतेही सहकार्य करावयाचे नाही अशीच ब्रिटिशांची भूमिका होती. इ.स. १८०७ मध्ये टेलर नावाचा एक ख्रिश्चन मिशनरी मुंबईत आला असता सरकारने त्याला मुंबईत वास्तव्य करण्याची परवानगी दिली नाही.

इ.स.१८१३ ला सनदी कायदा व ख्रिश्चन मिशनऱ्यांचे कार्य भारतात ख्रिश्चन धर्मप्रसाराचे काम करणाऱ्या ख्रिश्चन मिशनऱ्यांबाबत ब्रिटिश सरकारने उदारतेचे धोरण स्वीकारावे असे ख्रिश्चन मिशनऱ्यांना वाटत होते व त्यांनी तशी मागणीही केली होली त्यांच्या या प्रयत्नास यश येऊन ब्रिटिश पार्लमेंटने इ.स. १८१३ मध्ये ईस्ट इंडिय कंपनीला राज्यकारभाराची नव्याने सनद देताना संमत केलेल्या सनदी कायद्यानुसार खिश्चम मिशनऱ्यांना त्यांच्या कार्यासंदर्भात पूर्ण स्वातंत्र्य दिले. महाराष्ट्रात ख्रिश्चन धर्मप्रसाराचे काम करणाऱ्या ख्रिश्चन संस्था खालील सर्व संस्था एकोप्याने व परस्पर सहकार्याने काम करत होत्या.

१) चर्च मिशनरी सोसायटी, मुंबई बायबल सोसायटी (कोकणात केंद्र सुरू केले)
२) स्कॉटिश मिशनरी सोसायटी यांचे आगमन मुंबई शहरात इ.स. १८२२ मध्ये झाले
३) लंडन मिशनरी सोसायटी (सुरत, बेळगाव येथे इ.स. १८१५ मध्ये केंद्रे सुरू केली अमेरिकन मराठी मिशन संस्था (इ.स. १८१३ मध्येच या संस्थेची मुहूर्तमेढ मुंबई शहरात रोवली गेली. धर्मांतराच्या प्रकरणी या संस्थेची बदनामी झाली. इ.स. १८५४ नंतर या संस्थेचे कामकाज बंद पडले. शाळा, बोर्डिंग, छापखाना बंद करावा लागला. पोर्तुगीज मिशनरी सोसायटी महाराष्ट्रात कार्यरत नव्हती. ती गोव्यात कार्यरत होती. महाराष्ट्रात पुणे, नगर, नाशिक, सातारा, जुन्नर, हर्णे, बाणकोट येथे ख्रिश्चन धर्मप्रसाराची केंद्रे होती.)

ख्रिश्चन धर्माकडे आकर्षित करून घेण्यासाठी ख्रिश्चन मिशनरी काय करत ?

१) अशिक्षित व मागासलेल्या समाजाच्या विकासासाठी विविध शिक्षण संस्था सुरु करत.
२) व्याधींनी व साथीच्या रोगांनी त्रस्त लोकांसाठी मोफत दवाखाने काढत, मोफत औषधपाणी देत.
३) दुष्काळ पडला तर मोफत धान्य देणे.
४) महापुराच्या प्रसंगी मदत करत.
५) मागासलेल्या लोकांना नियमित आर्थिक साहाय्य करत.
६) हिंदू धर्मातील अनिष्ट चालीरीती, रूढी, परंपरा यांच्या तुलनेत ख्रिश्चन धर्म कसा आदर्श आहे हे पटवून देत.
७) गरीब मुलांना पाठ्यपुस्तके मोफत देत.
८) निराश्रित मुलांसाठी अनाथाश्रम काढत.
९) खिस्ती धर्माची पुस्तके मोफत वाटत.

ख्रिश्चन मिशनऱ्यांनी महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नगर, नाशिक, सातारा, जुन्नर, शिरूर, बालकोट वगैर ठिकाणी आपली प्रचार केंद्रे काढली होती. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या वरील कामांमुळे त्यांच्याबद्दल एक प्रकारची आत्मीयता व सहानुभूती प्रामुख्याने गरीब लोकांना वाटे. धर्मांतराची बहुतांश कारणे बिगरधार्मिक आहेत.

**ख्रिश्चन धर्माचा स्वीकार कोणी केला ?**

खिश्चन धर्मातील समता, मानवतावाद, एकेश्वरवाद या तत्त्वांचा मोठा प्रभाव भारतीय विचारवंतांवर पडला होता. १९ व्या शतकाच्या प्रारंभी मुंबई प्रांतात ज्या ख्यातनाम व्यक्तीनी खिश्चन धर्माचा स्वीकार केला होता त्या व्यक्ती होत्या —

रामकृष्ण विनायक मोडक, बाबा पदमनजी नीळकंठशास्त्री गो-हे, गोविंदराव काणे, विष्णू भास्कर करमरकर, नारायण शेषाद्री, पंडिता रमाबाई, कविवर्य नारायण वामन टिळक,बाळा गोपाळ जोशी (महाराष्ट्रातील कोणाही समाज सुधारकाने धर्मांतर केले नाही. अपवाद पंडिता रमाबाईंचा आहे.)

संयमी व नम्र पद्धती खिश्चन मिशनऱ्यांनी धर्मप्रसारार्थ वापरल्याने त्यांचे नाव मुंबईत बरेच परिचित झाले होते. खिश्चन धर्मोपदेशकांचा मतप्रचार व कार्यपद्धती यांकडे अनेक उच्चवर्णीय नवशिक्षित तरुण ओढले गेले.

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धात पाश्चात्त्य देशांतून भारतात आलेले खिश्चन धर्मोपदेशक हे पोटेस्टंट पंथाचे होते. भारतातील जास्तीत जास्त लोकांना खिश्चन धर्माची दीक्षा देणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. या प्रोटेस्टंट पंथीयांची व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक समता, मूलभूत राजकीय हक्क या मूल्यांवर श्रद्धा होती. त्यांची कार्यपद्धती अत्यंत सुज्ञतेची व सुसंस्कृतपणाची होती. सक्ती किंवा जुलूम नव्हे तर विचारपरिवर्तनावर त्यांचा भर होता. हे खिश्चन धर्मोपदेशक येथील भाषा शिकले. येथील लोकांत मिळून मिसळून त्यांनी सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या अडचणी त्यांनी समजून घेतल्या. खिस्ती धर्मोपदेशकांनी प्रामुख्याने शूद्रातिशूद्रांना शिक्षणाची गोडी कशी लागेल याचा प्रामुख्याने प्रयत्न केला होता. खिश्चन धर्माची तत्त्वे ही केवळ मनुष्याच्या पारमार्थिक कल्याणालाच नव्हे तर ऐहिक उत्कर्षाला पोषक आहेत असा दावा खिस्ती धर्मोपदेशक करत. खिश्चन धर्माच्या प्रसारामागे उदात्त कारणे नव्हती.

**ख्रिश्चन मिशनऱ्यांचे शैक्षणिक, वृत्तपत्रे क्षेत्रांतील कार्य :-**

खिश्चन मिशनऱ्यांनी मुंबईत मुलींसाठी शाळा काढल्या. इ.स. १८२० पर्यंत अमेरिकन मिशनऱ्यांच्या शाळांची संख्या २१ होती. इ.स. १८२४ त्यांनी मुंबईत मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढली. अवघ्या २ वर्षांत मुलीच्या ९ शाळा त्यांनी काढल्या. तेथे २०० मुली शिकत होत्या. इ.स. १८३२मध्ये मुलींच्या १२ शाळा मुंबईत चालत होत्या व तेथे ३०० मुली शिकत होत्या. इ.स. १८३६ मध्ये बोर्डिंग स्कूलची कल्पना या मंडळींनी अमलात आणली. मुंबईत शाळा सुरू करण्याबाबत डॉ. विल्सन यांनी विशेष पुढाकार घेतला होता. मुंबईबाहेरही काही ठिकाणी मिशनऱ्यांनी शाळा सुरू केल्या. इ.स. १८३३ मध्ये पुणे शहरात खिश्चन मिशनऱ्यांनी दोन-तीन शाळा काढल्या होत्या. महाराष्ट्रात मुंबई व पुणे येथे अमेरिकन मिशन व 15 स्कॉटिश मिशन या मिशनरी संस्थांनी मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढल्या. मुंबईत फ्री चर्च विद्यालय खिश्चन मिशनऱ्यांनी चालविले होते.

खिश्चन मिशनऱ्यांनी प्रामुख्याने मुलींच्या शिक्षणावर अधिक भर दिला होता. वास्तविक मुंबई प्रांतात मुलींच्या शिक्षणाची कोणतीच सोय नव्हती. स्त्रियांना शिक्षणाचा हक्कच येथील समाजाने नाकारला होता. या पार्श्वभूमीवर खिश्चन मिशनऱ्यांचे स्त्री शिक्षणाबाबतचे कार्य प्रशंसनीय आहे. खिश्चन मिशनऱ्यांच्या शैक्षणिक कार्याचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे कनिष्ठ जातीतील मुलांना शैक्षणिक सोयी उपलब्ध करून देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. अमेरिकन मराठी मिशनचे कार्य उल्लेखनीय आहे. खिश्चन मिशनऱ्यांनी ग्रामीण भागात शैक्षणिक कार्य केले होते हे एक विशेष होय. अमेरिकन मराठी मिशनचे मुख्य कार्यालय अहमदनगर येथे होते. खिश्चनांचा मनमिळाऊपणा, समर्पणशीलता, दयाबुद्धी, परोपकार, गरिबांचा कळवळा, आत्मीयता या गुणांमुळे भारतीय लोक खिश्चन धर्माकडे आकर्षिले गेले. त्यांच्याभोवती लोकांची गर्दी वाढत गेली. खिश्चन मिशनऱ्यांच्या कार्यामुळेच महाराष्ट्रात समाजसुधारणा व धर्मसुधारणा चळवळी उभ्या राहिल्या.

**वृत्तपत्रे/वाङ्‌मयीन क्षेत्रातील कार्य :**

खिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी स्थानिक लोकांशी संवाद कसा साधावयाचा हा प्रश्न होता. म्हणून त्यांनी प्रथम मराठी भाषा आत्मसात केली होती. इ.स. १८१७ मध्ये अमेरिकन मराठी मिशनच्या लोकांनी देवनागरी टाईप

वापरून बायबलच्या काही भागांचे मराठीत भाषांतर केले. याच काळात मिशनरी लोकांनी मराठी-इंग्रजी शब्दकोश, मराठी भाषेचे व्याकरण यासारखी मराठी भाषेतील पुस्तके प्रकाशित केली. डॉ. कॅरें या ख्रिश्चन मिशनमध्ये काम करणाऱ्या व्यक्तीने इ.स. १८०५ मध्ये मराठी भाषेचे व्याकरण प्रसिद्ध केले. इ.स. १८०१ मध्ये इंग्रजी-मराठी कोश तयार केला. रॉबर्ट ड्रमंडने मुंबईत मराठीचे व्याकरण तयार केले. ख्रिश्चन धर्मोपदेशक हिंदू धर्मातील दोषस्थळे दाखविणाऱ्या लहान- मोठ्या पुस्तिकाही प्रकाशित करत.

इ.स. १८४२ मध्ये 'ज्ञानोदय' हे पत्र अमेरिकन मिशन प्रेसने सुरू केले. प्रारंभी ते पाक्षिक होते. नंतर ते साप्ताहिक झाले. खिस्ती धर्माची माहिती देणाऱ्या अनेक पुस्तिका ख्रिश्चन मिशनरी संस्थांनी प्रकाशित केल्या होत्या. बाबा पद्मनजी यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता. 'अरुणोदय' या नावाचे आत्मचरित्र त्यांनी लिहिले. त्यात त्यांनी आपण खिस्ती का व कसे झालो हे सांगितले आहे. बाबा पद्मनजी हे खिस्ती लोकांत फारच प्रसिद्ध होते. इ.स. १८८३ मध्ये 'येशू ख्रिस्ताचे चरित्र' हे पुस्तक त्यांनी एकूण ७ खंडांत लिहिले.

इ.स. १८५० पासून पुढे ५० वर्षे ख्रिश्चन मिशनऱ्यांनी अपूर्व असे कार्य केले. धर्मांतर पडवून आणत असताना मिशनऱ्यांनी बुरसटलेल्या ब्राह्मणी विचारप्रणालीला धक्के दिले. प्रमुख ख्रिश्चन उपदेशक मुंबई व महाराष्ट्रात आले त्यात जेम्स मिचेल, जॉन इस्टव्हेन्सन, जॉन विल्सन, मरे मिचेल हे प्रमुख होते.

इ.स. १८३९ मध्ये मुंबई शहरात दोन पारशी तरुणांनी ख्रिश्चन धर्माची दीक्षा घेतली तेव्हा मोठी खळबळ उडाली होती. कोर्टकचेऱ्या झाल्या. त्या प्रक्षोभक घटनेचे पडसाद पुण्यातही उमटले. मिशनऱ्यांनी सेवावृत्तीचा एक वस्तुपाठच जनतेपुढे ठेवला होता. सार्वजनिक आरोग्य, करणाची सेवा, महारोग्यांची सेवा ही कामे त्यांनी अत्यंत ममतेने केली. हिंदू धर्मातून दलित जातीमधून जे लोक ख्रिश्चन धर्मात दाखल झाले त्यांचे शूद्र, अतिशूद्र व चांडाळ हे तीन गट आहेत. हे बाटलेले लोक एकमेकांसोबत रोटी-बेटी व्यवहार करत नसत व आपापल्या जातीतील प्रथा-परंपरेंचे पालन करीत असत.

**इ) रेल्वे, पोस्ट, तारायंत्रे या क्षेत्रातील प्रगती व त्याचे परिणाम :-**

इ.स. १८४८-१८५६ या काळात लॉर्ड डलहौसी हा भारताचा गव्हर्नर जनरल होता. त्याने भारतीय संस्थाने खालसा करण्याचे धोरण राबविले. त्यामुळे ब्रिटिशांच्या भारतातील की सभेच्या विस्तारात फार मोठी भर पडली. म्हणून त्यास 'ब्रिटिश साम्राज्याचा शिल्पकार' असे म्हणतात. लॉर्ड डलहौसीने अंतर्गत क्षेत्रात ज्या सुधारणा केल्या त्यापकी महत्त्वाची सुधारणा म्हणजे रेल्वे, पोस्ट व तारायंत्राचा प्रारंभ ही होय. भारतातील ब्रिटिशांच्या साम्राज्याचे संरक्षण आणि संपूर्ण प्रदेशावर नियंत्रण ठेवण्यासाठी दळणवळणाची वेगवान साधने उपलब्ध करून देणे आवश्यक होते. याच उद्देशाने लॉर्ड डलहौसीने भारतात रेल्वे, पोस्ट व तारायंत्र या सुधारणा केल्यामुळे एक नवे पर्व निर्माण झाले. लॉर्ड डलहौसीच्या काळात पुढील रेल्वेमार्ग सुरू झाले.

१) मुंबई ते ठाणे (१८५३) २) कलकत्ता ते राणीगंज (१८५५) ३ ) मद्रास ते अर्काट ४) ठाणे ते कल्याण हा मार्ग १८५४ मध्ये सुरू झाला.

इ.स. १८५८ मध्ये पुणे ते खंडाळा, १८६१ मध्ये मुंबई ते नाशिक हे रेल्वेमार्ग टाकले गेले. १८६८ ला बोरघाटाचे काम सुरू झाले. १९६२ मध्ये जळगाव, १८६३ मध्ये भुसावळ, १९६५ ला बुऱ्हाणपुर, १८७० मध्ये मध्य प्रदेशातील जबलपुरला रेल्वे पोहचली. रेल्वेमार्ग टाकण्याचा वेग फार मोठा होता. पुणे-मिरज हा रेल्वेमार्ग १८८४- १८८६ या काळात पूर्ण झाला. मुंबई शहर कोलकात्याशी १८७० मध्ये जोडले गेले. ब्रिटिशकाळात भारतातील रेल्वेमार्ग सरकारी निधीतून बांधले गेले नाहीत तर भारतातील रेल्वेमार्ग खासगीरित्या उभारलेल्या निधीतून बांधले गेले. त्यामुळे ब्रिटिश लोकांना भारतात भांडवल गुंतवण्याची संधी मिळाली. लोहमार्ग तयार करण्याचे कंत्राट मात्र ब्रिटिश कंपन्यांनाच

देण्यात आले होते. *East India Railway Company* व *The Great Indian Penninsula Railway Company* या त्या दोन कंपन्या होत्या. या कंपन्यांना त्यांच्या गुंतवणुकीवर ९९

वर्षांसाठी ५ टक्के लाभांशाची हमी देण्यात आली होती. या रेल्वे कंपन्यांनी टपाल निःशुल्क न्यावयाचे होते व सैन्याची ने-आण व त्यांचे साहित्य हे सवलतीच्या दरात न्यावयाचे होते.

आजचा मराठवाडा हैदराबादच्या निजाम राजवटीचा एक भाग होता. (इ.स. १७२४ ते १८४८) निजामाने काही रेल्वेमार्ग टाकले. ते मराठवाड्यातून गेले. उदा. हैदराबाद-मनमाड या रेल्वेमार्गामुळे औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड ही शहरे रेल्वेमार्गाने जोडली गेली. हैदराबाद-परळी, परळी-परभणी हे रेल्वेमार्गही निजामाने टाकले. त्यामुळे लातूर, बीड या

जिल्ह्यांचा काही भाग रेल्वेमार्गाने जोडला गेला. कुडूवाडी-लातूर या नॅरोगेजचा प्रारंभ १९११ मध्ये झाला. या सर्व रेल्वेमार्गामुळे मराठवाड्यात व्यापार-उद्योगांच्या विकासास मदत झाली.

इ.स. १८६९ नंतर भारतातील ब्रिटिश सरकारने रेल्वेमार्ग टाकण्याचे काम स्वतः हाती घेतले. प्रतिवर्षी ३०० मैल या गतीने १० हजार मैलांचा रेल्वेमार्ग ब्रिटिश सरकारने बांधला. प्रतिमैल १२ हजार पौंड एवढा खर्च रेल्वेमार्ग टाकण्यासाठी येत असे. मुंबई ते कल्याण, मुंबई ते सोलापूर, दौंड ते मनमाड, दौंड ते बारामती हे रेल्वेमार्ग टाकले गेले. इ.स. १८८० पर्यंत नागपूर शहर मुंबईशी रेल्वेमार्गाने जोडले गेले.

पोस्टाच्या कार्यपद्धतीत व पत्रे पाठविण्याच्या पद्धतीत लॉर्ड डलहौसीने आमूलाग्र बदल केला. यापूर्वीही पोस्टाने पत्र पाठविण्याची व्यवस्था होती; परंतु पोस्टाच्या कार्यपद्धतीत गोंधळ होता. ज्या पत्त्यावर पत्र जात असे त्याला पैसे भरावे लागत. लॉर्ड डलहौसीने त्यात सुधारणा केली. इ.स. १८५४ मध्ये एक नवा पोस्ट ऑफिस कायदा पास केला. त्यानुसार मुंबई, मद्रास व बंगाल या तीन इलाख्यातील डाकघरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक महानिर्देशक नियुक्त केला. त्याने *Peeny Postage System* सुरू केली त्यानुसार अर्ध्या तोळ्यापेक्षा जास्त वजन असलेल्या कोणत्याही पत्रास पत्र पाठवणाऱ्याने अर्ध्या आण्याचे तिकीट लावावे असा नियम करण्यात आला. त्यामुळे कमी खर्चात कोठेही पत्र पाठविण्याची व्यवस्था झाली. लॉर्ड डलहौसीने पोस्ट खात्याच्या कारभारात आमूलाग्र क्रांती घडवून आणली. इ.स. १९०५ मध्ये रेल्वे मंडळ स्थापन झाले. रेल्वेमार्गाची संख्या झपाट्याने वाढतच गेली. इ.स. १९४७ पर्यंत ५४००० मैल लांबीचे रेल्वेमार्ग तयार झाले. लॉर्ड डलहौसीने टेलिग्राफ (तारयंत्र) चीही सोय केली. त्याने त्याच्या ८ वर्षाच्या कारकीर्दीत ४००० मैल लांबीच्या संदेशवाहक तारा पसरविल्या. मुंबई, कलकत्ता व मद्रास ही दूरदूरची मोठी शहरे एकमेकांना जोडली गेली. ब्रह्मदेशातील रंगून ते मंडाले तारा टाकण्यात आल्या. या संदेशवाहक तारांमुळे दूरदूरच्या प्रदेशांशी संपर्क साधने ब्रिटिशांना शक्य झाले. इ.स. १८५३ मध्ये कलकत्ता ते आग्रा ही तारसेवा सुरू झाली. हळूहळ भारतातील प्रमुख शहरे तारायंत्रांनी जोडली गेली.अलेक्झांडर बेल याने इ.स. १८७६ मध्ये टेलिफोनचा शोध लावला व केवळ ६ वर्षांत॥ १८८२ ला टेलिफोन भारतात पोहोचला. ब्रिटिशांना राज्यकारभार चालविण्यासाठी लिफोन व टेलिग्राफ या दोन साधनांची गरज होती. मुंबई, कोलकाता, चेन्नई व कपूरसारख्या महत्त्वाच्या शहरांना टेलिफोन सेवा ब्रिटिशांनी पुरवली होती. स्वातंत्र्यप्राप्तीच्या बाली भारतात एक लाख टेलिफोन होते.

**रेल्वे, पोस्ट व तारायंत्राचे परिणाम** :-

१) रेल्वेमुळे बंदरे, शहरे, कारखाने एकमेकांस जोडली गेली.
२) कच्चा माल पुरवणारी केंद्रे एकमेकास जोडली गेली.

३) दुष्काळाच्या काळात किंवा अन्य वेळेसही धान्याची व इतर वस्तूंची आयात

४) दूरदूरच्या प्रांतातून त्वरेने करणे शक्य झाले. त्यामुळे दुष्काळाची तीव्रता कमी झाली. रेल्वेने लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करून दिला. उदा. इ.स. १९६५ पर्यंत रेल्वेतील कर्मचाऱ्यांची संख्या ३५००० एवढी होती.

५) सामाजिक गतिमानता वाढली. रेल्वेमुळे जातिव्यवस्था, अस्पृश्यता इत्यादींची बंधने कमी झाली. सामाजिक अभिसरण घडून आले.

७ ) राजकीय नेत्यांना इतर प्रांतांतील नेत्यांशी, कार्यकर्त्यांशी व एकूण जनतेशी संपर्क साधने रेल्वेमुळे शक्य झाले. त्यामुळे स्वातंत्र्य चळवळीलाही गती आली.

८) रेल्वेमुळे देशांतर्गत प्रवास वाढला. मुंबई व कलकत्ता या शहरांना जोडणारा - मार्ग हा विदर्भासारख्या कापूसप्रधान भागातून जात होता. त्यामुळे कापूस मुंबईसारख्या बंदरात नेणे सोपे व सोयीचे झाले. ब्रिटिश सत्तेविरुद्ध होणारे उठाव दडपून टाकण्यासाठी रेल्वे व तारायंत्राचा उपयोग झाला.

९) ब्रिटिशांना त्यांच्या सैन्याची व सैनिकी साहित्याची ने-आण करणे यासाठी रेल्वेमार्ग उपयुक्त ठरले.

१०) रेल्वेसाठी लागणारे साहित्य प्रारंभीच्या काळात तरी भारतात तयार होत नव्हते. ते इंग्लंडमधून आयात केले जाई. त्यामुळे रेल्वेच्या वाढीचा फायदा ब्रिटनच्याच लोकांना अधिक झाला.

११) रेल्वे व तारायंत्रामुळे प्रशासनास दूरदूरच्या प्रदेशांवर नियंत्रण ठेवणे सहज शक्य झाले. इंडियन नॅशनल काँग्रेस, अ. भा. ट्रेड युनियन काँग्रेस, किसान सभेची आंदोलने, मुस्लिम लीगचे राजकारण इत्यादीच्या हालचालींना रेल्वे, मोटार,पोस्ट, तारायंत्र इत्यादी उपयुक्त ठरली.

१२) संपूर्ण देश एका सूत्रात बांधला गेला. दूरदूरचे वाटणारे अंतर कमी झाले. भारताला एक राष्ट्र बनविणे शक्य झाले.

१३) कल्पना रेल्वेमुळे मागे पडल्या. जातिभेद, स्त्री-पुरुष भेद, सोवळेओवळे मानणे, भित्रेपणा, देवभोळेपणा इत्यादी

**मानवधर्म सभा** :- २२ जून १८४४ रोजी दादोबा पांडुरंग व दुर्गाराम मन्साराम यांनी सुरत येथे 'मानवधर्म सभा' स्थापन केली; या संघटनेत दलपतराय भगुभाई, दिनमणिशंकर हे पण सामील झाले होते. मात्र इ.स. १८४६ मध्ये दादोबांची मुंबईला व इ.स. १८५२ मध्ये दुर्गारामची राजकोटला बदली झाल्याने मानवधर्मचे कार्य थंडावले व संपुष्टात आले. तरीही मर्यादित क्षेत्रात का असेना धर्मसुधारणा व समाजसुधारणा या कार्यास चालना दिली. विश्वधर्म व बुद्धिप्रामाण्य या दोन प्रमुख संकल्पना मानवधर्मसभेच्या मुळाशी होत्या. या संस्थेची मूलभूत तत्त्वे :-

अ) ईश्वर एक असून तो पूज्य व निराकार आहे. ब) ईश्वरभक्ती हाच धर्म आहे.

क) प्रत्येक व्यक्तीला विचार करण्याचे स्वातंत्र्य आहे. ड) जातिभेद पाळू नये.

इ) नित्य कर्म विवेकास अनुसरून असावे. ई) व्यक्तीचे श्रेष्ठत्व गुणावर अवलंबून असते, कर्मावर नव्हे.

**२) परमहंस सभा**: इ.स. १८४९ मध्ये परमहंस सभा स्थापन झाली. या सभेचे प्रवर्तक सर रामचंद्र बाळकृष्ण जयकर, भिकोबादादा चव्हाण, लक्ष्मणशास्त्री हळबे, आत्माराम पांडुरंग, दादोबा पांडुरंग, मोरोबा विनोबा, मदन श्रीकृष्ण आदी सुधारकप्रिय मंडळी होती. बॅ. रामचंद्र बाळकृष्ण जयकर बरीच वर्षे परमहंस सभेचे अध्यक्ष होते. जातीय विषमतेवर प्रहार करण्यासाठी व धार्मिक बाबतीत सुधारणा करण्यासाठी ही सभा स्थापन झाली होती. 'प्रभाकर' पत्राचे संपादक भाऊ महाजन हे या सभेचे पुरस्कर्ते होते. या सभेच्या शाखा पुणे, अहमदनगर, रत्नागिरी, सातारा, बेळगाव या शहरांतही निघाल्या होत्या. संस्थेच्या सैभासदांची संख्या १००० पर्यंत पोहोचली होती.

**या सभेचे तत्त्वज्ञान** :-

१) जातिभेद मानू नये. २) मूर्तिपूजा करू नये. ३) एकेश्वरवादाचा पुरस्कार करावा.

फक्त एकाच ईश्वराची भक्ती करावी. ४) सर्वांशी बंधुत्वाच्या भावनेने वागावे. ५) स्पृश्यास्पृश्य भेद पाळू नये. ६) स्त्रियांना पुर्नविवाह करू द्यावेत. ७) स्त्रिया, महारमांगादी लोकांना विद्या द्यावी. ८) मनुष्यांची गुणवत्ता त्याच्या कुळावरून नव्हे तर गुणांवरून ठरवावी. ९) विवेकास अनुसरून कर्म करावे. एकूणच दादोबांची वैचारिक बैठक राजा राममोहन रॉयशी जुळणारी होती. या सभेच्या तत्त्वदृष्टीचे विवरण दादोबा पांडुरंग यांनी २० अभंगांतून केले आहे.

या सभेचे सभासद करून घेताना प्रथम एक प्रार्थना वाचावयास सांगत. वर्षातून एकदा किंवा अनेक वेळा निरनिराळ्या जातींच्या लोकांचे मिळून सहभोजन होई पण ते गुप्तपणे होत असे. कठोर धर्मबंधनांनी व जातिनिर्बंधांनी जखडलेल्या समाजात सुधारकांचा जो छळ झाला तो विचारात घेऊनच सामाजिक व धार्मिक बंधनांविरुद्ध बंड करण्यासाठी गुप्त संस्था स्थापन करण्याचा विचार पुढे आला असावा. या सभेच्या कार्यपद्धतीत मोठे वैगुण्य होते व तेच सभेच्या नाशाला कारणीभूत ठरले. सभेचे कार्य गुप्तपणे चाले. एके दिवशी (इ.स. १८६०) सभासदांच्या नावाची यादी कोणी तरी पळविली. ती वृत्तपत्रात प्रकाशित झाली; त्यामुळे आपण जातिबहिष्कृत होऊ अशा भीतीने सभासदांनी सभेचा संबंधच तोडून टाकला. परमहंस सभेची उद्दिष्टे उदात्त होती; पण तिच्या कार्यपद्धतीमुळे ती अपेक्षेएवढे कार्य करू शकली नाही. तिच्या तत्त्वप्रणालीमुळे महाराष्ट्रातील सुधारणावादी मंडळी प्रभावित झाली होती असे मत डॉ. रामकृष्ण भांडारकर मांडतात. प्रत्येक मनुष्याला विचारस्वातंत्र्य आहे. माणसाची एकच ज्ञाती आहे या विचारांचा प्रचार या सभेने केला. या परमहंस सभेचेच पुढे प्रार्थना समाजात रूपांतर झाले. या संघटनेच्या नेत्यांकडे संघटनकौशल्याचा अभाव असल्यामुळे १० वर्षातच ही संघटना अस्तगत झाली. परमहंस सभेला जरी अपयश आले तरी ज्या धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या उन्नत तत्त्वांचा तिने गुप्त रीतीने का होईना पुरस्कार व प्रचार केला ती तत्त्वे मात्र चांगली होती. ख्रिश्चन धर्माचा तिच्यावर प्रभाव होता. १८६७ मध्ये स्थापन झालेला प्रार्थना समाज व इ.स. १८७३ मध्ये पुणे येथे स्थापन शालेला सत्यशोधक समाज हे परमहंस सभेचेच नव्या परिस्थितीत व नव्या स्वरूपात शालले पुनरुत्थान होते असे म्हटले जाते.

परमहंस सभेचे धुरीण दादोबा पांडुरंग हे परमहंस सभेच्या गुप्त सभांना हजर राहत नसत; पण एक 'जगद्वासी आर्य' या टोपणनावाने त्यांनी लिहिलेले 'धर्मविवेचन' नावाचे हस्तलिखित सभासदांना वाचावयास दिले जाई. 'प्रभाकर' पत्राचे संपादक भाऊ महाजन (इ.स. १८१५- १८८९) या सभेची स्तुती करत असले तरी तेही या सभेच्या बैठकीला हजर राहत नसत. दादोबा पांडुरंग हे खिश्चन धर्माकडे खूपच आकर्षित झाले होते; पण ते सुरत येथे इंग्रजी शाळेत शिक्षक असताना तेथील शाळेचे मुख्याध्यापक हेन्री ग्रीन हे अज्ञेयवादी व खिश्चन धर्मावर विश्वास न ठेवणारे होते. त्यांनीच दादोबा पांडुरंग यांना हिंदू धर्माप्रमाणे खिश्चन धर्मातही दोष आहे. हे समजावून सांगितल्याने त्यांनी खिश्चन धर्म स्वीकारण्याचा निर्णय बाजूस ठेवला. परमहंस सभेच्या सभासदांमध्ये मुसलमान व खिश्चन लोकही होते हे विशेष. दादोबा पांडुरंग यांनी 'धर्मविवेचन' या पुस्तकावर लेखक म्हणून 'एक जगद्वासी आर्य' असे टोपण नाव टाकले होते आणि 'पारमहंसिक ब्राह्मणधर्म' या दोन पुस्तिका लिहून परमहंस सभेसाठी धर्मत्तत्त्वविचारांची आधुनिक पद्धतीने मांडणी केली; परंतु आपले विचार कृतीत उतरविण्यासाठी आवश्यक असलेले नीतिधैर्य त्यांच्या अंगी नव्हते. त्यामुळे परमहंस सभेच्या प्रत्यक्ष कार्यात त्यांनी अधिकृतपणे व उत्साहाने कधीच भाग घेतला नाही. ज्ञानप्रसारक सभा : इ.स. १८४८ मध्ये मुंबईत एल्फिन्स्टन कॉलेजच्या काही विद्यार्थ्यांनी 'ज्ञानप्रसारक सभा' या नावाची संस्था स्थापन केली होती. दादोबा पांडुरंग या संस्थेचे अध्यक्ष होते. आपल्या देशबांधवांत ज्ञानाचा प्रसार करणे व सामाजिक जागृती घडवून आणणे ही ज्ञानप्रसारक सभेची प्रमुख उद्दिष्टे होती. या संस्थेत सामाजिक व धार्मिक विषयांतील चर्चेला प्राधान्य दिले जाई. वाङ्मयीन कार्य : दादोबा पांडुरंग यांना साहित्यिक दृष्टी होती. 'मराठी व्याकरणाचे पाणिनी' अशी पदवी त्यांना दिली गेली होती. त्यांचे ग्रंथ :-

१) मराठी भाषेचे व्याकरण. इ.स.१८३६ मध्ये हा ग्रंथ प्रकाशित झाला तेव्हा दादोबांचे वय फक्त २५ वर्षे होते. या ग्रंथाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. २) मराठी नकाशांचे पुस्तक. ३) विद्येच्या लाभाविषयी. ४) केकावती यशोदा पांडुरंगी डीकेसह प्रस्तावना, ५) पारमहंसिक ब्रह्मधर्म, ६) आत्मचरित्र. ७) शिशिबोध. ८) मराठी लघुव्याकरण, ९) धर्मविवेचन (इ.स. १८४३). १०) 'यमुना पर्यटन' था बाबा पद्मनजी यांनी लिहिलेल्या कादंबरीवर दादोबा पांडुरंग यांनी

पुनर्विवाहविषयक संस्कृत भाषेत लेख लिहिला होता. विधवाश्रमार्जन. त्यापैकी मराठी भाषेचे व्याकरण या ग्रंथाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या.

**६) प्रार्थना समाज**

**प्रास्ताविक :-** राजा राममोहन रॉय यांच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचा प्रभाव मुंबई प्रांतावरही पडला. रॉय यांच्या विचाराने व कार्याने मुंबई प्रांतातील सुधारक धर्माचा विचार केल्याशिवाय सामाजिक सुधारणा घडवून आणणे अशक्य आहे, या विचारांचे होते. कारण समाजव्यवस्थेत निर्माण झालेल्या विकृत रूढी व परंपरांचा संबंध धार्मिक विचार-आचाराशी होता. महाराष्ट्रात धर्मसुधारणांच्या दृष्टीने पाऊल टाकण्याचे श्रेय डॉ. दादोबा पांडुरंग यांनी स्थापन केलेल्या (१८४९) परमहंस सभेकडे जाते. परमहंस सभेवर ख्रिश्चन धर्माचा पगडा होता. ही सभा आपले कार्य गुप्तपणे चालवीत असे. या सभेचे सभासद विचाराने पक्के असले तरी आपण सामाजिक रोषाला बळी पडू यांची त्यांना भीती वाटे. परंतु जेव्हा त्यांच्या कार्याची जाहीर वाच्यता झाली तेव्हा परमहंस सभेतून अंग काढून तिचे सभासद बाहेर पडले. अशा प्रकारे १८६० मध्ये लोकक्षोभाच्या भीतीने परमहंस सभा बंद पडली.

प्रार्थना समाजाची स्थापना इ.स. १८६७ मध्ये मुंबई येथे प्रार्थना समाजाची स्थापना झाली. त्यासंबंधीची बातमी ख्रिस्ती धर्ममताच्या 'ज्ञानोदय' या वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिद्ध झाली. ही संघटना स्थापन करण्यात पुढील व्यक्तींचा सहभाग होता.

१) डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर (डॉ. दादोबा पांडुरंग यांचे बंधू) (वैश्य)

२) डॉ. रामकृष्ण भांडारकर.

३) न्या. आर. जी. चंदावरकर.

४) न्या. महादेव गोविंद रानडे

५) श्री. वामन आबाजी मोडक

६) भिकोबा चव्हाण

७) सदाशिव पांडुरंग केळकर

प्रार्थना समाजापुढे बंगालमधील ब्राह्मो समाजाचा आदर्श होता. 'सत्यमेव जयते' हे प्रार्थना समाजाचे घोषवाक्य होते.

**प्रार्थना समाजाची तत्त्वे :-**

प्रार्थना समाजाचे संस्थापक डॉ. आत्माराम पांडुरंग तर्खडकर यांनी त्यांचे बंधू दादोबा पांडुरंग तर्खडकर यांच्या परमहंस सभेचीच बहुतेक तत्त्वे स्वीकारली होती. तसेच काही तत्त्वे ब्राह्मो समाजाकडून घेतली होती. तेव्हा परमहंस सभा व ब्राह्मो समाजाची काही तत्त्वे मिळून प्रार्थना समाजाने खालील तत्त्वे स्वीकारली होती.

१) परमेश्वर हा एकच आहे, अद्वितीय आहे. तोच या यशाचा नियंता, पालनकर्ता आहे. ईश्वर सर्वशक्तिमान आहे.

२) परमेश्वराचे स्वरूप अनंत, अतर्क्स, शाश्वत, निराकार आहे.

३) परमेश्वर अवतार घेतो ही कल्पना चुकीची आहे.

४) परमेश्वराने कोणताही धर्मग्रंथ निर्माण केला नाही, त्यामुळे निर्दोष असा एकही धर्मग्रंथ सापडणार नाही.

५) सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे असल्याने आपसांत बंधुभावाने वागणे हे प्रत्येक मनुव्यमात्राचे कर्तव्य आहे.

६) मूर्तिपूजा हा परमेश्वराच्या उपासनेचा मार्ग नाही. मूर्तिपूजा ही देवाचा अपमान करते. मनुष्यास नीचपणा आणणारा हा आचार आहे.

७) प्रार्थनेच्या मार्गाने परमेश्वराची उपासना करता येते. परंतु प्रार्थनेने भौतिक फलाची प्राप्ती होत नाही. प्रार्थना फक्त आत्मिक उन्नतीसाठीच करावयाची आहे.

८) सत्य, सदाचार, भक्ती हे परमेश्वराच्या उपासनेचे मार्ग आहेत. प्रार्थना समाजाची जी धार्मिक आध्यात्मिक बैठक आहे तिचा पाया तयार करण्याचे काम डॉ. भांडारकर, न्या. रानडे यांनी केले.

**प्रार्थना समाजाचे कार्य**:-

प्रार्थना समाजाने, सुशिक्षित वर्गात धर्मसुधारणेच्या विचारांचा प्रसार करण्याचे कार्य काही प्रमाणात केले. प्रार्थना समाजाचे पुरस्कर्ते आपला पंथ हा हिंदू धर्मातील एक सुधारक पंथ आहे यावर भर देत असत. हिंदू धर्मातील मूर्तिपूजा, अवतार कल्पना, अद्वैतवाद आदी गोष्टींना प्रार्थना समाजाच्या प्रमुख नेत्यांचा विरोध असला तरी ते हिंदू धर्माचे अभिमानी होते. महाराष्ट्रातील संतांच्या भक्तिमार्गास त्यांची मान्यता होती. म्हणून प्रार्थना समाजाच्या सभेत नामदेव तुकारामादी संतांचे अभंग म्हटले जात.

प्रार्थना समाजाच्या मंदिरात जी साप्ताहिक उपासना होते त्याचे ६ भाग असत.

**१) उद्बोधन:** उपासकाने जमलेल्या सर्व मंडळींची वृत्ती उपासनोन्मुख करणे. इतर विचार मनातून काढून परमेश्वरविषयक विचार मनात आणणे.

**२) स्तवन** :- ईश्वराचे वैभव, पावित्र्य, तेज, सामर्थ्य, प्रेमस्वरूप आदी गुणांचे गायन करणे म्हणजे स्तवन.

३) **कृतज्ञता दर्शन:** ईश्वराविषयी कृतज्ञता व्यक्त करणे.

४) प्रार्थना :- मनाच्या एकाग्रतेसाठी प्रार्थना म्हणणे.

५) **निरूपण:** उपदेशात्मक भान.

६) **प्रार्थना आरती** :- या उपासनेसाठी समाजाने अनेक प्रार्थना मंदिरे बांधली होती.

मुंबई प्रार्थना समाजाचे प्रथम आचार्य भिकोबादादा चव्हाण हे अनेकदा प्रार्थना समाजाच्या व्यासपीठावरून उपासना चालवीत व उपदेश करीत असत.

प्रार्थना समाजाने विशेषतः खालील बाबतीत उल्लेखनीय कार्य केले.

१) स्त्री शिक्षण.

२) बालविवाहांना बंदी.

३) दलितोद्धार व जातिवादास विरोध.

४) विधवा विवाह

५) पडदा पद्धतीला विरोध.

६) अनाथाश्रम, बालिकाश्रम, आर्य महिलाश्रम याबाबतही महत्त्वाचे कार्य या समाजाने केले. आर्य महिला आश्रम पुणे, राजा राममोहन रॉय आश्रम-मुंबई, अनाथ बालिकाश्रम-पंढरपूर इत्यादी संस्था प्रमुख आहेत. ब्राह्मो समाजाप्रमाणेच प्रार्थना समाजानेही उपनिषदे व गीता यातील सिद्धांत आधारभूत मानले आहेत.

प्रार्थना समाजाची विचारप्रणाली ब्राह्मो समाजासारखी असली तरी त्या दोन्ही समाजात पुष्कळ फरक आहे.

१) ब्राह्मो समाजाने मूर्तिपूजा व जातिभेद यांचा संपूर्ण निषेध केला आहे. ब्राह्मो समाजाचे सभासद होताना प्रत्येकाला तो निषेध मान्य करावा लागतो. प्रार्थना समाजाच्या सभासदांवर तसे बंधन नसते.

२) प्रार्थना समाजाचे सदस्य हिंदूंच्या सण-समारंभांत केवळ सामाजिक दृष्टीने भाग घेतात. ते अशा कार्यक्रमांना धार्मिक महत्त्व देत नाहीत.

**विठ्ठल रामजी शिंदे यांचे प्रार्थना समाजातील कार्य :-**

इ.स. १९०१-१९०३ या काळात वि. रा. शिंदे यांचे वास्तव्य इंग्लंडमध्ये होते. इ.स. १९०३ मध्ये ते परत भारतात आले. उच्च अधिकाराच्या जागा नाकारून त्यांनी केवळ १०० रु. घेऊन प्रार्थना समाजाच्या कार्याला वाहून घेतले. प्रार्थना समाजाचे प्रचारक म्हणून कार्य करीत असताना त्यांनी समाजसेवेचे व अस्पृश्योद्धाराचे कार्य केले. हिंदू धर्मातील अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, कर्मकांड इत्यादी गोष्टींपासून सुटका करण्याचा वि.रा. शिंदे यांनी प्रयत्न केला. त्यांनी अनेक शहरांत दौरे काढून प्रार्थना समाजाची तत्त्वे लोकांना समजावून सांगितली. इ.स. १९०४ मध्ये बडोदा संस्थानातील नवसारी येथील प्रार्थना समाजाच्या वार्षिक उत्सवात ते सहभागी झाले. इंदोर येथील प्रार्थना समाजाच्या वार्षिक उत्सवात त्यांनी सहभाग घेतला. इ.स. १९०५ पासून शिंदे यांनी प्रार्थना समाजास वारंवार भेटी दिल्या. मंगलोर, कोल्हापूर येथील प्रार्थना समाजास त्यांचे सहकार्य होते. त्यांनी इ.स. १९०६ मध्ये 'अ.भा. डिप्रेस्ड क्लास मिशन' नावाची संस्था स्थापन केली होती. या मिशनच्या वतीने अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरही अनेक ठिकाणी शाळा स्थापन केल्या होत्या. तसेच त्यांनी अस्पृश्यता निवारण परिषदाही भरवल्या होत्या. प्रार्थना समाजाचे प्रचारक म्हणून वि. रा. शिंदे यांनी सातारा जिल्ह्यात बरेच काम केले होते. इ.स. १९१० नंतर त्यांनी प्रार्थना समाजाच्या प्रचारकायांशी असलेला आपला संबंध तोडला होता.

**प्रार्थना समाजाला अपयश का आले? :-**

प्रार्थना समाजाने सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य असले तरी त्याच्या कार्याची व्याप्तीही ठरावीक क्षेत्रापुरतीच मर्यादित होती. मुंबई, सातारा, पुणे, कोल्हापूर अशा मोजक्या शहरांबाहेर या समाजाचे फारसे कार्य नव्हते. विदर्भ आधुनिक व मराठवाड्यात तर प्रार्थना समाज पोहोचलाच नाही. या समाजाचे कार्य तेथे फारसे विस्तृत झाले नाही यास प्रामुख्याने खालील बाबी कारणीभूत होत्या.

१) प्रार्थना समाजावर ख्रिस्ती धर्मतत्त्वांचा काही प्रमाणात प्रभाव होता. त्यामुळे हिंदू समाजाला त्याच्याविषयी आपुलकी वाटली नाही.

२) प्रार्थना समाजाच्या प्रवर्तकांत अनेक मतांमध्ये विसंगती होती.

३) प्रार्थना समाजाच्या प्रवर्तकांत आचार व विचार यातही विसंगती होती. ज्या सामाजिक सुधारणांचा त्यांनी प्रसार केला त्यांची अंमलबजावणी करण्याची वेळ त्यांच्या स्वतःवर येताच ते मात्र रूढींची बंधने तोडू शकले नाहीत. त्यांच्या या दुटप्पी वृत्तीमुळे त्यांचे कार्य समाजात फोफावू शकले नाही.

४) या समाजाचे नेतृत्व उच्च मध्यमवर्गीय लोकाकंडे होते. प्रार्थना समाजाचे बहुतांश नेते बुद्धिमान, उदारमतवादी होते. सरकारी नोकर होते. त्यांच्या जनसामान्यांशी मुळी फारसा संपर्क नव्हता. प्रार्थना समाजाची तत्त्वे फक्त पुरुषांनी स्वीकारून चालणार नाही. तर ती स्त्रियांनाही मान्य असायला हवीत.

प्रतिमा पूजनाचा त्याग याचे आचरण स्त्रियांनी पण करावे यासाठी उपक्रम हाती घेण्यात आला. पण त्यास फारसा प्रतिसाद मिळाला नाही. म्हणजे प्रार्थना समाजाच्या कार्यात स्त्रियांचा सहभाग नव्हता. मुंबईत प्रार्थना समाजाने स्वतःची जागा घेऊन २६००० रु. खर्च करून इ.स. १८७४ मध्ये इमारत बांधली. प्रार्थना समाजाच्या वतीने मुंबईत चेइलवाडी, गिरगाव, खेतवाडी, भायखळा, मदनपुरा येथे शाळा उघडण्यात आल्या. त्या शाळेतून विविध जाती, धर्माचे विद्यार्थी शिकत असत. कष्टकरी लोकांसाठी रात्रीच्या शाळाही प्रार्थना समाजाच्या वतीने सुरू करण्यात आल्या.

इ.स. १८७० मध्ये पुणे-शहरात प्रार्थना समाज स्थापन झाला. पुणे प्रार्थना समाजाच्या निमंत्रणानुसार स्वामी दयानंद इ.स. १८७२ मध्ये पुण्यास व्याख्यान देण्यासाठी आले. शिवराम गोखले यांनी पुणे प्रार्थना समाजाचे प्रचारक

म्हणून काही काळ काम केले. गणपतराव कोटकर, न्या. रानडे, डॉ. भांडारकर यांच्या उपासना फारच प्रभावी व परिणामकारक असत. प्रार्थना समाजाचे पुढे धर्मप्रचारक झालेले वि.रा.शिंदे, वासुदेव सुखटणकर हे मुळातील पुणे प्रार्थना समाजातील सभासद होते.

कै. प्रो. जे. व्ही. नाईक (मुंबई विद्यापीठ मुंबई) यांनी प्रार्थना समाजाचे पांढरपेशा स्वरूप कसे होते ते सभासदांची जातवार संख्या, सभासदांचा व्यवसाय वगैरेंची माहिती देऊन साधार स्पष्ट केले आहे. प्रार्थना समाजाची सभासद संख्या कोणत्याही वर्षी २०० पेक्षा जास्त नव्हती. ब्राह्मण व सारस्वत या वरच्या जातीतीलच सदस्य बहुसंख्येने असत. ते शिक्षक, वकील, डॉक्टर असे पांढरपेशा व्यवसायातील असत. इ.स. १९०७ पर्यंत दोन पारशी, दोन मुसलमान व एक ज्यू असे ५ अहिंदू प्रार्थना समाजाचे सदस्य होते. अस्पृश्य वर्गातील गणेश आकाजी गवई, किसन फागुजी बनसोडे, सय्यद अब्दुल कादर हे मुसलमान गृहस्थ वि. रा. शिंदे यांच्या प्रभावामुळे प्रार्थना समाजात आले. प्रो. जे. व्ही. नाईक म्हणतात, 'प्रार्थना समाजाच्या जडणघडणीत फक्त अल्पसंख्य उच्चवर्णीय हिंदूंचाच सहभाग होता हे सत्य डोळ्यांआड करता येणार नाही. हे सर्व जण नागरी किंवा तत्सम विभागातील बुद्धिजीवी सुशिक्षित होते.' पुढे त्यांनी असेही म्हटले आहे, 'प्रार्थना समाजाचे नेते व्यासपीठावरून जातिभेदांच्या दुष्परिणामांबद्दल बोलत राहिले. परंतु जातिभेदाने पोखरलेल्या हिंदू समाजाच्या सामाजिक गुलामगिरीविरुद्ध बंड करून आपले मानवी बंधुत्वाचे मूलभूत तत्त्व प्रत्यक्षात आणण्याचा ठोस प्रयत्न प्रार्थना समाज या संस्थेने केला नाही.' नाईकांचे म्हणणे रास्त आहे. विठ्ठल रामजी शिंदे यांनी चालविलेला अस्पृश्यता निवारण कार्याचा प्रयत्न प्रार्थना समाजाच्या पांढरपेशा संवेदनशीलतेला रुचला नाही.

वि. रा. शिंदे यांच्याबद्दल मुंबई प्रार्थना समाजातील मंडळीच्या मनात दुरावा निर्माण झाला. मुंबई प्रार्थना समाज समितीने इ.स. १९९० मध्ये ठराव पास करून मुंबई प्रार्थना समाजाचे दि. रा. शिंदे यांना प्रचारक या पदावरून काढून टाकले.

प्रार्थना समाज, ब्राह्मो समाज व सत्यशोधक समाज यांच्यात काही बाबतीत साम्य होते. उदा.

१) हे तिन्ही समाज एकेश्वरवादी होते.

२) धार्मिक बाबतीत या तिन्ही समाजांनी मध्यस्थ, पुरोहित नाकारला होता.

३) तिन्ही समाजाच्या दर आठवड्यास सांघिक प्रार्थना सभा किंवा बैठका होत.

४) तिन्ही समाजांनी मूर्तिपूजा त्याज्य ठरविली होती.

प्रार्थना समाजाकडे लोकांना आकर्षित करण्याची शक्ती नव्हती. अच्युत कोल्हटकर म्हणतात, 'प्रार्थना समाजाला जनतेला खुलवता आले नाही. सत्यशोधक समाजाचा जलसा उभा राहिला म्हणजे ५,००० काय १०,००० काय वाटेल तितके लोक जमायला अडचण पडत नाही. पण प्रार्थना समाजाचा ५० वा वाढदिवस असला तरी ५० लोक जमायची मारामार असते.' प्रार्थना समाज व सत्यशोधक चळवळीतील फरक सांगताना अच्युत बळवंत कोल्हटकर म्हणतात, 'प्रार्थना समाजाच्या चळवळीत *Philosophy* (तार्किक चर्चा) आहे, पण *Heart* (अंतःकरणाचा फुलोरा) नाही आणि सत्यशोधक समाजाच्या चळवळीत *Heart* (अंतःकरणाची लाट) आहे, पण *Philosophy* (ज्ञानाची उसळी) नाही' पण सत्यशोधक समाजाला *Philosophy* नाही हे कोल्हटकरांचे मत चुकीचे आहे.

प्रार्थना समाज अस्तित्वात असताना ६ वर्षांनी म. फुले यांनी 'सत्यशोधक समाज' स्थापन केला होता. प्रार्थना समाज व ब्राह्मो समाज या दोन्हीबद्दल म. फुले यांचे मत वाईट होते. म. फुले म्हणतात, 'रचलेल्या ब्रह्मगारुडावर केवळ झाकण घालण्याकरिता कपटाने सध्या आपला बचाव करण्यास्तव आपल्या डोळ्यांवर कातडी ओढून मोठ्या धांदलीने त्यांनी ब्राह्मो समाज व प्रार्थना समाज उभारलेले आहेत व त्यांनी त्या समाजात एकंदर सर्व ख्रिस्ती धर्माचे उष्टेमाष्टे चोरून छापून गोळा केले आणि त्यांनी आपल्या कल्पित ब्रह्माजींच्या पुढे डोळे झाकून बाकीच्या अज्ञानी शूद्रातिशूद्रांच्या मनात पुन्हा एक तन्हेचा ब्रह्मघोटाळा करण्याची खटपट सुरू केली आहे.' या विधानावरून प्रार्थना समाजावर ज्योतिबांचा

मुळातच विश्वास नव्हता. त्यांच्या लिखाणात ते चिडून म्हणतात, 'आता आम्हाला तुमचे ब्राह्मो समाज व प्रार्थना समाज नकोत. पुरे झाले तुमचे छक्के पंजे. खुळ्या हिदू धर्माचे समर्थन करण्यासाठी इस्लाम व ख्रिश्चन धर्माच्या नालस्त्या करून शेतकऱ्यांची मते भ्रष्ट करण्यासाठी विविध समाज धूर्त भटब्राह्मणांनी स्थापन केले.'

वरील टीका-आक्षेप मान्य करूनही प्रार्थना समाजाचे योगदान नाकारता येत नाही. प्रार्थना समाजाच्या शाखा महाराष्ट्राप्रमाणेच गुजरात, आंध्र, तामिळनाडू आदी प्रदेशांतही होत्या. ब्राह्मो समाजाने जे बंगालमध्ये कार्य केले तेच कार्य प्रार्थना समाजाने महाराष्ट्रात केले. तरीही ब्राह्मो समाजाच्या वाट्यास जे यश आले ते प्रार्थना समाजाच्या वाट्यास आले नाही. प्रखर हिंदुत्ववाद्यांकडून प्रार्थना समाजावर टीका होऊ लागल्याने हा समाज मागे पडला. न्या रानडे यांच्या प्रयत्नांतून उदयास आलेली *Deccan Education Society* व ना. गोखले यांनी स्थापन केलेला 'भारत सेवक समाज' या दोन्ही संस्था प्रार्थना समाजाच्या चळवळीचेच फलित होत्या. प्रार्थना समाजाच्या चळवळीने यावेळी जो राष्ट्रवाद उदयास येत होता त्यास हातभारच लावला असे म्हणावे लागेल.

**प्रार्थना समाजाचे प्रमुख कार्यकर्ते :-**

१) दादोबा पांडुरंग तर्खडकर (इ.स. १८१४-१८७२) मराठी भाषेचे आद्य व्याकरणकार धर्मतत्त्वांचे विवेचक व समाजसुधारक म्हणून ते ओळखले जातात. ब्रिटिश सरकारने त्यांना 'रावबहादूर' हा किताब दिला होता. प्रार्थना समाजाच्या उभारणीत त्यांचा सहभाग होता.

२) रामकृष्ण गोपाळ भांडारकर (इ.स. १८३७-१९२५) प्रार्थना समाजाच्या उभारणीत त्यांनी साह्य केले. त्यापूर्वी ते प्रार्थना समाजाशी संबंधित होते. प्रार्थना समाजासाठी त्यांनी सरकारविरोधी तत्त्वे उद्देश, प्रार्थना यांची पद्धतशीर मांडणी केली. प्रार्थना समाज हा ख्रिस्ती धर्माचे अनुकरण आहे, हा आरोप त्यांनी खोडून काढला होता. स्त्रीशिक्षण, बालविवाह प्रतिबंध, मद्यपानबंदी, देवदासी प्रथा बंदी आदी सामाजिक सुधारणा व्हाव्यात म्हणून त्यांनी परिश्रम घेतले. पुणे येथे डेक्कन कॉलेजमध्ये ते संस्कृतचे प्राध्यापक होते.

३) महादेव गोविंद रानडे (इ.स. १८४२-१९०१) महादेव गोविंद रानडे यांचा जन्म १८ जानेवारी १८४२ रोजी नाशिक जिल्ह्यात निफाड येथे झाला. प्राथमिक शिक्षण कोल्हापूर येथे झाले. विद्यार्थीदशेत अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी म्हणून त्यांचा लौकिक होता. कोल्हापूर येथेच त्यांनी इंग्रजी शिक्षणाचा आस्वाद घेण्यास प्रारंभ केला होता. आई गोपिकाबाईंच्या मृत्यूनंतर त्यांचे वडील गोविंदराव यांनी दुसरे लग्न केले होते. तेव्हाच्या पद्धतीनुसार त्यांचे व त्यांच्या बहिणीचे लग्न हा बालविवाह होता. १८५६ मध्ये ते पुढील शिक्षणासाठी मुंबईत आले. मुंबईत ज्ञानार्जन करताना ज्ञानदानाचे काम त्यांना करावे लागले. मुंबईत एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. हायस्कूलचा अभ्यासक्रम पूर्ण करून इ.स. १८५८ मध्ये ते एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये शिक्षण घेऊ लागले. इ.स. १८६२ मध्ये ते बी. ए. ची परीक्षा इतिहास व अर्थशास्त्र हे विषय घेऊन प्रथम श्रेणीत पास झाले. इ.स. १८६५ मध्ये एम. ए. इतिहास व इ.स. १८६६ मध्ये एलएल. बी. या पदव्या त्यांनी घेतल्या. विद्यार्थीदशेत त्यांचे वाचन अफाट होते.

बी.ए. होईपर्यंत २५,००० पानांचे अभ्यासपूर्ण वाचन त्यांनी केले होते. सुमारे दोन वर्षे '*Oriental Translater*' म्हणून काम केल्यानंतर १८६८ मध्ये रानडे यांची एल्फिन्स्टन महाविद्यालयात इतिहास व इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून निवड झाली. १८७९ मध्ये मुंबई सरकारच्या न्याय खात्यात कनिष्ठ न्यायाधीश म्हणून त्यांची निवड झाली. १८८५ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून त्यांना बढती मिळाली. शेवटपर्यंत ते याच पदावर होते. त्यांनी त्या पदावरून दिलेल्या अनेक निर्णयांवरून रानडे यांची विद्वत्ता, समन्यायबुद्धी व समतोल मनोवृत्ती व्यक्त होते. न्यायाधीशपदी असताना इ.स. १८८५ मध्ये त्यांची मुंबई कायदे कौन्सिलवर कायद्याचे संल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली होती व पुन्हा इ.स. १८९०, इ.स. १८९३ मध्ये ते मुंबई प्रांत कौन्सिलचे सभासद होते.

४) राजारामशास्त्री भागवत एक विचारवंत, धर्मसुधारक म्हणून ते ओळखले जातात. प्रार्थना समाजाच्या 'सुबोध पत्रिका' या साप्ताहिकात त्यांनी समाजसुधारविषयक विपुल लेखन केले. अस्पृश्यता निवारणाचेही त्यांनी कार्य केले. हिंदू धर्माची

त्यांनी जी परखड चिकित्सा केली, त्याबद्दल आंबेडकरांनी त्यांचे कौतुक केले होते. ब्राह्मणांनी मांसाहार करावा, अंत्यजांसह सर्व मुलींच्या मौंजी कराव्यात ही त्यांची मते त्यावेळी वादग्रस्त ठरली होती. जातिभेद निर्मूलनाचा पाया घालण्यासाठी त्यांचे चिंतन उपयुक्त ठरले होते.

५) लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते, 'गेल्या १५० वर्षांत भारतीय इतिहासात दलित सेवेला व उच्च आध्यात्मिक संस्कृतीच्या प्रसाराला जन्मभर वाहून घेतलेल्या समाजसुधारकांमध्ये वि.रा. शिंदेंचे स्थान श्रेष्ठ आहे.' गांधीयुगाच्या आधी सर्वांगीण सुधारणावादाचा पुरस्कार करणारे विचारवंत म्हणून ते ओळखले जातात. कर्मवीर शिंदे हे गौतम बुद्धाच्या परंपरेतील एक मोठे सुधारक होते. विशेषतः अस्पृश्यता निवारणाच्या कामी त्यांचे कार्य महत्त्वाचे होते. जीवनपट :- वि.रा. शिंदे यांची बाह्य वैशिष्ट्ये धिप्पाड देहयष्टी, भरदार छाती, विद्वत्तेचे तेज, चेहऱ्यावर शांत भाव, पांढरी दाढी व केस ऋषिमुनीसारखे दिसत. जन्म २३ एप्रिल १८७३ जमखिंडी संस्थान (विजापूर जिल्हा) येथे झाला. या संस्थानात शिक्षण मोफत असे. ते १८ व्या वर्षी मॅट्रिक पास झाले. ते बुद्धिमान विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते. प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले. घरची गरिबी होती. मराठी, संस्कृत, इंग्रजीचा अभ्यास केला. वडील विठ्ठलभक्त होते. मॅट्रिकनंतर शिक्षक व कारकुनांची नोकरी केली. पुण्यात फर्ग्युसन कॉलेजातून बी.ए. केले. *Deccan Maratha Education Association* संस्थेतर्फे त्यांना दरमहा १० रुपयांची मदत मिळे. ते प्रार्थना समाजाचे एक सदस्य होते.

**७) सत्यशोधक समाज**

प्रास्ताविक :- १९ व्या शतकातील भारताच्या समाजक्रांतीचे जनक, एक श्रेष्ठ समाजसुधारक व समाजचिंतक म्हणून म. ज्योतिराव फुले ओळखले जातात. आधुनिक महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे ते आद्य प्रवर्तक होत. १९ व्या शतकात महाराष्ट्रात बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, भांडारकर, न्या. रानडे, विष्णुशास्त्री पंडित, आगरकर आदी समाजसुधारक होऊन गेले. पण ते या सर्वांच्या कार्याची दिशा, व्याप्ती उच्चवर्णीयांच्या कौटुंबिक सुधारणा (प्रामुख्याने स्त्री दास्यविमोचन) यापलीकडे गेली नाही. म. फुले यांचे कार्य, विचारांची व्याप्ती व दिशा वेगळी होती. दलित व कनिष्ठ वर्गाकडून 'महात्मा' ही पदवी मिळवणारे म. फुले हे पहिलेच महापुरुष आहेत. गोवर्धन पारीख यांच्या मते, '१९ व्या शतकातील विचारवंतांत व द्रष्ट्यांत अग्रपूजेचा मान ज्योतिरावांना द्यावा लागेल.' बडोद्याचे संस्थानिक सयाजीराव गायकवाड यांनी त्यांना 'हिंदुस्थानचे बुकर-टी- वॉशिंग्टन म्हटले होते' तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध-कबीर यांच्यासोबतच म. फुले यांना आपले गुरू मानले होते. माधवराव बागल यांच्या मते, 'कार्ल मार्क्सच्याही अगोदर समतेची दृष्टी फुल्यांनी महाराष्ट्राला दिली.' १८२७ मध्ये म. फुले यांचा जन्म क्षत्रिय माळी कुटुंबात झाला. सातारा जिल्ह्यातील कटगुण ही त्यांच्या पूर्वजांची मायभूमी. पुण्यास फुलांच्या व्यवसायात नावलौकिक मिळवल्याने त्यांच्या कुटुंबास फुले हे नाव पडले. म. फुले यांना समाजकार्याची आवड निर्माण झाली. तरुण वयात त्यांनी सामाजिक प्रश्नावर, सामाजिक व्यवस्था *(Social System)* यावर चिंतन केले. यास प्रामुख्याने त्यांच्यावर तरुण वयात झालेले संस्कार, त्यांनी केलेले ग्रंथपालन व त्यांना आलेले अनुभव कारणीभूत होते.

१) लहानपणापासून कष्टकऱ्यांची हलाखीची स्थिती त्यांनी पाहिली होती.

२) ख्रिस्तप्रणीत मानवतावादाची त्यांना ओळख झाली होती. ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या कार्यपद्धतीचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता.

३) ब्राह्मण मित्राच्या लग्नाच्या वरातीत शूद्र म्हणून त्यांची हेटाळणी केली गेली.

४) थॉमस पेन यांचे ग्रंथ व विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता.

**महात्मा फुले यांची ग्रंथसंपदा :-**

म. फुले यांनी विपुल ग्रंथनिर्मिती केली. त्यांचे सर्व ग्रंथ एकत्रितपणे 'महात्मा फुले समग्र वाङ्मय' बा शीर्षकाखाली महाराष्ट्र सरकारने प्रकाशित केले आहेत. म. फुले यांनी पुढील ग्रंथ लिहिले.

१) तृतीय रत्न (नाटक) (१८५५)
२) ब्राह्मणाचे कसब (१८६९)
३) हंटर कमिशनला सादर केलेले निवेदन.(१८८२)
४) इशारा (१८८५)
५) सत्यशोधक समाजोक्त
६) छत्रपती शिवाजीराजे यांचा पोवाडा (१८६९)
७) गुलामगिरी (१८७३)
८) शेतकऱ्याचा असूड (१८८३)
९) सत्सार भाग १, २ (१८८५)
१०) सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक (१८९१)
११) अखंडादी काव्यरचना मंगलाष्टकांसह सर्व पूजाविधी

**म. फुले यांनी केलेले सामाजिक कार्य :-**

१) स्त्रियांची गुलामगिरीतून मुक्तता व्हावी यासाठी १८४८ मध्ये पुण्यास मुलींची पहिली शाळा काढली.

२) शूद्रातिशूद्रांच्या मुलांसाठी त्यांनी पुण्यात एकूण ३ शाळा काढल्या.

३) स्वतःच्या मालकीची विहीर अस्पृश्यांना पाणी पिण्यासाठी मोकळी करून दिली.

४) विधवा स्त्रियांच्या मुलांचा सांभाळ करण्यासाठी बालहत्या प्रतिबंधकगृह चालवले.

५) विधवा स्त्रियांचे लग्न लावून दिले.

६) बालविवाह, बहुपत्नीत्वाची पद्धत, सतिप्रथा यावर त्यांनी कठोर टीका केली.

७) समुद्रपर्यटन केल्याने धर्म बुडतो या कल्पनेवर त्यांनी टीका केली. परदेशगमन न केल्यामुळे पाश्चात्त्य ज्ञान, विज्ञान, इतिहास, भूगोल, उद्योग, व्यापार आदींची आपणास ओळख झाली नाही असे त्यांनी म्हटले.

८) विधवा स्त्रियांचे केशवपन करू नये असा प्रसार करून मुंबईस न्हाव्याच्या परिषदेत केशवपन न करण्याचा ठराव पास करून घेतला.

९) मद्यपानास विरोध दर्शविणारे पत्र पुणे नगरपालिकेच्या कार्यकारी मंडळाकडे पाठविले. त्यात मद्यपानामुळे लोकांचा नैतिक अधःपात होतो, सर्वनाश होतो असे म्हटले.

१०) भिक्षुकशाही, नोकरशाही व सावकारशाही यांच्यावर त्यांनी कठोर हल्ला केला व या तीन घटकांकडून शूद्र व अतिशूद्रांचे शोषण कसे होते याची विस्तृत, सूक्ष्म मीमांसा त्यांनी आपल्या लिखाणात केली.

१८८२ मध्ये हंटर कमिशनला त्यानी एक निवेदन सादर केले व त्यात त्यांनी खालील सूचना ब्रिटिश सरकारला केल्या होत्या.

१) प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असावे, प्राथमिक शाळांच्या संख्येत वाढ करावी.

२) शूद्र व अतिशूद्र वर्गातील विद्यार्थी शिकावेत म्हणून सरकारने शिकवण्या घ्याव्यात.

३) शिक्षकांचे वेतन वाढवावे. शाळा कॉलेजावर सरकारी नियंत्रण असावे.

४) शिक्षक प्रशिक्षित असावेत व ते शेतकरी वर्गातील असावेत.

५) अभ्यासक्रमात लेखन, वाचन, इतिहास, भूगोल, व्याकरण, हिशेब, नीती, आरोग्य यांचा समावेश असावा.

६) प्राथमिक शाळांची तपासणी दर ३ महिन्यांनी पूर्वसूचना न देता करावी.

७) स्थानिक स्वराज्य संस्थांनी निम्मा निधी शिक्षणावर खर्च करावा.

८) सर्व पातळ्यांवरची शिक्षण यंत्रणा सरकारी नियंत्रणाखाली असावी.

९) व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणावर भर द्यावा.

१०) केंद्रीय व प्रांतीय निधीतून शाळांना अनुदान मिळावे.

११) ज्या वर्गात शिक्षणाची मुळी प्रगतीच झाली नाही, अशा वर्गातील मुलांना शिष्यवृत्त्या द्याव्यात.

१२) स्त्रियांमध्ये प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी उपाययोजना कराव्यात.

स्वतः फुले निपुत्रिक होते. पण त्यांनी पुनर्विवाह न करता काशीबाई नावाच्या ब्राह्मण विधवेस झालेला पुत्र दत्तक घेतला.

**सत्यशोधक समाज :-**

४ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी त्यांचे चाहते व अनुयायी यांची सभा घेऊन सत्यशोधक समाजाची स्थापना पुणे येथे केली. आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील ही महत्त्वाची घटना आहे. मराठी प्रदेशात ग्रामीण व अज्ञानी जनतेपर्यंत पोहोचलेली ही पहिलीच चळवळ होय. फुले यांच्या मृत्यूनंतर १९११ मध्ये सत्यशोधक समाजाचे जे पहिले अधिवेशन पुणे शहरात भरले त्यात सत्यशोधक समाजाची तत्त्वे सांगितली होती.

१) सर्व माणसे एकाच देवाची लेकरे आहेत.

२) आईला किंवा वडिलांना भेटण्यासाठी, प्रसन्न करण्यासाठी ज्याप्रमाणे मध्यस्थाची आवश्यकता नाही त्याप्रमाणे देवाची प्रार्थना करण्यासाठी पुरोहित किंवा गुरूची गरज नाही.

३) मनुष्य जातीने श्रेष्ठ ठरत नाही तर गुणांनी ठरतो.

४) कोणताही ग्रंथ प्रमाण किंवा ईश्वरनिर्मित नाही.

५) या समाजात राजकीय विषयांवर बोलणे वर्ज्य होते.

सत्यशोधक समाजाच्या आपल्या अनुयायांसाठी त्यांच्या मार्गदर्शनासाठी म. फुले यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' हा ग्रंथ लिहिला होता. वि. रा. शिंदे यांच्या मते, 'हे पुस्तक सत्यशोधक समाजाचे बायबल होते. या ग्रंथातील फुले यांचे विचार हे सत्यशोधक समाज व चळवळ याचा मुख्य आधार होत.' या ग्रंथात सत्यशोधक समाजाची तत्त्वेही सांगितली होती.

१) ईश्वर म्हणजे 'निर्मिक' हा एकच आहे तो सर्वव्यापी, निर्गुण, निर्विकारी आहे. त्याने प्राणिमात्रांच्या उपभोगासाठी विविध वस्तू तयार केल्या आहेत.

२) 'एक ईश्वर, एक धर्म या तत्त्वाचा फुले यांनी पुरस्कार केला होता. ते म्हणत, 'मानवाचे धर्म नसावे अनेक ।

निर्मिक तो एक । ज्योती म्हणे ।। कोणास न पिडी । कमावले खाई । सर्वा सुखा देई । आनंदात ।। खरी हीच नीती । मानवाचा धर्म । बाकीचे अधर्म । ज्योती म्हणे ।।' दगड किंवा धातूच्या मूर्तीची पूजा करणे हा ईश्वरसाधनेचा मार्ग साफ चुकीचा आहे. परमेश्वरांची विविध (रूपे कल्पून भजन-पूजन, कीर्तन करू नये.

४) 'निर्मिक' हा सर्वार्थाने परिपूर्ण आहे. त्याला कशाचीही गरज नाही. नैवेद्य अन्नदानाची त्यास गरज नाही. सर्व माणसे ही परमेश्वराची लेकरे आहेत.

५) दैव, नशीब, ब्रह्मलिखित, पूर्वसंचित या गोष्टींवर विश्वास ठेवू नये..

६) नवससायास, मंत्रतंत्र, व्रतवैकल्ये, तीर्थयात्रा, स्वर्ग-नरक, जपजाप्य आदी गोष्टीस सत्यशोधक समाजाचा विरोध होता.

७) ग्रह, शास्त्रे, नक्षत्रे, राशी, ज्योतिषशास्त्रावरही फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचा विश्वास नव्हता.

८) श्रद्धा, पिंडदान, मृत मातापित्यांना खुश करण्यासाठी द्यावयाची ब्राह्मण भोजने, इतर दानधर्म, पापपुण्य आदींवर फुले यांचा विश्वास नव्हता.

९) सर्व धर्मग्रंथ हे मानवनिर्मित आहेत.

कनिष्ठ जातीतील लोकांना ब्राह्मणांच्या व ब्राह्मण्यांच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक व मानसिक गुलामगिरीतून मुक्त करणे हे सत्यशोधक समाजाच्या स्थापनेमागचे प्रमुख उद्दिष्ट होते. या समाजाचे सभासदत्व सर्व जातींसाठी खुले ठेवले होते. ब्राह्मण, महार, मांग, ज्यू हे प्रारंभी सत्यशोधक समाजाचे सभासद होते. सत्यशोधक समाजाची शाखा जेथे होती तेथे दर रविवारी बैठक होऊन खालील विषयांवर चर्चा होई.

१) ब्राह्मणांच्या धार्मिक गुलामगिरीतून मुक्तता करणे.

२) कमी खर्चात लग्न लावणे.

३) सक्तीचे व मोफत शिक्षण देणे.

४) दारूबंदीचा प्रसार करणे.

५) ज्योतिष, ग्रह, नक्षत्रे, राशी यापासून लोकांना मुक्त करणे.

६) जातिभेद, वर्णव्यवस्था, मूर्तिपूजा याविरुद्ध समाजाचे मतपरिवर्तन करणे.

७) पशु-हिंसा न करणे.

म. फुले यांच्या धर्मविचारांत सत्यास महत्त्वाचे स्थान होते. 'सत्य सर्वांचे आदी घर। सर्व धर्माचे माहेर।।' अशी त्यांची धारणा होती. सत्याला अनुसरून वागणारी व्यक्ती सुखी होते असे सांगून 'जगी सर्व सुखी कोण आहे, विचारी मना तूच शोधून पाहे' हा श्लोक लिहिणाऱ्या संत रामदासांवर त्यांनी टीका केली. सार्वजनिक सत्यवर्तनी कोणास म्हणावे यासंबंधी फुले यांनी ३३ नियम 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' यात सांगितले आहेत. त्यापैकी काही महत्त्वाचे नियम याप्रमाणे.

१) स्त्री-पुरुष हे जन्मतः समान व स्वतंत्र मानावेत.
३) परस्परांशी बंधुभावाने आचरण करावे.
५) अफू, भांग, मद्य वगैरे मादक पदार्थांचे सेवन करू नये.
७) धर्माचे पुस्तक सर्वांसाठी खुले असावे.
• ९) विद्या शिकविताना दुजाभाव नसावा.
२) निर्मिकास मान द्यावा, त्यांची पूजा करू नये.
४) प्रत्येकास विचारस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य आहे.
११) आपले पोट भरण्यासाठी अज्ञानी जनतेत कलह माजवू नये.

६) असत्य बोलू नये. चोरी करू नये. व्यभिचार करू नये.

८) पिढीजात श्रेष्ठत्व किंवा पावित्र्य मानू नये.

१०) महारोगी, पंगू, अनाथ मुलांना दानधर्म करावा.

१२) कपटाने लिहिलेल्या ग्रंथाच्या आधारे काही मानवास दास मानू नये वगैरे.

'ब्राह्मणाचे कसब' या पुस्तिकेत शूद्राच्या घरी मुल जन्मले, शूद्राच्या लग्नात शूद्राच्या घरी ऋतुशांती, वास्तुशांती, शूद्राच्या घरी पोथी वाचणे, शूद्राच्या अंतकाळी, सूर्यग्रहण इत्यादी प्रसंगी ब्राह्मण-जोशी शुद्रांना कसे लुटतात या संबंधी वर्णन आहे.

सार्वजनिक सत्यधर्माची विशालता मांडताना म. फुले यांनी विश्वकुटुंबाची कल्पना मांडली आहे. गाव, प्रांत, देश किंवा धर्म यांच्या पलीकडे पाहण्याची वृत्ती लोकांत यावी. सर्व स्त्री-पुरुषांनी या भूगोलावर आपले एकच कुटुंब समजून एकमताने एकमेकांशी सत्यवर्तन करावे असे ते म्हणत. फुले यांनी सर्वसमावेशक अशा उदारमतवादी कुटुंबाचे चित्र रेखाटले आहे. एकाच कुटुंबात बौद्धधर्मीय स्त्री, ख्रिश्चनधर्मीय पती, इस्लामधर्मीय कन्या व सार्वजनिक सत्यधर्मी पुत्र असावा. कोणी कोणाच्या धर्माचा द्वेष करू नये. निर्मिकाच्याच कुटुंबात आहोत असे समजून सर्वांशी प्रेमाने वागावे असे ते म्हणत. जगातील सर्वच धर्म अंधश्रद्धेवर आधारलेले आहेत असे त्यांचे मत होते. रक्तपिपासू धर्मांधतेचा फुले यांनी धिक्कार केला होता. मुसलमान व ख्रिश्चन धर्माविषयी व या धर्माच्या संस्थापकांबद्दल फुले यांना आदर वाटत होता. ब्राह्मणी संस्कृतीमधील धार्मिक वाङ्मय, ब्राह्मणेतरांवरील जाचक बंधने, मंदिर प्रवेशाच्या अडचणी आदी प्रकार इस्लाम व ख्रिश्चन धर्मात नाहीत म्हणून त्या धर्माचे आकर्षण फुले यांना वाटत होते.

**सत्यशोधक समाजाचे कार्य व वाटचाल :-**

सत्यशोधक समाजाला फार मोठा बुद्धिमंतांचा पाठिंबा होता असे नव्हे तर सामान्य शेतकरी, कष्टकरी जनतेचा पाठिंबा होता. त्याच्या प्रसाराची स्थाने म्हणजे सभा, बैठक व धान्य मळणीचे ठिकाण. एक घोंगडी, पागोटे ऊर्फ धोतर हा सत्यशोधक कार्यकर्त्यांचा वेश होता. सत्यशोधक समाजाचे प्रचारक हे आपल्या भाषणात शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, कमी खर्चातील व ब्राह्मणांच्या गैरहजेरीतील लगे, धर्मविधीतून शेतकऱ्यांची सुटका, शिक्षणाचे महत्त्व इत्यादी गोष्टी सांगत असत.

सत्यशोधक समाजाचा मुख्य लढा धर्मसंस्थेशी व धर्माच्या नावावर स्वतःची उपजीविका करणाऱ्या ब्राह्मणवर्गाच्या विरुद्ध होता. 'ब्राह्मणाचे कसब' ही पुस्तिका व 'शेतकऱ्याचा असूड' मधील प्रकरण एकमध्ये ब्राह्मण धर्माच्या नावाखाली केव्हा व कोणत्या पद्धतीने शोषण करतात याचे अत्यंत सूक्ष्म व वास्तववादी चित्र रेखाटले आहे. नामधारी ब्राह्मण धर्मविधी करताना जे मंत्र व मंगलाष्टके म्हणतात त्याचा आमच्या लोकांना अर्थ कळत नाही. म्हणून सत्यशोधक समाजोक्त मंगलाष्टाकांसह सर्व पूजाविधी तयार करून ती सत्यशोधक समाजाच्या वतीने मोफत वाटली होती.

या समाजातर्फे सत्यशोधक विवाहपद्धतीत स्वतः वराने दोन, वधूने दोन व उपस्थितांनी एक मंगलाष्टक म्हणायचे. ब्राह्मणास मुळीच बोलावयाचे नाही. अत्यंत कमी खर्चात लग्न लावायचे. शिक्षण फंडास मदत द्यावयाची व अंध, अपंग अनाथ आदींना मदत करणे वगैरे गोष्टी अभिप्रेत होत्या. खुद्द ज्योतिबा फुले यांनी या पद्धतीनुसार अनेक लग्ने लावून दिली होती. तसेच ग्यानोबा ससाणे या विधुराचा विवाहही त्यांनी स्वतः लावून दिला होता.

कनिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या होत्या. रस्ते व पूल बांधणीची कामे कंत्राटदार म्हणून करत व तो पैसा सामाजिक कार्यासाठी वापरला.

सत्यशोधक समाजाच्या चळवळीत ज्यांनी फुल्यांच्या काळात व नंतरच्या काळी महत्त्वाच्या भूमिका बजावल्या अशा काही व्यक्ती व त्यांचे कार्य -

**१) कृष्णराव भालेकर :** फुल्यांचे सहकारी. कवी, संपादक, वक्ते, दीनबंधू सार्वजनिक सभेची त्यांनी स्थापना केली. 'दीनबंधू' हे पत्र चालविले. 'कृष्णराव भालेकर समग्र वाङ्मय' हा ग्रंथ प्रकाशित झाला आहे. त्यांनी १८८५ मध्ये सत्यशोधक समाजाच्या झेंड्यांची मिरवणूक पुण्यात काढली होती. पुण्यात दयानंद सरस्वती यांची मिरवणूक उधळून लावल्यानंतर त्यांचा सत्कार ठेवून भाषणही आयोजित केले होते. त्यांच्यात व फुले यांच्यात काही प्रश्नो

मतभेद होते.

**२) डॉ. विश्राम रामजी घोले** हे सन १८७५-७७ या काळात सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष होते.

३) **डॉ. संतूजी रामचंद्र लाड** हे जातीने धनगर. सत्यशोधक समाजाच्या वतीने लागणाऱ्या 'दीनबंधू' पत्रास त्यांनी आर्थिक मदत केली होती.

४) **नारायण मेघाजी लोखंडे** जातीने माळी. सत्यशोधक समाजाचे सक्रिय कार्यकर्ते. इ.स. १८८०-९७ या काळात 'दीनबंधू' चे संपादक. गिरणी कामगारांची पहिली संघटना त्यांनी स्थापन केली.

५) **पंडित नामदेव कुंभार** फुले यांचे सहकारी. सत्यशोधक समाजाचा खेड्यांत प्रसार केला. सत्यशोधक समाजाच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी पुस्तके पुस्तिका व पदे लिहिली.

६) **यशवंत फुले** :- म. फुले यांचा दत्तकपुत्र. सत्यशोधक पद्धतीने स्वतःचा विवाह केला.

७) रामय्या अय्यावारू व्यंकू काळेवार, जाया किराडी लिंगू या मुंबईच्या तेलगू फुलमाळी जातीतील कार्यकर्त्यांनीही सत्यशोधक समाजाच्या कार्यासाठी आर्थिक मदत केली होती.

८) हरी रावजी चिपळूणकर, वासुदेव बिर्जे, तान्हुबाई बिर्जे, गणपतदादा गोरे, गोंविद काळे, ग्यानोबा ससाणे, सावित्रीबाई फुले, सावित्रीबाई रोडे, भाऊ कोंडाजी, डुंबरे पाटील, बापू हरी शिंदे, ताराबाई शिंदे आदी व्यक्तींचा सत्यशोधक समाज व चळवळीशी संबंध होता. त्या सर्वांच्या कार्यांमुळे ही चळवळ गतिमान झाली होती.

म. फुले यांच्या मृत्यूनंतर राजर्षी शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाची अधिवेशने भरवून सत्यशोधक चळवळीच्या विचारांचा प्रसार केला. त्यांच्या मृत्यूनंतर केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, मुकुंदराव पाटील, खंडेराव बागल व त्यांचे पुत्र माधवराव बागल, नाना पाटील, दासराम, आनंदस्वामी, मोतीराम वानखेडे, केशवराव बागडे वगैरे मंडळींनी सत्यशोधक समाजाच्या कार्याचा व विचारांचा प्रसार केला होता. १९३५ सालपर्यंत सत्यशोधक समाज सक्रिय होता. सत्यशोधक समाजाचे चार टप्पे संघटनात्मक वाढीच्या दृष्टिकोनातून सत्यशोधक समाजाच्या वाटचालीचे ४ टप्पे पडतात.

१) इ.स.१८७३-१८९० या काळात पुणे, मुंबई या भागात ही चळवळ विस्तार पावली.

२) इ.स.१८९०-१९१० या काळात ग्रामीण भागात चळवळीचे लोण पोहोचविले.

३) इ.स.१९१०-१९१२ या काळात सत्यशोधक समाजाची वार्षिक अधिवेशने भरवली गेली. शाहूंच्या सहकार्यान व प्रेरणेने पश्चिम महाराष्ट्र व विदर्भातही सत्यशोधक समाजाची चळवळ ही अत्यंत सक्रिय होती.

४) १९१९-१९३८ या काळात सत्यशोधक समाजाच्या चळवळीचे रूपांतर ब्राह्मणेतर चळवळ व पक्षात झाले. त्यामुळे मूळ आशय मागे पडून सत्यशोधक चळवळीने राजकीय स्वरूप धारण केले.

इ.स.१८९०-१९१० या काळात सत्यशोधक समाजाची चळवळ मात्र खूपच थंडावली होती. यास प्रामुख्याने फुले यांची मृत्यूपूर्वीची विकलांग अवस्था, सावित्रीबाई फुले व लोखंडे यांचे निधन. इ.स. १८९६-१९०२ या काळात मुंबई प्रांतात दुष्काळ व प्लेगची साथ, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे सत्यशोधकांचे लक्ष केंद्रित होणे व राष्ट्रीय चळवळीचा वाढत गेलेला जोर आदी गोष्टी कारणीभूत होत्या. इ.स.१९१७-२२ या काळात सत्यशोधक जलशांनी सत्यशोधक चळवळीचा विचार ग्रामीण भागात पोहोचविण्याचे फार मोठे कार्य केले होते.

सत्यशोधक समाजाचे कोणीही सभासद होऊ नये असा प्रयत्न ब्राह्मण करीत. सत्यशोधक समाजाचे जे सभासद होते त्यांना ब्राह्मण अधिकारी त्रास देत. ब्राह्मणांच्या गैरहजेरीत जी लग्ने लावली गेली ती लग्नेच नव्हेत अशी ओरड सनातनी ब्राह्मणांनी केली होती. तरीही सत्यशोधक समाजाच्या चळवळीचा परिणाम महाराष्ट्रावर खालील प्रकारे झाला.

१) ग्रामीण भागात शिक्षणाचे लोण पोहोचण्यास मदत झाली. बहुजन समाजात शिक्षणाची आवड निर्माण झाली.

२) धर्माच्या नावाखाली ब्राह्मण जे शोषण करत त्याबाबत शूद्र व अतिशूद्र समाजात जागृती निर्माण झाली.

३) कमी खर्चात ब्राह्मण पुरोहिताच्या गैरहजेरीत लग्ने लावली गेली. त्याशिवाय वास्तुशांती, दशपिंडविधी व इतर धार्मिक विधीतही ब्राह्मणांचे वर्चस्व नाकारले गेले.

४) सत्यशोधक समाजाच्या वतीने गरीब विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे चालविली गेली. गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या दिल्या गेल्या. सहभोजनाचे कार्यक्रम हाती घेतले गेले. निबंध स्पर्धा आयोजित केल्या गेल्या.

५) जातिभेद, वर्णव्यवस्था, सावकारशाही, पुरोहितशाही, मूर्तिपूजेला या चळवळीने मोठा धक्का दिला.

धनंजय कीर हे म. फुले यांचे चरित्रलेखक म्हणतात, 'आधुनिक भारतामध्ये सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरू करणारी पहिली संस्था म्हणजे सत्यशोधक समाज होय. सत्यशोधक समाजाने सामाजिक गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविला व सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. सत्यशोधक समाजाचा आवाज ही हिंदुस्थानात अनेक शतके दडपून टाकलेल्या कनिष्ठ समाजाची किंकाळी होती.'

**विठ्ठल रामजी शिंदे (इ.स.१८७३-१९४४)**

आतापर्यंत आपण बघितले की, महाराष्ट्रातील समाज सुधारकांनी उदा. बाळशास्त्री जांभेकर, लोकहीतवादी गोपाळ हरी देशमुख, भांडारकर, न्यायमूर्ती रानडे आणि ज्योतिबा फुले, गोपाळबाबा वलंगकर यांनी राजकीय बदलापेक्षा सामाजिक बदलावर जास्त भर दिला. फुले आणि आगरकरांनी राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यावर ते टिकवून ठेवण्यासाठी समाजामध्ये सामाजिक, वैचारिक फेरफार होणे फार गरजेचे आहे असे त्यांना वाटे. त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्यानंतरही राजकीय सत्ता जर काही ठराविक उच्चभ्रू लोकांच्या हातात एकवटली तर सद्य परिस्थितीत काडीचाही फरक पडणार नाही आणि आतापर्यंतचा दुर्लक्षित समाज अजून रसातळाला जाईल म्हणून फुलेंनी दलितांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न सुरु केले. टिळकांचा मात्र या सगळ्याला विरोध होता. त्यांच्या मते, "अशा प्रकारचे समाजसुधारक हे केवळ परकी सत्तेच्या हातातल्या कळसूत्री बाहुल्या आहेत. ज्यामुळे बहुसंख्य समाज हा राजकीय उत्थानापासून अलिप्त राहीला." भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या सुरुवातीच्या काळात बहुतेक नामवंत समाजसुधारक उदा. रानडे वगैरे, स्वातंत्र्य चळवळीचा भाग होते. पण जसजशी राष्ट्रीयत्वाची बळवळ ही काहीशी कर्मठ होत गेली. उदा. लोकमान्य टिळकांसारख्या व्यक्तींच्या हातात एकवटली जाऊ लागली तसतशी १९ व्या शतकाच्या अंतास राजकीय नेते आणि समाजसुधारक यांच्या मधील संबंधामध्ये तेढ येऊ लागली.

महात्मा गांधीच्या राष्ट्रीय पटलावरील आगमनापर्यंत सामाजिक सुधारणा आणि राष्ट्रीयत्वाची चळवळ समांतर धावत होत्या आणि हळूहळू शूद्र आणि अतीशूद्र, अस्पृश्य यांच्या हिताचे मुद्दे मागे सारले जाऊ लागले. परंतु एक समाजसुधारक विठ्ठल रामजी शिंदे याने मात्र समाजसुधारक आणि राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना बांधून ठेवण्यासाठी सतत प्रयत्न केले. अखेर, सामाजिक सुधारणा की राजकीय सुधारणा हा वाद मिटवण्यात त्यांना यश मिळाले आणि राष्ट्रीय काँग्रेसने अस्पृश्यांचाही प्रश्न हाती घ्यावा, असे ही मत त्यांनी सुचविले.

२३ एप्रिल १८७३ मध्ये शिंदे यांचा जन्म झाला. त्यांचे कुटुंब पुरोगामी विचारांचे होते. स्त्रियांच्या शिक्षणाच्या आणि पडदा पद्धतीबाबत त्यांचे विचार पुरोगामी होते. कला शाखेतून ते पदवीधर झाले. त्यासाठी त्यांना पुण्याचे वकील गंगाराम म्हस्के यांनी आर्थिक मदत केली आणि त्यानंतर त्यांच्यावर खूष झालेल्या बडोद्याचे संस्थानिक सयाजीराव गायकवाड यांनी आर्थिक मदत केली. त्यांच्या महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळात, त्यांच्यावर जे. एस. मिल, हर्बट स्पेन्सार, आगरकर यांच्या विचारांचा पगडा होता. पदवीनंतर प्रार्थना समाजाचे समाजसुधारक रानडे आणि भांडारकर यांच्या प्रभावामुळे ते मार्थना समाजात दाखल झाले. इ.स.१९०१ मध्ये परदेशातून आल्यावर प्रार्थना समाजाची सेवा करेन या अटीवर ऑक्सफर्डला जावयास त्यांना शिष्यवृत्ती मिळाली. ऑक्सफर्ड येथे धर्माधर्माचा तुलनात्मक अभ्यास त्यांनी केला. परत आल्यावर मुंबई येथे प्रार्थना समाजाचा धर्मगुरु म्हणून सात वर्षे कार्य केले.

**भारतीय डिप्रेस्ड क्लासेस मिशन :**

प्रार्थना समाजाचे काम करीत असतानाच शिंदे यांनी १८ ऑक्टोबर १९०६ रोजी 'भारतीय डिप्रेस्ड क्लासेस मिशन'ची स्थापना केली. समाजातील अस्पृश्यांचे राहणीमान बदलावे, त्यांना सामाजिक दर्जा मिळावा असा या मिशनचा हेतू होता. प्रार्थना समाज आणि मुंबई प्रांत समाज सुधारणा संघटनेच्या कृपाछत्राखाली ही चळवळ कमी वेळातच महाराष्ट्रात पसरली. शिंदे, त्यांचे कुटुंबिय आईवडील आणि बहीण जनाबाई या सर्वांनीच अस्पृश्यांसाठी काम करण्यासाठी शपथ घेतली होती. परंतु प्रार्थना समाजातील कार्यामुळे त्यांना अस्पृश्यांच्या विकासासाठी पुरेसा वेळ मिळत नव्हता. इ.स.१९१० मध्ये शिंदे आणि प्रार्थना समाजाच्या नेत्यांमध्ये अनेक बाबींवरुन खटके उडू लागले आणि त्याचे पर्यवसान शिंदेना कामावरुन कमी करण्यात झाले. त्यानंतर त्यांनी आपल्या मिशनसाठी संपूर्ण आयुष्य समर्पित केले.

त्याचबरोबर जातिच्या वादामुळे, समाजाच्या एकीला तडा जाऊ नये म्हणून 'सामाजिक न्यायावर' ते जास्त भर देऊ लागले. त्याशिवाय देशाच्या स्वातंत्र्याची लढाई यशस्वी होणे अशक्य होते. मुंबई प्रांतामध्ये मराठ्यांची संख्या जास्त होती म्हणून मराठा समाजात ऐक्य टिकून राहण्यासाठी मराठा राष्ट्रीय संघाची त्यांनी स्थापना केली. परंतु एवढे प्रयत्न करून सुद्धा मराठ्यांचे दोन गट पडले, एक राष्ट्रवादी मराठा आणि दुसरा सत्यशोधक मराठा, ज्यांना ज्योतिबा फुलेंच्या विचारावर श्रद्धा होती. म्हणून शिंदेनी 'अखिल भारतीय अस्पृश्यता संघ' ही नवी संस्था सुरु केली ज्याद्वारे अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांसाठी प्रयत्न करता येतील.

इ.स.१९१७ मध्ये श्रीमती ॲनी बेझंट यांच्या मदतीने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने अस्पृश्यता निवारणांचा ठराव पास केला. इ.स.१९१९ मध्ये गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट खाली मुस्लिमांना स्वतंत्र प्रतिनिधित्व दिले. त्याच्या आधारे दलित वर्गासाठीही स्वतंत्र प्रतिनिधित्व असावे यासाठी त्यांनी याचिका सादर केली. अस्पृश्यांमध्ये नव्याने राजकीय पातळीवर जागरुक झालेल्या लोकांना शिंदेची मवाळ मते पटत नव्हती आणि संस्थेच्या हक्क अधिकारासाठी त्यांच्यात कुरघोडी सुरु झाली. म्हणून त्यांनी संस्थेचा कार्यभार अस्पृश्य समाजाच्या नेत्यांना सोपविला.

जेव्हा राष्ट्रीय पटलावर गांधीजींची प्रतिमा एक राष्ट्रीय नेता म्हणून तयार व्हायला लागली होती तेव्हा शिंदे गांधींजींच्या सामाजिक आणि राजकीय विचाराने प्रभावित झाले होते. डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या कार्याचा त्याग केल्यावर इ.स.१९२३-२४ व्या दरम्यान त्यांनी ब्राह्यो समाजाचा धर्म प्रचारक म्हणून काम बघितले आणि केरळ मधील बायकूम येथे अस्पृश्यांना मंदीर प्रवेशबंदी विरोधात भाग घेतला. त्यानंतर त्यांनी जेधे बंधूच्या इ.स.१९२८ च्या शेती महसूलात वाढ करण्यासाठी, गरीब शेतकऱ्यांवर जो अन्याय होतो त्या विरोधात मदत केली. गांधीजींच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला. त्यांना अटक झाली व सहा महीन्यांची शिक्षाही झाली. परंतु त्यांच्या मनाची शांती होत नव्हती. कारण अस्पृश्यांच्या नवीन नेत्यांनी त्यांच्याशी फारकत घेतली होती. २ जानेवारी १९४४ मध्ये देहांत होण्यापूर्वी एक दशक शिंदे हे मनाने, शरीराने, आर्थिकदृष्ट्या पूर्ण खचले होते. ज्यांच्यासाठी त्यांनी आपल्या आयुष्याचा सगळा मौल्यवान वेळ खर्ची घातला तेच लोक त्यांना विसरले होते.

विठ्ठल रामजी शिंदे हे महात्मा फुलेंचे खरे अनुयायी होतो. जरी हिंदू धर्माविषयीच्या काही तत्वांबाबत मतभेद होते, तरीही हिंदू समाजाच्या रचनेमध्ये ब्राह्मण किंवा आर्यांचा वरचष्मा होता, हे त्यांना मान्य होते आणि म्हणून जाति व्यवस्था नष्ट व्हावी यासाठी त्यांचे प्रयत्न होते. तळागाळातील समाजाचे भले व्हावे यासाठी त्यांनी आयुष्य वेचले. कुठल्याही इतर कामापेक्षा, दलितांच्या उद्धारावर त्यांचे अधिक लक्ष होते आणि म्हणूनच त्यांनी दलित समाजासाठी दिवस- रात्र शाळा, उपहारगृहे, आरोग्यकेंद्रे सुरु केली. दलितांमध्ये सामाजिक, सांस्कृतिक जागृती व्हावी आणि सद्य परिस्थितीला त्यांनी शह द्यावा असे त्यांना वाटे.

डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या अनेक शाखा मुंबई प्रांताबरोबरच मद्रास प्रांतातही सुरु केल्या. एस. नटराजनच्या मताप्रमाणे, "शिंदेच्या या मिशनने नवीन पिढीसाठी एक वहीवाट बनविली होती. ज्यापासून ते प्रेरणा घेऊन दलित समाजाच्या प्रगतीसाठी खरोखर काही विधायक करु शकतील."

**शाहू महाराज व वेदोक्त प्रकरण**

ब्रिटीश काळातील ५६३ संस्थानिकांपैकी छत्रपती शाहू महाराज हे एक असे संस्थानिक राजे होते, ज्यांनी सामाजिक सुधारणांचे सर्वतोपरी प्रयत्न केले. त्यांचे महत्त्वाचे कार्य म्हणजे वंशपरंपरागत बालत आलेली जाति व्यवस्था मोडकळीस काढणे आणि दलितांच्या उत्थानासाठी प्रयत्न करणे. त्यांच्या सुधारणावादी प्रयत्नांमुळे ज्योतिबा फुले आणि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या प्रयत्नांना पाठबळ मिळाले आणि महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळ अधिक बळकट व प्रभावी झाली. फुलेंच्या सत्यशोधक चळवळीचे आणि मराठा-शूद्र आणि अति शूद्रांच्या उत्थानासाठी घाललेल्या प्रयत्नांचे खरे आधारस्तंभ शाहू महाराजच होते. पण त्यांनी कधीही या दोघांची पूर्ण जबाबदारी स्विकारली नाही. एका लेखकाच्या मते, "शाहू महाराज कधीही या चळवळीत पूर्णपणे गुंतले नाहीत. या उलट एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात आणि विसाव्या शतकाच्या पहील्या दशकांत त्यांनी ब्राह्मणेतर चळवळीवर जाहिर टिका केली."

तथापी ही टीका वगळता, शाहू महाराजांनी समाजातील स्त्रिया, दलित, मागासलेल्या चर्गासाठी जे कार्य केलेले आहे ते उल्लेखनीय आहे. धनंजय कीर म्हणतात, त्यांच्या राज्यातील अस्पृश्य आणि काही आदीवासी जातीच्या

लोकांना वर्षानुवर्षे गुलामी करावी लागायची. ती पद्धत बंद करून, त्यांनी त्यांना समान हक्क देऊ केले. स्वतःच्या मानमर्यादेबा विबार न करता, शाहू महाराज अस्पृश्यांबरोबर बसून जेवले आणि समाजासमोर नवा आदर्श मांडला. त्यांना समाजातील भेदाभेद जाती व्यवस्था, असमानता नष्ट करायची होती. त्यांच्या मते जातीव्यवस्थेमुळेच हिंदू समाज दुभंगला होता. मॅथ्यू लेडले म्हणतात "शाहू महाराज है फुल्यांने आदर्श मानणारे होते जे दलित मागासलेल्या जनतेसाठी अहोरात्र प्रयत्न करीत होते. शिक्षणाची गंगोत्री तळागाळापर्यंत पोहचविण्याचा ते प्रयत्न करीत होते."

त्यांच्या राज्यभिषेकाच्या इ.स.१८९४ मध्ये पहील्याच वर्षी त्यांनी गुलामगिरीची पद्धत बंद पाडली. ब्राह्मणेतर समाज शिक्षणाच्या अभावी ब्राह्मणांची मक्तेदारी मोडीत काढू शकत नाही, है जाणून त्यांनी त्यांच्या शिक्षणासाठी खास प्रयत्न सुरु केले. मागास दलित वर्गाला समान हक्क देण्याचा त्यांचा निर्णय पक्का होता म्हणूनच त्यांनी जातीनिहाय वसतिगृह सुरु करण्याच्या निर्णयाला पाठींबा दिला.

इ.स.१९०२ मध्ये त्यांनी इंग्लंड मधून, सरकारी नौकऱ्यांमध्ये ५० टक्के जागा मागास वर्गासाठी राखीव ठेवण्याविषयी आज्ञापत्र मागविले जेणेकरुन ब्राह्मणांची मक्तेदारी आपसूकच कमी होईल. उदाहरणार्थ इ.स.१८९४ मध्ये जनरल ॲडमिनिस्ट्रेटीव डिपार्टमेंट मध्ये ७१ पैकी ६० ब्राह्मण होते तर राखीव जागांमुळे इ.स.१९१२ मध्ये ९५ पैकी ३५ ब्राह्माण होते.

जाती व्यवस्थेची पाळंमुळं खणण्याचा आणि ती उखडून टाकण्याचा प्रयत्न त्यांनी केला. आयुष्याच्या शेवटी त्यांनी ही जाति-व्यवस्थाच नष्ट झाली तर बरं होईल असे म्हटले आहे. संपूर्ण प्रगतीला आळा घालणारी अशी ती महत्त्वाची धोंड आहे. जातिव्यवस्थेचा पुरस्कार हा एक सामाजिक अपराध आहे असे ते म्हणत. त्यांच्या समकालीन समाजसुधारकांच्या मताप्रमाणे, हिंदू धर्मातील असमानता जर दूर करावयाची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे त्यांना वाटे. त्यांनी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणाच्या अनेक संस्था सुरु केल्या. शिक्षणातील सुधारणांचे पडसाद ते हयात असतानाच उमटायला लागले होते. उदा. इ.स.१८९४ कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये फक्त ९७ विद्यार्थी होते त्यापैकी फक्त सहा ब्राह्मणेतर होते. इ.स.१९२२ मध्ये २६५ पैकी १०० विद्यार्थि ब्राह्मणेतर होते. त्यांच्या काळात, शाळेत जामान्य विद्यार्थ्यांचे प्रमाण १०,८८४ वरून २७.८३० पर्यंत वाढले आणि ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांचे प्रमाण ८,०८८ वरुन २१०२७ वर पोहचले. त्यापैकी २.१६२ अस्पृश्य होते. ह्या सर्व आकड्यांवरुन, छत्रपती शाहूंचे मागासलेल्या व्यक्तीसाठी, शिक्षणाच्या महत्त्वाच्या क्षेत्रासाठी परिणामकारक बदल दिसून येतात. त्यांच्या सरकारकडून ज्या ज्या सरकारी किंवा खाजगी शाळांना अर्थसहाय्य मिळत असे त्यांनी जातीच्या आधारे विद्याथ्यांमध्ये भेदभाव करु नये, अशा सूचना होत्या.

तसेच सार्वजनिक दवाखान्यात अस्पृश्यांपासून सर्वांना समान वागणूक व उपचार दिले जातील अशी ताकीद दिली होती. अंशतः सत्यशोधक समाज, ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज आणि मुख्यत्वे आर्य समाज यांच्या प्रभावामुळे त्यांनी आयुष्याच्या शेवटच्या काळात महत्त्वपूर्ण असे सामाजिक कार्य केले. विहीरी आणि पाण्याच्या टाक्या यांची स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले. अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शाळा बंद करून उच्च जातींच्याच मुलांबरोबर त्यांच्याच शाळेत बसण्यास सांगितले. अस्पृश्यांना न्यायशास्त्राचा अभ्यास करण्यास परवानगी देण्यात आली आणि त्यांना वकिलपत्र देऊन आजपर्यंत फक्त उच्च जातींसाठी राखीव असलेल्या जागांवर त्यांची नेमणूक करण्यात आली. त्यांच्या सरकारात कुलकर्णांना (गावाचे हिशेबनीस) बदलून तलाठ्यांना ठेवण्यात आले आणि काही नवीन पदे निर्माण करुन, अस्पृश्यांना नियुक्त करण्यात आले.

ब्राह्मणांनी सहाजिकच या बदलास तीव्र विरोध केला. पण राज्यव्यवस्थेची पाळेमुळे पार ग्रामीण भागापर्यंत जाऊन पोहचली होती. कोल्हापुरच्या या राजाने परंपरागत चालत आलेली वतने आणि बलुते या पद्धतीही बंद करविल्या ज्या द्वारे गावातील उच्चकुलीन जातीतील लोकांकडून महारांना गुलाम म्हणून वागविले जायचे, छत्रपतींनी महार वतनेही बंद करविली आणि ज्या कोणाला प्रतिरोध करावयाचा असेल त्यास दंड होईल किंवा कारावास होईल असे फर्मान सोडले.

शाहू महाराजांच्या कार्याचा फायदा ब्राह्मणेतर आणि मुख्यत्वे मराठा आणि अस्पृश्यांना झाला. ज्योतिबा फुले आणि शाहू महाराजांचे कार्य हे मुख्यत्वे ब्राह्मणांच्या राष्ट्रीयत्वाच्या भावनेपेक्षा सामाजिक सुधारणा आवश्यक असल्याचे

दिसते. परंतु दोघांच्याही कार्यामध्ये फरक होता. गैल ऑमवेड्ट (*Gaill Omvedt*) च्या मतानुसार, एकाचा दृष्टीकोन हा सामान्य-अती सामान्यांशी निगडीत होता तर दुसऱ्याचा मुख्यत्वे मराठ्धांकडे झुकणारा होता. फुले हे संपूर्णपणे धर्म-जाति निरपेक्ष होते आणि सामाजिक समानतेचे पुरस्कर्ते होते तर शाहू महाराजांच्या चाळवळीला समाजातील उच्चभ्रू लोकांचाही पाठींबा होता.

**वेदोक्त व शाहू महाराजांची भूमिका:**

वेदोक्त म्हणजे वैदीक धार्मिक विधी जे फक्त द्विज म्हणजे दोनदां जन्म घेणाऱ्या ब्राह्मणांसाठी किंवा क्षत्रियांसाठी असतात. याउलट, पौराणिक किंवा पुराणोक्त विधी हे सर्वशूद्रांसाठी असतात. (जुन्या काळात वैश्य सुद्धा द्विज म्हणून ओळखले जायचे). या वादाची पार्श्वभूमी, ही ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यातील वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी पूर्वापार चालत आलेला संघर्ष आहे. परंतु, जागेच्या अभावी आपण आपले संवाद फक्त ह्या वादाचे रुपांतर बाळवळीत कसे झाले यापुरतेच मर्यादित ठेवूया.

इ.स.१८३७ मध्ये, म्हणजे एकोणिसाव्या शतकात, या वादाला सुरुवात झाली. जेव्हा प्रतापसिंह हे साताऱ्याऱ्यांचे राजे होते तेव्हा या वादाचे निवारण करण्यासाठी त्यांनी दोन्ही जातीच्या वरीष्ठ मान्यवरांना पाचारण केले. ब्राह्मणांच्या मताप्रमाणे वैदिक धार्मिक विधी, हवन करण्याचे व करवून घेण्याचे अधिकार फक्त ब्राह्मणांनाच आहेत. उच्चकुलीन मराठा घराणी जशी भोसले, घाडगे, पालकर, जाधव, मोहीते, माने, महाडीक जे जाहीरपणे क्षत्रिय म्हणून ओळखले जातात. त्यांचे वैदिक विधी करण्याचे अधिकार जुन्या दस्तावेजाच्या आणि कागदपत्रांच्या आधारे सिद्ध झाले. हा वाद पुन्हा इ.स.१८९६ मध्ये बडोदा येथे उत्पन्न झाला जेव्हा महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या महालात होणारे विधी है पुराणोक्त आहेत हे सिद्ध झाले. ज्योतिबा फुल्यांच्या प्रभावामुळे आणि राजपुतांना येथील काही राजघराण्यात ज्याप्रमाणे वैदिक धार्मिक विधींचा अवलंब करण्यात आला होता. त्याप्रमाणे १५ ऑक्टोबर १८९६ पासून फक्त वेदोक्त विधींचाच अवलंब व्हावयास हवा, अशी आज्ञा महाराजांनी दिली. त्याचे पर्यावसन ब्राह्ममांचा रोष आणि शूद्र आणि अती शूद्र जातींचे सामाजिक, सांस्कृतिक, वैचारीक मंथन होण्यात झाले.

छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचा आवाका फक्त कोल्हापूरा पुरताच मर्यादित राहील. परंतु, अस्पृश्यांच्या, शूद्रांच्या विकासासाठी आणि त्यांना वंशपंरापरागत गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी, त्यांच्यात वैचारीक सांस्कृतिक जागृती निर्माण करण्यासाठी केलेले प्रयत्न या सर्वांचा उपयोग येथे जवळकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या पुढच्या कार्यात झाला आणि म्हणूनच छत्रपती शाहू महाराज हे एक क्रांतीकारी व्यक्तीमत्त्व होते.

**वेदोक्त प्रकरण व कोल्हापूरातील घटना :**

जेव्हा बडोवद्यामध्ये वेदोक्त विधी वरून वाद उसळता होता त्यामुळे महाराष्ट्रातील अनेक ब्राह्मण प्रक्षोमित झाले होते आणि त्यांचे मत सयाजीराव गायकवाडां विरोधी झाले होते. त्याच काळात, तशाच प्रकारची पण त्याहून गंभीर घटना कोल्हापूरात घडली. इ.स.१९०० मध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या हे लक्षात आले की, त्यांचा पिढीजात ब्राह्मण केवळ पुराणोक्त मंत्र म्हणतो, वेदोक्त नाही. याबाबत विचारणा करता, ते ब्राह्मण म्हणाले की, "तुम्ही शूद्र असल्याने तुमच्यासाठी पुराणोक्तच वेदपठण होऊ शकते." त्यांच्या असल्या ऊर्मट वक्तव्यामुळे आणि महाराजांना शूद्र म्हटल्यामुळे संतप्त होऊन, त्यांनी यापुढे फक्त वेदोक्तच विधी करावयाची आज्ञा दिली. यामुळे आंतर-जातीवाद अधिकच उसळला आणि महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळ अधिकच प्रखर होऊ लागली.

परंतु शाहू महाराजांच्या पुरोहिताने, महाराजांची आज्ञा पाळण्यास नकार दिला तेव्हा त्यांनी त्याची ईनाम जमीन जप्त केली. शंकराचार्यनेही राजोपाध्यायांना पाठींबा दिला. तेव्हा कोल्हापूरातील शंकराचार्यांची वंशपरांगत वारसा जमिनही जप्त करण्यात आली.

वेदोक्त वादाच्या पाठीमागे राजकीय व सामाजिक समतेचा ज्वलंत यक्ष प्रश्न होता. मराठ्यांच्या मताप्रमाणे, ब्राह्मण आता मराठ्यांमध्येच वादाला सुरुवात करावयास पाहत होते. राजघराणी आणि सामान्य मराठे यांच्यात एकमेकांबाबत असूया, मत्सर याचे बीजारोपण सुरु झाले होते.

ब्राह्मणांनी आपापसातील वाद मिटविला पण कोल्हापुरातील मराठ्यांचे वाद मिटेनात. त्याचा परिणाम सर्वांवर होऊ लागला. शाहू महारांजांनी वेदोक्त पुराण वाद लवकरात लवकर मिटावावा नाहीतर त्याचे परिणाम चांगले होणार

नाहीत आणि संपूर्ण भारतवर्षात याचे पडसाद उमटत्तील अशी धमकी वजा सूचनाही ब्राह्मणांनी देऊन सुद्धा शाहू महाराजांनी त्यांना दाद लागू दिली नाही आणि याचाबतीत कोणत्याही प्रकारच्या तडजोडीला ते तयार नव्हते.
वादाला नवीन तोंड फुटले. तेव्हा लोकमान्य टिळकांनी असे म्हटले की, शाहू महाराज छत्रपती आहेत या नात्याने त्यांना वेदोक्त विधीस परवानगी मिळेल पण त्यांच्या अन्य कुटुंबिय किंवा संबंधिताना नाही आणि ते केवळ मराठा आहेत म्हणूनही त्याना वेदोक्त विधीस परवानगी मिळू शकत नाही. ह्याचा अर्थ टिळकांच्या मते, मराठाही शूद्रच. शेवटी महाराजांनी ब्राह्मणांना त्यांना वैदिक विधींचे अधिकार आहेत ते मान्य करण्यास भाग पाडले. राजोपाध्याय आणि शंकराचार्य दोघेही जप्त केलेली इनामे वतने जमीन मिळण्यासाठी शरण आले. पण त्यांचा शाहू महाराजांवर काहीही परिणाम झाला नाही. ब्राह्मण्यांविरोधीचे त्यांचे मत अधिकच प्रखर होत गेले.

म्हणूनच, वेदोक्त वादाच्या नंतर, शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर लोकांना राज्यकारभारात आणण्यास सुरुवात केली आणि ब्राह्मणांचे वर्चस्व मोडकळीस काढले. शाहू महाराजांच्या तडाख्याखाली ब्राह्मणांचे जे हाल चालले होते ते पाहून मराठ्यांना फार आनंद झाला. परंतु, गेल ऑम्बेट (*Gail Omvedt*) म्हणतात, "नवीन मराठा, जो राज्यकारभारात उतरला होता, जो उच्चकुळातून नव्हता ते समाजामध्ये एकात्मता आणि समानता आणण्यासाठी प्रयत्न करु लागले. जे सत्यशोधक समाजाच्या विचाराने प्रेरित झाले होते. परंतु एका दशकाच्या आतच कोल्हापूर संस्थानात, वेदोक्त विधींबाबतीत अनेक तडजोडी करण्यात आल्या आणि क्षत्रियांनाही जानवे घालण्यास सुरुवात करण्यात आली. पण, तडजोडी व्यतिरिक्त ह्या विधी अत्यंत महत्वाच्या होत्या कारण ह्या ब्राह्मणांनी नव्हे तर ब्राह्मणेतर पुजायांनी केलेल्या होत्या."

**भाऊराव पायगौंडा पाटील,: (१ सप्टेंबर १८८७ — ९ मे १९५९).**

महाराष्ट्रातील एक थोर समाजसुधारक व शिक्षणप्रसारक. सर्व जातिधर्मांच्या गरीब ग्रामीण रयतेला आपल्या भगीरथ प्रयत्नांनी त्यांनी आधुनिक शिक्षणाची कवाडे खुली करून दिली म्हणून अनेक विद्वान व बहुजन समाज आदराने आणि प्रेमाने त्यांना कर्मवीर म्हणू लागला. कुंभोज (जि. कोल्हापूर) या खेड्यात पायगौंडा व गंगुबाई या जैन दांपत्याच्या पोटी त्यांचा जन्म झाला. एतवडे बुद्रुक (जि. सांगली) येथे प्राथमिक शिक्षण घेऊन पुढे ते कोल्हापुरात इंग्रजी सहावीपर्यंत शिकले. शाहू महाराजांच्या प्रभावाखाली त्यांच्यावर समाजसेवेचे संस्कार झाले. विद्यार्थिदशेतच सातव्या एडवर्ड बादशाहाच्या पुतळ्यास डांबर फासल्याच्या खोट्या आरोपावरून त्यांना तुरुंगवास सोसावा लागला. त्याला कंटाळून आत्महत्या करण्याचा त्यांनी प्रयत्न केला परंतु पुढे त्यांची सुटका होऊन त्यांनी कोल्हापूर सोडले.

ओगले काच कारखान्याचे व पुढे किर्लोस्कर नांगराचे १९१४ ते १९२२ या दरम्यान ते विक्रेते होते. या काळात ठिकठिकाणी खेड्यांत हिंडल्यामुळे जनतेचे दारिद्र्य व शिक्षणाचा अभाव यांची जाणीव त्यांना झाली. त्यातून दुधगाव (जि. सांगली) येथे विद्यार्थ्यांसाठी त्यांनी आश्रम काढला. कराडजवळील काले या गावी त्यांनी पहिले वसतिगृह काढले (१९१९). तोच रयत शिक्षण संस्थेचा शुभारंभ होता. पुढे १९२४ मध्ये सातारा येथे अस्पृश्यांसह सर्व जातिधर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी वसतिगृह काढले. त्यास राजर्षी शाहू महाराजांचे नाव देण्यात आले. महात्मा गांधींनी या वसतिगृहास १९२७ साली भेट दिली. तेव्हापासून भाऊराव खादी वापरू लागले व राजकारणापासून दूर राहून शिक्षणाच्या कार्यास त्यांनी पूर्णतः वाहून घेतले. गोरगरीब पण हुशार मुले जेथे जेथे खेड्यापाड्यांत दिसतील, तेथून त्यांना उचलून आणून वसतिगृहात ठेवून पोटच्या पोरांप्रमाणे सांभाळले. त्यांतील काही विद्यार्थ्यांच्या परदेशी शिक्षणाची सोय पालक या नात्याने त्यांनीच केली. 'स्वावलंबनाने कष्ट करून शिका', हा त्यांचा मंत्र होता.

वास्तविक भाऊराव बहुजनसमाजाच्या शैक्षणिक उद्धाराकडे वळले, त्याचे कारण सत्यशोधक चळवळीशी त्यांचा अत्यंत संस्कारक्षम अशा वयात आलेला निकटचा संबंध. या चळवळीतून बहुजनसमाजाच्या सर्वांगीण प्रगतीला चालना मिळावयाची, तर तिचा रोख शिक्षण प्रसाराच्या द्वारा त्या समाजातील अनिष्ट रूढी व अंधश्रद्धा नष्ट करण्याकडे असणे आवश्यक होते. भाऊरावांनी शिक्षणकार्य पतकरून हे साधण्याचा नेटका प्रयत्न केला. या कार्यामुळे विरोधक व सनातनी मंडळींचा रोष होऊन त्यांना जाच सहन करावा लागला. स्वतःच्या मातापित्यांची व समाजाचीही इतराजी त्यांनी ओढवून घेतली. सर्व जातिधर्मांचे आजन्म कार्यकर्ते सेवक या संस्थेत तयार झाले. रयत शिक्षण संस्था खऱ्या अर्थाने

जनतेची झाली. वटवृक्ष हे बोधचिन्ह व स्वावलंबी शिक्षण हे संस्थेचे बोधवाक्य ठरले. भाऊरावांची पत्नी लक्ष्मीबाई यांनी त्यांच्या कार्यात मनःपूर्वक साथ दिली. त्यांना तीन मुले झाली दोन मुली आणि एक मुलगा. संस्थेचे विद्यमान संघटक अप्पासाहेब हे त्यांचे चिरंजीव होत.

गांधीवधानंतरच्या उद्रेकात १९४८ साली संस्थेचे सरकारी अनुदान काही दिवस स्थगित करण्यात आले पण कर्मवीर भाऊराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी बाणेदारपणाने लोकाश्रयावर संस्था पुढे चालविली व संवर्धित केली. कर्मवीर भाऊराव हे विलक्षण जिद्दीचे व धडाडीचे कार्यकर्ते होते. धिप्पाड शरीर, प्रभावी व्यक्तिमत्त्व आणि गरीब, पददलितांचा अंतर्यामी जिव्हाळा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष होत. महात्मा फुले व राजर्षी शाहू यांची शिक्षणप्रसाराची इच्छा त्यांनी पूर्ण केली. पुणे विद्यापीठाने त्यांना 'डी.लिट्.' ही सन्मान्य पदवी अर्पण केली. सद्गुरू गाडगे बाबांचेही रयत शिक्षण संस्थेस अमोल साहाय्य झाले. हृदयविकाराने भाऊरावांचे पुण्यास निधन झाले.

**डॉ बाबासाहेब अंबेडकर आणि दलित चळवळ:-**

महात्मा फुले यांचा वारसा घेऊन २०व्या शतकात परिवर्तनवादी चळवळीला व्यापक स्वरुप प्राप्त होण्यास सुरुवात झाली. सामाजातील उपेक्षित राहिलेल्या घटकांच्या सर्वांगीन विकासासाठी परिवर्तनवादी लढे उभे राहिले. शेकडो वर्षापासून अस्तित्वात असलेल्या इथल्या ताठर जातीव्यवस्थेने अस्पृश्य व दलित समाजावर जी अनेक अमानवी स्वरुपाची बंधने लादली होती ती बंधने झुगारुन देण्यासाठीच चळवळी उभ्या राहिल्या. महात्मा फुले, राजर्षी शाहु यांचा वारसा घेऊनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नेतृत्वासाठी दलित समाज परिवर्तनाची चळवळ नव्या जोमाने सुरु केली. दलित या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. सामान्यतः दलित म्हणजे सामाजिक, सांस्कृतीक व आर्थिकदृष्ट्या दबलेला, दडपलेला, शोषित, पिडीत, तळागाळातला, निम्नस्तरीय व मागासलेला होय. डॉ. बाबासाहेबांनी दलितांना केंद्रस्थांनी ठेवून त्यांच्यावर होणाऱ्या, अन्याय, अत्याचारा विरुध्द त्यांच्यात जागृती निर्माण केली. डॉ. आंबेडकरांनी दलितांना त्यांच्या हक्काविषयी जाणीव करुन देत त्यांची अस्मिता जागृत केली.

**बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना १९२४-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२४ ला मुंबई येथे अस्पृश्य समाजातील कार्यकर्त्यांसह, समाजसेवकांची सभा घेऊन या सभेत बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली व "शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा" या ब्रीदवाक्यापासून त्यांनी आपल्या कार्याची सुरुवात केली. या समाजाचा मुख्य उद्देश म्हणजे विदयार्थी वसतीगृहाद्वारे, अन्य साधनाद्वारे समाजात शिक्षणाचा प्रसार करणे, बहिष्कृत समाजासाठी वाचनालये, शैक्षणिक वर्ग उघडणे, बहिष्कृत समाजाची सांपत्तिक स्थिती सुधारण्यासाठी औदयोगिक व शेतीविषयक शाळा चालविणे हे होते. धनंजय कीर बहिष्कृत हितकारिणी सभेविषयी म्हणतात, "बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना म्हणजे भारतातील पददलितांना स्वावलंबन, स्वाभिमान, आत्मोद्धार यांची शिकवण देवून देशात महापरिवर्तन घडवून आणणाऱ्या युगाचा प्रारंभ होय."

महाडचा मुक्तीसंग्राम १९२३ ला मुंबई प्रांताच्या कायदेमंडळात सार्वजनिक पाणवटे, धर्मशाळा, विदयालये, बगीचे वगैरे ठिकाणी अस्पृश्यता पाळू नये असा ठराव मंजुर करुन घेतला हेता. पण स्पृश्य हिंदुच्या मितीने तेथील अस्पृश्यांनी त्या तलावाचे पाणी नेण्याचा हक्क बजावला नव्हता. १९ व २० मार्च १९२७ ला डॉ. आंबेडकरांनी महाड येथे परिषद घेण्याचे ठरविले व कार्यकर्त्यांसह त्यांनी चवदार तळयाचे पाणी ग्रहण केले. त्या प्रचंड जनसमुदायानेही आपल्या नेत्याचे अनुकरण केले.

या चळवळीच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेबांनी दलित समाजामध्ये आत्मविश्वास निर्माण केला. २० मार्च १९२७ हा दिवस माणुसकीचा व समतेचा संदेश देणारा दिवस होता. यावेळी आंबेडकरांना विरोधही पत्करावा लागला. पण त्यांनी दलित उद्धाराची चळवळ थांबवली नाही.

**नाशिकचा काळाराम मंदीर सत्याग्रह**

१९३० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिक येथील काळाराम मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून चळवळ उभारली. यात अनेक कार्यकर्ते व ब्राम्हणेत्तर चळवळीचे नेते जवळकरही सामिल होण्यासाठी नाशिकला गेले होते. अस्पृश्ययांसाठी स्वतंत्र "पतितपावन मंदिर" बांधण्याचे ठरले पण आंबेडकरांनी सांगितले की, यामुळे अस्पृश्यांच्या समस्या सुटणार नाहीत, तोच पैसा त्यांच्या विकासासाठी खर्च व्हावा असे त्यांचे मत होते.

रामनवमीच्या दिवसानिमित्त अनेक अस्पृश्यांनी या मंदिरात प्रवेश केला. अनेक सत्याग्रहींना मारहान सुध्दा सहन करावी लागली. पण डॉ. आंबेडकरांच्या या चळवळीला यश आले. आणि १९३६ पासून हिंदुसाठी काळाराम मंदिराचे दरवाजे खुले झाले. पण तेही स्पृश्य हिंदुसाठी.

नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहाचा परिणाम दलित मुक्ती आंदोलनाच्या प्रगतीस हातभार लावणारा ठरला. अस्पृश्यांना त्यांच्या हक्काची जाणीव झाली. अस्पृश्यांना अन्यायाविरुध्द लढा कसा दयायचा हे आंबेडकरांनी शिकविले.

**पुणे करार व डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर दुसऱ्या गोलमेज परिषदेत दलित हे अल्पसंख्य आहेत व आर्थिकदृष्ळया मुसलमानापेक्षा दुबळे आहेत म्हणुन त्यांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी त्यांना स्वतंत्र मतदार संघ दयावेत असा युक्तिवाद डॉ. आंबेडकरांनी केला. तो ब्रिटिशांनी मान्यही केला होता व भारतातील अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ दिले होते. बहुसंख्य समाजापासून अल्पसंख्य गटांना दुर ठेवण्यासाठी ब्रिटिश राज्यकर्ते हेच त्यांचे खरे हितरक्षणकर्ते आहेत अशी भावना निर्माण करण्यासाठीच स्वतंत्र मतदार संघाची तरतुद करण्यात आली होती.

पण म. गांधी दलितांसाठी विभक्त मतदार संघाचा शासनाने निर्णय घेतल्यास स्वतःचे प्राण पणास लावून मी त्यास विरोध करीन असे गांधीजींनी गोलमेज परीषदेत जाहीर केले.

तसे पत्र म. गांधीनी ब्रिटिश पंतप्रधान रॅमसो मॅक्डोनाल्ड यांना दिले. पण त्याकडे दुर्लक्ष झाले व विभक्त मतदार संघ घोषित झाला. तेव्हा २० सप्टेंबर १९३२ पासून त्यांनी अमरण उपोषणाला सुरुवात केली. पुण्याच्या येरवडा जेलमध्येच तयांनी उपोषण सुरु केले. गांधीजींची तब्येत खालावत चालली होती. गांधीजीचे प्राण वाचविण्यासाठी सर्व देशभर हालचाली सुरु झाल्या. शेवटी डॉ. आंबेडकर आणि म. गांधी यांच्यात कार्यकर्त्यांनी समेट घडवून आणला. पुणे करार घडून आला. त्यानुसार डॉ. आंबेडकरानी स्वतंत्र मतदार संघाचा स्विकार केला. हरिजन हा हिंदु समाजाचाच घटक आहे हे आंबेडकरांनी मान्य केले. पण करारानुसार १४८ जागा हरिजनांना देण्यात आल्या. शिवाय म. गांधीजीनी १९३२ मध्ये हरिजन सेवक संघाची स्थापना केली.

राखीव जागाद्वारे डॉ. आंबेडकरांनी आपल्या दलित बांधवांना राजकीय हक्क मिळवून दिले. ज्या हक्कापासून हरिजन बांधव हजारो वर्षापासून दुरावले होते.

**महार वतन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

डॉ. बाबासाहेबांच्या मते महार वतनामुळे दलित आपला स्वाभिमान विकून बसले आहेत. कारण दलितांना सरकारी कामाशिवाय हलक्या दर्जाची कामे करावी लागत. शिवाय सरकार केव्हाही महारांच्या जमिनी काढून घेत असत. आणि दलितांना जी कामे करावी लागत, त्यामुळे त्यांचा विकास होणार नव्हता.

डॉ. आंबेडकरांनी १७ सप्टेंबर १९३७ रोजी मुंबई विधान सभेत महारांच्या वतनासंबंधी कायदयात दुरुस्त्या सुचविल्या त्यानुसार महारांच्या वतनी जमिनी सरकारने परत कराव्यात. त्यांचा पगार सरकारी खजिन्यातून व्हावा,

त्यांच्या कामाची यादी निश्चित करावी, महार वतन रद्द झाल्याशिवाय स्वतः व्यवसाय किंवा नवीन व्यवसाय करण्याची वृत्ती त्यांच्यात निर्माण होणार नाही असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

**पत्रकारिता व डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

अस्पृश्य वर्गात प्रबोधन झाले पाहिजे, यासाठी डॉ. आंबेडकरांनी पत्रकारितेच्या माध्यमातून आवाज उठविला. त्यासाठी त्यांनी मुकनायक, बहिष्कृत भारत, जनता इ. वृत्तपत्रे काढली. बहिष्कृत भारत हे आंबेडकरांनी सुरु केलेल्या दलित चळवळीचे मुखपत्र होते. आंबेडकरांच्या वृत्तपत्रीय लिखानाचा हेतू दलित बांधवांची उन्नती हाच होता. त्यांच्या मुकनायक या वृत्तपत्राने सामाजिक व राजकीय क्षेत्राबरोबरच दलित बांधवानी आपला दर्जा निर्माण केला पाहिजे. ही जाणीव निर्माण केली. तर त्यांच्या जनता या पाक्षीकातून त्यांच्या धर्मांतराची भुमिका स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापणा, स्वातंत्र्यानंतर आंबेडकरांनी कायदामंत्री म्हणुन तसेच राज्य घटणेच्या मसुदा तयार करण्याच्या समितीचे अध्यक्ष म्हणुन जी अपूर्व कामगिरी केली त्याची माहिती जनता या वृत्तपत्रामुळे जनतेपुढे आली.

आंबेडकर निर्मिड व ध्येयवादी पत्रकार होते. त्यानी वृत्तपत्राच्या माध्यमातून हिंदुधर्म, धर्मग्रंथ, जातीव्यवस्था, मनुस्मृती, ब्राम्हणशाहीवर टिका केली. वृत्तपत्रीय लिखानातून त्यांनी अस्पृश्य समाजाला विचारप्रवण केले व त्यांना अंतर्मुख बनविले. वृत्तपत्र हे सा. परिवर्तनाच साधन आहे असे आंबेडकरांचे मत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा फुले व राजर्षी शाहु यांच्यापासून प्रेरणा घेऊन अस्पृश्यांच्या उद्धाराचे कार्य हाती घेतले. सत्याग्रहाच्या माध्यमातून त्यांनी एक परिवर्तनाची चळवळ उभी केली. अस्पृश्य लोकांत आत्मविश्वास निर्माण केला. अस्पृश्य समाजाला त्यांचे राजकीय हक्क मिळवून दिले. त्यांना जगण्याचा हक्क मिळवून दिला. मुकनायकाच्या प्रेरणेने लोक बोलू लागले. यातूनच आंबेडकरी चळवळीतून अनेक लेखक, कवी पुढे आले. समाजाची वास्तवता मांडू लागले. दलित चळवळीला खऱ्या आर्थाने सुरुवात झाली. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील दलित चळवळीचे अध्ययन करताना एक बाब प्रकर्षाने जाणवते की, आधुनिक काळात महाराष्ट्राच्या सामाजिक तसेच राजकीय जीवनात अनेक स्थित्यंतरे घडून आली. त्यात दलित चळवळीचे योगदान महत्वपुर्ण राहिलेले आहे. महाराष्ट्रातील दलित चळवळीवर एक दृष्टीक्षेप टाकला तर असे दिसून येते की, आधुनिक काळातील दलित चळवळीमध्ये विविध प्रवाह आहेत. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान निर्णायक व अवर्णनीय आहे.